16-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

DGS/ SBT/ KTG/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबई शहरातील सन २००० पासूनच्या झोपड्या कायम करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार फक्त ३७ टक्केच झोपडीधारक पात्र असल्याबाबत**

**(१) * २०८५ प्रा.सुरेश नवले , श्री. संजय दत्त , श्री. माणिकराव ठाकरे , श्रीमती मधु जैन , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील सन २००० पासूनच्या झोपड्या कायम करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार मशालच्या सर्वेक्षणानंतर पालिकेच्या जी-उत्तर विभागातर्फे धारावी प्रकल्पाला पाठविलेल्या पत्रात धारावी येथील सन २००० सालाच्या मतदार नोंदणीनुसार फक्त ३७ टक्केच झोपडीधारक पात्र असून ६३ टक्के झोपड्या अपात्र असल्याची धक्कादायक माहिती माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपात्र असलेल्या झोपड्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) व (२) धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सेक्टर-४ मधील झोपडीधारकाच्या सर्वेक्षणाअंती प्राप्त नमूनादाखल अहवालामध्ये पात्र झोपडीधारकांची संख्या ३७% दिसून आली आहे. उर्वरित झोपडीधारकांच्या पात्रतेसंबंधीच्या कागदपत्रांच्या पडताळणीचे काम अद्याप चालू आहे. सक्षम प्राधिकारी यांनी झोपडपट्टीधारकांचे परिशिष्ट-२ अंतिम केलेले नसल्यामुळे कोणत्याही झोपडपट्टीधारकास अद्याप अपात्र ठरविले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. २०८५..

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, शासनाने सन 2000 पर्यंतच्या झोपडया कायम करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. याठिकाणी 37 टक्के झोपडीधारक पात्र ठरले व 63 टक्के झोपडीधारकांच्या पात्रतेविषयी शंका आहे. प्रश्न असा आहे की, 63 टक्के झ ाोपडीधारकांच्या पात्रतेबाबत काय अडचणी आहे?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, संपूर्ण धारावीचा क्लस्टर प्रोजेक्ट रिडेव्हलप करण्याचे काम शासन स्तरावर सुरु केलेले आहे. त्याबाबत अनेक्श्चर तयार करण्यासाठी आणि संपूर्ण सर्व्हे करण्यासाठी मशाल या संस्थेला काम देण्यात आले. त्या संस्थेमार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. त्या संस्थेमार्फत सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे करण्यात येईल, लँडचा सर्व्हे करण्यात येईल. आणि पुन्हा अनेक्श्चरला लागणारी सर्व कागदपत्रे इत्यादींची पूर्तता करुन व सर्व्हे करुन ते महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्याचे काम केले आहे. त्याठिकाणी एकूण 54 हजार स्ट्रक्चर आहेत. पहिल्या क्लस्टर प्रोजेक्टमध्ये सेक्टर नं. 4 मध्ये 10 हजार स्ट्रक्चर आहेत. त्यापैकी 8 हजार स्ट्रक्चरची संपूर्ण कागदपत्रे महानगरपालिकेकडे दिली आहेत. महानगरपालिका ही कॉंपोनंट ॲथॉरिटी असल्यामुळे त्यांचेमार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. त्यांनी 38 टक्के सर्व्हे पूर्ण केल्यामुळे 38 टक्के लोक पात्र झाले आहेत. त्यांची यादी सुपूर्द करण्यात आली आहे. आणि यापुढेही सर्वेक्षणाचे काम सुरु असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाकडून महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये "पात्र झोपडीधारकांची संख्या 37 टक्के दिसून आली" म्हणजे उर्वरित 63 टक्के झोपडीधारकांचे पुनर्निरीक्षण सुरु आहे. ते झाल्यानंतर त्यामध्ये काही पात्र झोपडीधारक निधाल्यानंतर जे अपात्र असतील त्यांच्या बाबत शासनाचे धोरण काय राहणार आहे? याबाबत मागील पाच अधिवेशनामध्ये प्रश्न विचारल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी ज्या बेकायदेशीर झोपडया मंजूर झालेल्या कालावधीत उभारल्या असतील आणि त्या जर तोडण्यात आल्या असतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करु असे त्यांनी वारंवार सांगितले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2085 . . . .

श्री.दिवाकर रावते . . . .

अशा प्रकारे बेकायदेशीर झोपडपट्टया निदर्शनास आल्या तर त्यांच्या बाबतीत काय करणार आहात? तसेच अशा प्रकारे बेकायदेशीर झोपडपट्टया निर्माण होत असताना, त्याकडे ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे, त्यांच्या बाबतीत शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोद, धारावीसाठी एक स्पेशल प्रोजेक्ट हाती घेऊन, त्याला एक दर्जा देण्याचे काम केलेले आहे. अशा वेळी विशेष बाब या प्रोजेक्टसाठी 2000 सालापर्यंत ही मर्यादा वाढवून घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे यामध्ये देखील अजून काहीजण अपात्र होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. किंबहुना 100 टक्के देखील होतील की नाही हे देखील सांगता येणार नाही. याबाबतीत सर्व्हेचे आणि ॲनेक्शचर तयार करण्याचे काम सुरु आहे. अशा प्रकारे 2000-2001 च्या आत असलेली लोक पात्र असतील, त्यांना शासन न्याय देईल. त्या व्यतिरिक्त नियमाप्रमाणे अपात्र असतील, त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, सरकारने 2000 सालापर्यंतच्या झोपडपट्टयांना सरसकट संरक्षण देण्याच्या बाबतीत कायदा केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : अजून शासनाने कायदा केलेला नाही.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, ठीक आहे. सरकारने 2000 सालापर्यंतच्या झ ोपडपट्टयांना सरसकट संरक्षण देण्याचे मान्य केलेले आहे. मग त्यामध्ये धारावीमध्ये 2000 साला पर्यंतच्या झोपड्या असतील किंवा मुंबई शहरामध्ये अन्य कोणत्याही ठिकाणी असतील तर तेथे अपात्रतेचा प्रश्न कुठे येतो ? माझी शासनाला अशी विनंती आहे की, शासनाने सरसकट धोरण स्विकारल्यानंतर, समजा धारावीतील अपात्र झोपड्या ठरविण्यात आल्या, त्याचप्रमाणे कांदिवली व बोरीवली परिसरातील संजय गांधी उद्यानामधील ज्या झोपडपट्टया आहेत, त्यांना देखील मुंबई शहराप्रमाणे हा नियम लागू होतो. पण तेथील अधिकारी 2000 हजार सालापर्यंतच्या झोपडपट्टयांना हा नियम लागू करीत नाहीत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,आपल्याला माहिती आहे की, वेगवेगळया स्पेशल योजनांसाठी 2000 सालापर्यंत पात्रता ठरविली.या अगोदर सुध्दा एम.यु.टी.पी.असेल, तसेच ....

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2085 . . . .

श्री.सचिन अहिर . . . .

एम.यु.आय.पी.अंतर्गत देखील रोड वाईंडींगच्या नावाखाली 2000 सालापर्यंत रस्त्यावर रहाणाऱ्या लोकांना देखील पर्यायी घरे देण्याचे काम केलेले आहे. तूर्त हे स्पेशल प्रोजेक्टसाठीच आहे. शासनाने निश्चितपणे हे धोरण घेतलेले आहे आणि अशी भूमिका आहे की, 2000 सालापर्यंतच्या लोकांना निश्चितपणे संरक्षण द्यावयास पाहिजे. परंतु हे संपूर्ण प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये असल्यामुळे न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर याबाबतीतील योग्य निर्णय घेण्याच्या मानसिकतेमध्ये शासन आहे.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित आहेत. याबाबतीत सरसकट धोरण जाहीर करण्यात आलेले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय राज्यमंत्री जे उत्तर देत आहेत, ते माननीय मुख्यमंत्र्यांच्या मार्फतच देत आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत जी-जी उत्तरे दिली आहेत, त्या व्यतिरिक्त मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. या झोपडपट्टीमध्ये जसे रहिवासी आहेत, तसेच स्मॉल स्केल नाही तर मायक्रो स्केलवरील अनेक छोटे-छोटे उद्योगधंदे सुरु आहेत. तेथे कुंभारवाडे आहेत. ते जवळजवळ 700-800, 1000-2000 स्वे.फू.इतका जागा ऑक्युपाय करतात. शासनाचे या लोकांविषयी नेमके धोरण काय आहे ? तसेच धारावी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेनंतर काही झोपड्या नव्याने उभारण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या बाबतीत आपण नेमके काय करणार आहात ? असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण "मशाल" या संस्थेला सोशल सर्व्हे करण्याचे काम दिले होते. त्यांनी केलेल्या सोशल सर्व्हेमध्ये दिसून आले की, असे अनेक छोटे उद्योग आहेत की ज्यामध्ये त्यांना जागेची नितांत गरज आहे. म्हणून धारावी रि-डेव्हल्पमेंट योजनेमध्ये देखील अशा लोकांना त्यांचा व्यवसाय पुढे करता यावा या दृष्टीकोनातून शासनाने धोरणामध्ये आणि विशेष करुन या प्लॅनमध्ये समावेश केलेला आहे.कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रोज झोपड्या वाढत आहेत अशी सध्या परिस्थिती नाही. कारण धारावीमध्ये झोपड्या बांधण्यासाठी जागा राहिलेली नाही. परंतु काही लोक बेकायदेशीरपणे .......

. . . .बी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2085 . . . .

श्री.सचिन अहिर . . . .

ग्राऊंड+1किंवा 2 किंवा 3 अशा प्रकारे बांधकाम करीत असतील तर त्याबाबतीत शासनाने अगोदरच संबंधित महानगरपालिकेला सूचना दिलेल्या आहेत.त्याप्रमाणे त्यांनी संबंधितांवर कारवाई केली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक बाब सांगितली तर त्याबाबतीत देखील निश्चितपणे कारवाई केली जाईल. कारण ग्राऊंड+1किंवा 2 अशा प्रकारे बांधकाम करण्यास शासनाची मान्यता नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण झोपडपट्टयांना नियमित करण्याचा कायदा करताना 1995 हे वर्ष निश्चित केले. आता तुम्ही राजकारणासाठी 2000 हे वर्ष निश्चित केले. पण अजून 2000 साल निश्चित करण्याच्या बाबतीत कायदा करण्यात आलेला नाही. आताच माननीय मंत्री महोदयांनी एम.यु.टी.पी. आणि एम.यु.आय.पी.चा उल्लेख केला आहे. याठिकाणी काय घडत आहे याची आपल्याला कल्पना आहे की नाही हे मला माहिती नाही. प्रत्यक्षात एम.यु.टी.पी.च्या बाबतीत प्रोजेक्ट ॲफेक्टेड लोकांसाठी जी एजन्सी नेमलेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/ प्रथम सौ.रणदिवे... 11:10

ता.प्र.क्र.2085...

श्री. अरविंद सावंत...

जी एजन्सी नेमलेली आहे ती जेथे तो प्रोजेक्ट होणार असेल, फ्लायओव्हर होणार असेल किंवा आणखी काही होणार असेल तर त्याबाबतचे सर्वेक्षण करायला जेव्हा जाते त्यावेळी तेथे जी झापडी असते मग ती कितीही सालातील असू देत. राज्य शासनाने आता 2000 चे धोरण स्वीकारले असले आणि त्या ठिकाणची झोपडी 2005 मधील असेल आणि ती त्या एम.यू.आय.पी.च्या आड येणार असेल तर ताबडतोब तिचे पुनर्वसन केले जाते. अशा प्रकारे कायद्याची दोन ठिकाणी पझल होत आहे. म्हणून शासन 1995 किवा 2000 सालपर्यंतचा शासन जो कायदा करीत आहे तो या प्रोजेक्टच्या संदर्भात लागू केला पाहिजे. याचे कारण असे की, मानखुर्दला चेंबूरच्या पुलाकडच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे असे कळल्याबरोबर एका रात्रीत झोपडया उभ्या राहिल्या आणि त्या झोपडयांना पी.ए.पी.च्या अंतर्गत ताबडतोब जागा देण्यात आली. सभापती महोदय, अशा प्रकारे कायद्याचा जो भंग केला जातो तो आपल्या लक्षात येतो काय? असल्यास तो ताबडतोब थांबविण्यात यावा.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सर्वेक्षणाअंती" म्हणजे सर्वेक्षण पूर्ण झालले आहे. "सर्वेक्षणाअंती प्राप्त नमुनादाखल अहवालामध्ये पात्र झोपडी धारकांची संख्या 37% दिसून आली आहे." म्हणजे सेक्टर चारमधील सर्वेक्षण पूर्ण झालले आहे. 63 टक्के झोपडया अनधिकृत आहेत त्या 63 टक्के अनधिकृत झोपडयांच्या बाबतीत कोणती कारवाई करणार? महानकरपालिकेचे अधिकारी किंवा इतर कोणीही जे याकडे दुर्लक्ष करतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचा कायदा करण्यात आलेला आहे.त्याप्रमाणे याबाबतीत ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे त्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केलेली आहे नसल्यास त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येईल?

श्री.सचिन अहिर :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही तरी देखील मी यानिमित्ताने सांगू इच्छितो की, काही विशेष प्रोजेक्ट असतील तर वर्ल्डबँकेच्या रिस्ट्रिक्शनप्रमाणे कारवाई करण्यात येते. परंतु 2000 च्या आतल्या प्रोजेक्ट इफेक्टेड लोकांनाच संरक्षण देण्यात आलेले आहे. त्यानंतरच्या लोकांना संरक्षण देण्यात आलेले नाही. पी.ए.पी. म्हणून काही प्रोजेक्ट्ससाठी ट्रांझिंट कॅम्पस कदचित दिले असतील.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.2085....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराला माझी हरकत आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून,...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात स्पेसिफिक उदाहरण दिले तर शासन निश्चितपणे त्याबाबतची चौकशी करील.

सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, आता हया सर्व्हेच्या कामाला सुरुवात झालेली आहे. सर्वेक्षणच्या कामाला सुरुवात झाली असून फर्स्ट स्टेजचा सर्व्हे झालेला आहे. त्यामध्ये पात्र झोपडीधारकांची संख्या 37% दिसून आली. पुढे शासनाने असे म्हटले आहे की,"उर्वरित झोपडीधारकांच्या पात्रतेसंबंधीच्या कागदपत्रांच्या पडताळणीचे काम अद्याप चालू आहे." सभापती महोदय, मशालने ही सर्व कागदपत्रे तयार करुन महानगरपालिकेकडे द्यावयाची आहेत. त्यांनी जेवढी कागदपत्रे तयार करुन दिली त्यांचा सर्व्हे झालेला आहे. अजून कागदपत्रे देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तेव्हा राहिलेल्या लोकांच्या कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर ते पात्र आहेत की अपात्र आहेत यासंबंधीची माहिती मिळेल.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

**गृहनिर्माण मंडळाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरांवर कारवाई करण्याचे आदेश म्हाडाचे तत्कालीन उपाध्यक्षांनी देऊनही अंमलबजावणी न झाल्याबाबत**

**(२) * १३४८ श्री.किरण पावसकर , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४७४६५ ला दिनांक १७ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरांवर कारवाई करण्यास म्हाडाचे तत्कालिन उपाध्यक्षांनी आदेश देऊनही म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी त्याची अद्यापही अंमलबजावणी केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाचे अधिकारी पैसे घेऊन घुसखोरांना संरक्षण देऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे टाळत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करुन संक्रमण शिबिरातील घुसखोरांना तातडीने काढून टाकण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सचिन अहिर श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबईमध्ये 56 संक्रमण शिबिरे आहेत त्यापैकी 50 संक्रमण शिबिरे ही अस्तित्वात आहेत. 19000 सदनिका राहण्यासाठी आहेत. यामध्ये घुसखोरांची संख्या सात ते आठ हजार आहे. लोकप्रतिनिधी वारंवार म्हाडाच्या अधिकाऱ्यांना किंवा माननीय मंत्रिमहोदयांना भेटतात तेव्हा ते असे सांगण्यात येते की, होय, तिकडे घुसखोरी आहे. सभापती महोदय, ही संक्रमण शिबिरे कोणासाठी बांधली आहेत? मग त्यामध्ये घुसखोरी कशी झाली? म्हाडाचे काही अधिकारी आणि दलाल यांनी ही म्हाडाची घरे आहेत असे समजून सात ते आठ हजार लोकांना या सदनिका म्हणून विकल्या आहेत. आता त्याबाबतीत म्हाडा पुन्हा प्रस्ताव देत आहे की, त्या लोकांना या सदनिका देण्यात याव्यात. जुन्या चाळींचे पुनर्वसन, रस्ता रुंदीकरण या कामामुळे रखडलेले लोक या ठिकाणी 15 ते 25 वर्षापासून राहात आहेत. त्यामध्ये प्रश्न असा आहे की, श्री. सिताराम कुंटे साहेब उपाध्यक्ष असताना घुसखोरांची एक यादी तयार करण्यात आली होती आणि त्याप्रमाणे कारवाई यावी असे त्यांनी सांगितले होते. ही कारवाई करण्याचे ठरल्यानंतर इमारत दुरुस्ती पुनर्वसन मंडळाने कुठलीही कारवई केलेली नाही. लोकप्रतिनिधी गेल्यानंतर

...4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.1348...

श्री. किरण पावसकर...

सांगण्यात येते की, होय, तिकडे घुसखोर आहेत. घुसखोरांची एक यादी तयार होते. घुसखोरांची यादी तयार होऊन कुठल्याही घुसखोराला या संक्रमण शिबिरांमधून बाहेर काढले जात नाही. या घुसकोरांना कधी काढण्यात येईल आणि या घुसखोरांना ज्यांनी घुसखोर बनविले आहे अशा अधिकाऱ्यांवर शासन काही कारवाई करणार आहे काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, घुसखोरांची व्याख्या हा फारमोठा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे अशा प्रकारे काही लोक नियमीत रीतीने काही दलालाच्या माध्यमातून तर काही अधिकाऱ्यांच्या अप्रत्यक्ष सहकार्याने आणि प्रत्यक्ष सहकार्याने घुसखोरी करण्याचा प्रयत्न करतात.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1348..... श्री. सचिन अहिर ...

परंतु शासनाच्या स्तरावर वेळेवेळी अशा लोकांना निष्कासित करण्याची कारवाई झालेली आहे. 2007 ते 2009 पर्यंत 9500 असे काही घुसखोर आहेत काय याचा सर्व्हे झाला आणि एक आकडा आमच्यासमोर आला. त्याप्रमाणे निष्कासनाची कारवाई केली. त्या ठिकाणी पाच पथके तयार केली. अशा प्रकारे 3500 पेक्षा जास्त घुसखोरांवर कारवाई केलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : काय कारवाई केली ?

श्री. सचिन अहिर : त्यांना निष्कासित करण्याची कारवाई केली.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी म्हाडाच्या वसाहतीमध्ये राहते त्यामुळे त्या वसाहतीमध्ये रोज काय घडते त्याची माझ्याकडे सविस्तर माहिती आहे. या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, कारवाई करण्यात येणार आहे. परंतु कोणत्याही व्यक्तीवर कारवाई केली जात नाही. तेथील म्हाडाचे अधिकारी भेटत नाहीत. मी मोठ्या अधिकाऱ्यांबद्दल बोलत नाही पण त्या त्या वसाहतींमध्ये जे ज्युनिअर इंजिनियर असतील किंवा इतर लोक असतील ते आपल्याला कधीही भेटत नाहीत. ज्या लोकांची मुंबईतील घरे पडलेली आहेत, ज्यांना पर्यायी घरे दिलेली आहेत त्यांना या वसाहतीमध्ये घरे मिळत नाहीत. ती त्यांना कधी मिळणार आहेत ? म्हाडाने जाहिरात देऊन काही लोकांचे अर्ज घेतले. त्यामध्ये काही लोक पात्र ठरले. त्या ठिकाणी ते पात्र ठरल्यामुळे त्यांच्याकडे जे जुने घर आहे तोपर्यंत त्यांना दुसरे घर दिले जाणार नाही. काही दलाल त्यांच्या घरापर्यंत येऊन पोहोचतात आणि त्यांना सांगतात की, आपण फक्त आमच्याकडे कागदपत्रे द्या, आम्ही बाकीचे सर्व बघतो. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदय उलगडा करतील काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आपण या घुसखोरांवर नियमितरीतीने कारवाई करीत असतो. सन्माननीय सदस्यांचा स्पेसिफिक प्रश्न असेल तर निश्चितपणे त्याची चौकशी करु. पण सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ती गोष्ट खरी आहे की, अनेक वेळा काही लोक वर्षानुवर्षे त्या ठिकाणी राहात आहेत आणि वर्षानुवर्षे त्यांच्या मूळ खोलीचे काम होत नाही. मग रस्ता रुंदीकरणामुळे असेल किंवा मालकाच्या कोर्टकेसमुळे असेल. ट्रान्झीट कॅम्पमध्ये देखील खरेदीविक्रीचा व्यवहार होतो. खरेदीविक्रीचा व्यवहार केल्यानंतर संबंधित लोकांच्या बाबतीत आम्ही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र. 1348..... श्री. सचिन अहिर ...

घुसखोरीची व्याख्या करतो. शासन याबाबतीत विचार करीत आहे की, असे कोठे तरी धोरण व्हावयास पाहिजे. कारण शेवटी टान्झीट कॅम्पमध्ये किती वर्षे राहावे ? पूर्वी ट्रान्झीट पिरियड तीन ते चार वर्षाचा होता. आता तो कालावधी 20 ते 35 वर्षाचा झालेला आहे. म्हणजे तीन तीन पिढ्या आलेल्या आहेत. म्हणून शासन हा विचार करीत आहे की, जर मुळात ते त्या इमारतीमध्ये राहावयास गेले असते तर त्यांना ते विकता आले असते. हे रेंट ॲक्टमध्ये प्रोटेक्टेड आहे. अशा करावयाचे काय ? हा देखील विचार शासनाच्या स्तरावर चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी दलालांबाबत सांगितले. काही दलाल आहे की , मास्टर लिस्टमधील अशा लोकांकडून खोली विकत घेण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांवर सुध्दा आपण वेळोवेळी कारवाई करण्याचे काम केलेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, वर्तमानपत्रातील बातमी ही काही 100 टक्के खरी मानावयाची नसते परंतु ज्यावेळी माननीय राज्यमंत्री महोदय यांनी मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर पहिली पत्रकार परिषद घेतली त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, मुंबईतील म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील घुसखोरी करणाऱ्यांना कायम करण्याचा निर्णय म्हाडाच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला आणि यातून जवळजवळ 30 ते 40 टक्के रहिवाशांना फायदा होईल अशी अपेक्षा गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांनी व्यक्त केली. जे वर्षानुवर्षे राहात आहेत त्यांना नियमित करण्याचा निर्णय म्हाडामध्ये झाला असे आपण त्या पत्रकार परिषदेमध्ये सांगितले आणि आता आपण असे म्हटले की, असे करावयाचे काय याचा विचार चालू आहे. यातील वास्तव काय आहे ? दुसरा प्रश्न असा की, या घुसखोरांच्या निर्मुलनाच्या विषयामध्ये दिवसनिहाय कार्यक्रम श्री. कुंटे साहेबांनी तयार केला होता असे वर्तमानपत्रामध्ये वाचले. त्या दिवसनिहाय निर्मुलनाच्या कार्यक्रमाचे पालन झालेले नाही असे प्रत्यक्षात लक्षात येते. असा दिवसनिहाय कार्यक्रम काय झाला होता आणि काय पालन झाले नाही आणि कोणी केले नाही ?

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.बरवड 11:20

ता.प्र.क्र.1348....

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी जे पत्रकार परिषदेमध्ये सांगितले ते खरे आहे. यासंदर्भात म्हाडाच्या स्तरावरुन निर्णय झालेला आहे. जे लोक अनेक वर्षांपासून संक्रमण शिबिरामध्ये रहात आहेत त्यांना स्वत:च्या मालकीचे घर मिळाले असते तर रेण्ट ॲक्ट प्रमाणे त्यांना ते विकता आले असते. परंतु ट्रान्झिट पिरियडमध्ये त्यांना त्या घराची विक्री करु देता येत नाही. त्यामुळे मंडळाने तसा ठराव घेतला होता. परंतु शासनाच्या स्तरावर तो निर्णय प्रलंबित आहे. यासंबंधी सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करुन यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. हे जे टेनंट आहेत ते मूळ मालकाचे टेनंट आहेत आणि ट्रान्झिट पिरियडमध्ये हे टेनंट राईट्स घेण्यासाठी मालकांची सुध्दा हरकत येण्याची शक्यता आहे. म्हणून कधी तरी धोरणात्मक निर्णय घेता घ्यावा लागेल आणि तसा निर्णय घेण्याचा प्रयत्न होत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे म्हाडाच्या उपाध्यक्षांनी दिलेल्या कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी सूचना केल्या जातात, शासनाच्या स्तरावरुन सूचना दिल्या जातात. त्यादृष्टीकोनातून संबंधित घुसखोरांवर कारवाई करण्याचे काम सन 2007 ते 2009 पर्यंत केलेले आहे. यासंबंधी जसजशा तक्रारी येतात तसतशी म्हाडाच्यावतीने कारवाई केली जाते.

श्री.विनोद तावडे : तत्कालीन उपाध्यक्ष यांनी दिवसनिहाय कार्यक्रम दिला जाता, त्या कार्यक्रमाचे कोणत्या अधिकाऱ्यांनी पालन केले नाही त्याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, अशाप्रकारचा कार्यक्रम झालेला नाही. परंतु त्यांच्याकडून शासनाला वेळोवेळी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यादृष्टीकोनातून म्हाडाने 9500 घुसखोरांविरुध्द कारवाई करण्यासाठी विशेष मोहिम राबविली होती. 2007 मध्ये त्यापैकी 2723 घुसखोरांना निष्कासित करण्याची कारवाई केली होती. 2008 मध्ये 864 गाळयातील घुसखोरांना निष्कासित केले आहे. त्यानंतर पुन्हा नोव्हेंबर, 2009 पर्यंत 3588 घुसखोरांना निष्कासित करण्याची कारवाई केलेले आहे. एवढेच नाही तर 204 व्यक्तींविरुध्द मंडळाच्या माध्यमातून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण महामंडळातर्फे विविध माध्यमाच्या शाळांमध्ये सोई सुविधा अभावी झालेली दुरावस्था**

**(3) * 324 श्री. संजय दत्त , श्री सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण महामंडळातर्फे विविध माध्यमाच्या 127 शाळा व 88 इमारती असून त्यामध्ये सोयीसुविधा अभावी शाळांची दुरावस्था होत असल्याने विभागवार समित्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण महामंडळातर्फे विविध माध्यमाच्या 127 शाळा व 88 इमारती आहेत त्यांची दुरुस्ती करण्याचे महानगरपालिका प्रशासनाने मान्य केले आहे काय आणि शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत महानगरपालिकेने टेंडर काढले आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये 88 शाळा इमारती असून त्या इमारतींची सोयीसुविधा अभावी दुरावस्था होत असल्याने विभागवार समित्या स्थापन करण्याचा निर्णय झाला आहे काय असे विचारले होते, या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीचा कार्यक्रम महानगरपालिकेने हाती घेतला आहे काय त्याला होय असे उत्तर आहे. सभापती महोदय, 2002 ते 2008-2009 पर्यंत 1 कोटी 20 लाख रुपयांची तरतूद शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी करण्यात आली होती. त्यानंतर सन 2009-10 या वर्षासाठी 1 कोटी 30 लाख रुपयांची तरतूद महानगरपालिकेने केली आहे. परंतु नंतरच्या काळामध्ये महानगरपालिकेच्या लक्षात आले की, एकूण 88 इमारती व 1071 खोल्या आहेत. एवढया निधीमध्ये त्यांची दुरुस्ती होऊ शकणार नाही. म्हणून एकात्मिक विकास शाळा नावाचे नवीन हेड सुरु करुन सन 2009-10 करिता त्या महानगरपालिकेने 2 कोटींची आर्थिक तरतूद केलेली आहे. त्यामुळे एकूण 3 कोटींच्या निधीतून या शाळा इमारतींची व खोल्यांच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. पहिल्या टप्प्यात 35 शाळांचे काम हाती घेतलेले आहे, उर्वरित शाळा पुढच्या टप्प्यात दुरुस्त करण्यात येतील.

----

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषदेअंतर्गत असलेल्या छाया रुग्णालयाची झालेली दुरावस्था**

**(४) * ७३० श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नगरपरिषदेअंतर्गत असलेल्या छाया रुग्णालयाकडे नगरपरिषदेचे झालेले दुर्लक्ष व शासनाची उदासिनता याचा आर्थिक भूर्दंड सार्वसामान्य जनतेला बसला असून त्यांना खाजगी रुग्णालयात खर्चिक उपचार घ्यावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात मुबलक औषध पुरवठा होत नसुन एक्सरे मशिन, ईसीजी मशिन व अन्य यंत्रसामुग्री प्रशिक्षित कर्मचाऱ्याअभावी धुळ खात पडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री.अशोक चव्हाण** : (१) हे खरे नाही.

(२) नगरपरिषदेतर्फे आवश्यक औषध खरेदी केली जातात व रुग्णांना औषधांचा पुरवठा केला जातो. एक्स रे मशीन सुरु आहे. ईसीजी मशीन उपलब्ध नसल्यामुळे ईसीजी काढल्या जात नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, एकेकाळी छाया रुग्णालय हे अंबरनाथमधील आदर्श रुग्णालय मानले जात होते. परंतु सध्या या रुग्णालयात औषधे नाहीत, कर्मचारी नाहीत, पाणी नाही, भरती बंद आहे. कर्मचाऱ्यांना गणवेष नाही अशा दुरावस्था झाली आहे. त्याठिकाणी 11 डॉक्टर्सपैकी केवळ 5 डॉक्टर्स उपलब्ध असतात.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नर्सेसच्या पदाबाबतही तीच स्थिती आहे. 23 पैकी 16 नर्सेसची पदे भरलेली आहेत. उर्वरित पदे रिक्त आहेत. वॉर्डबॉयच्या पदाबाबतही तीच स्थिती आहे. माझा प्रश्न असा आहे की, नवीन भरती बंद केलेली आहे काय ? असल्यास, भरतीवरील बंदी उठविण्यात येणार आहे काय ? सन्माननीय सदस्य डॉ.किणीकर हे स्वत: त्याठिकाणी मानधन न घेता काम करायचे. त्यांनी तेथे 5 वर्षे काम केले. डॉ. किणीकर यांनी एक-दीड लाख रु. किमतीची डेण्टल चेअर त्या रुग्णालयाला दिलेली आहे. तेथील मशिन्स धूळ खात पडलेली आहे. अशी स्थिती असताना "प्रश्न उद्भवत नाही" अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. त्या ठिकाणी एक्सरे मशिन आहे, परंतु टेक्निशियन नाही. तेव्हा हा आकृतिबंध रद्द केला असेल, भरती बंद केलेली असेल तर भरतीवरील बंदी उठवून ताबडतोबीने रिक्त पदे भरण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुरुप छापील उत्तर देण्यात आलेले आहे. छाया रुग्णालयाकडे नगरपरिषदेचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला असून त्याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी सांगितले की,डॉक्टरांच्या 15 पदापैकी 5 पदे भरलेली आहेत. परंतु ही वस्तुस्थिती खरी नाही. त्या ठिकाणी एमबीबीएस डॉक्टरांची 6 पदे मंजूर असून त्यापैकी 5 डॉक्टर्स कार्यरत आहेत. सफाई कामगारांची 15 पदे भरलेली आहेत. काही दोन-चार स्टाफ नर्सेस कमी आहेत, हे खरे आहे. सभापती महोदय, ते हॉस्पिटल आपण पाहिले तर तेथे दररोज 250 ते 300 ओपीडी रुग्ण असतात. त्याठिकाणी दररोज येणा-या रुग्णांची संख्या पाहिल्यानंतर त्याठिकणी चांगल्या प्रकारे काम चालते, औषधांचा तुटवडा असल्याची तक्रार नाही. एक मात्र खरे आहे की, तेथील इसीजी मशिन गेल्या अनेक दिवसापासून बंद आहे. टेक्निशियन नाही असे नाही. येत्या महिन्याभराच्या आत तेथे मशिन उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरावरुन सर्व काही आलबेल आहे असे वाटते. परंतु तसे ते नाही. माननीय मंत्री महोदयांनी अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे याठिकाणी उत्तर दिलेले आहे. मी त्या हॉस्पिटलपासून 1 कि.मी. अंतरावर राहातो. मी अनेक वेळा त्या हॉस्पिटलमध्ये जाऊन पाहणी केलेली आहे. त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची सुविधा नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.730.... (श्री. रामनाथ मोते...

सर्वसामान्य गरीब माणसे या रुग्णालयात येतात. त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचीही सुविधा नाही ही वस्तुस्थिती आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी हे अधिवेशन संपल्यानंतर त्या रुग्णालयाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी म्हणजे नेमकी वस्तुस्थिती त्यांच्या नजरेस येईल. तेव्हा सदरहू रुग्णालयाला माननीय राज्यमंत्री महोदय भेट देऊन पाहणी करतील काय ?

श्री. भास्कर जाधव : या सभागृहाची प्रथा आहे की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य मानून कारवाई केली जाते. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे त्या रुग्णालयाला भेट देण्यास आणि सन्माननीय सदस्यांचा पाहुणचार घेण्यास मला आवडेल.

श्री. विनोद तावडे : दोन सन्माननीय सदस्यांनी स्वत: त्या रुग्णालयाला भेटी दिल्यानंतर प्रश्न विचारलेला आहे. अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे माननीय मंत्री महोदय याठिकाणी उत्तर देत आहेत. त्यामध्ये त्यांचा काही दोष नाही. सन्माननीय सदस्यांनी रुग्णालयाला भेटी दिल्यानंतरची वस्तुस्थिती सांगितलेली असताना त्यासंदर्भात अधिका-यांनी चुकीची माहिती दिलेली आहे. तेव्हा अशा प्रकारे चुकीची माहिती देणा-या अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? त्या अधिका-यांना आपण का वाचवता ?

.....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.730..........

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी प्रश्न बारकाईने वाचावा. प्रश्न कोणाच्या तक्रारीच्या अनुषंगाने नाही. प्रश्न तेथे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीच्या अनुषंगाने विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तात्काळ भेट देण्याचे मान्य केले आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे पाहणी करु आणि या उपर खोटी माहिती देण्याचा कोणी प्रयत्न केला असेल तर निश्चितपणे त्यांच्यावर उचित कारवाई केली जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठीच्या मोहोरबंद निविदा सादर करण्याची मुदत वाढविण्याबाबतची कार्यवाही**

**(५) * १२८० डॉ. दीपक सावंत , डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठीच्या मोहोरबंद निविदा सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अद्याप विकास नियंत्रण नियमावली निश्चित केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच उपरोक्त प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय.

(२), (३) व (४) धारावी पुनर्विकास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मंजूर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल समाविष्ट करण्याचे निदेश महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) सह १५४ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यात आले आहेत. त्या अनुषंगाने सदर तरतुदीनुसार काही सुधारणा करुन दि.२०.१.२००७ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात नोटीस प्रसिध्द करण्यात आली असून, संचालक, नगररचना यांच्या दि.२७.४.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने प्रस्तावाची छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पुन्हा एकदा धारावीच्या पुनर्विकासाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. मंत्रीमहोदयांनी यापूर्वीच्या प्रश्नामध्ये बरीच माहिती दिलेली आहे. परंतु या प्रश्नाला समर्पक उत्तर देण्याचे टाळले आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठीच्या मोहोरबंद निविदा सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे हे खरे आहे काय? या प्रश्नाला उत्तर 'होय' असे दिले आहे. प्रश्न क्रमांक 2, 3 व 4 ला उत्तर देताना असे म्हटले आहे की, मंजूर बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही बदल करण्याचे समाविष्ट करण्याचे निदेश महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1) सह 154 अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास देण्यात आले आहेत. प्रश्न असा आहे की, मोहोरबंद निविदा सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली असेल तर ती केव्हापर्यंत वाढविली आहे? मुदत संपल्यानंतर किती निविदा प्राप्त झाल्या? त्या निविदा केव्हा प्राप्त झाल्या? डी.सी.रुल्समध्ये नेमके कोणते बदल करण्याचे प्रस्तावित केले आहे?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1280......

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, नियमावलीमध्ये काही सुधारणा करीत असल्यामुळे तूर्त प्रक्रिया पुढे ढकलण्याचे काम केलेले आहे. दिनांक 30.7.2009 शासन राजपत्राद्वारे निविदेची मुदत वाढविण्याची सूचना करण्यात आली होती. एकूण 14 विकासकांनी पुनर्विकास योजनेमध्ये इंटरेस्ट दाखविला होता. बिडींगपर्यंत 7 विकासकांनी एमओयूचे जे स्टॅण्डर्ड असतात त्या दृष्टीकोनातून निविदेनंतरची प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम केलेले आहे. ही योजना करीत असताना सुप्रीम कोर्टाकडून 2000 ची डेडलाईन मंजूर करुन घेण्याचे काम केले. डी.सी.रुल्समध्ये सुधारणा करण्याच्या सूचना केल्या आहेत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या संपूर्ण प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला त्यावेळी 225 ऐवजी 270 चौ.फूट जागा प्रकल्पबाधितांना देण्याचा आपण कायदा केला. परंतु त्यापेक्षा अधिक म्हणजे 300 चौ.फूट जागा धारावी प्रकल्पग्रस्तांना देण्याची गरज आहे, त्यासाठी 2.5 एफएसआय पुरेसा नसल्यामुळे तो 4 पर्यंत द्यावा लागणार आहे. त्यासाठी कलम 33(10)(अ) व 33 (9)(अ) मध्ये सुधारणा करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित करण्यात आले. संचालक, नगररचना यांच्याकडून ज्या सूचना आलेल्या आहेत त्या सूचनांचे पालन शासन करीत आहे. बिडींग प्रोसेस पुढे करावी म्हणून शासनाने पत्राद्वारे कळविले आहे.

श्रीमती मधु जैन :सभापति महोदय, धारावी पुनर्विकास प्रकल्प में जो विलंब हो रहा है उसका एक कारण यह भी है कि झोपड़पट्टियों की संख्या बढ़ती जा रही है और इस वजह से यह प्रकल्प फिजीबल नहीं हो रहा है, क्या यह सही है ? इस प्रकल्प की लागत 16 हजार करोड़ रुपये है. दूसरा प्रश्न यह है कि, मेहता बिल्डर को आर्किटेक्ट की फीस के रुप में 11 करोड़ रुपये दिए जा चुके हैं और हर महीने 20 लाख रुपये फीस दी जा रही है, इस प्रकार से इस प्रकल्प का खर्च बढ़ता ही जा रहा है और आगे भी यह खर्च बढ़ता जाने वाला है, क्या यह सही है ?

यानंतर श्री खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1280.....

श्री. अशोक चव्हाण : महोदय, मुद्दा आर्किटेक्टच्या फी चा असण्याचे काही कारण नाही तर जे काही फायनान्शियल बीड आपण मागविणार त्यांच्या बाबतीत असेल, तसेच बजेट मॅनेजमेंट कन्सल्टंटची नियुक्ती करण्याच्या संबंधी निर्णय घ्यावयाचा होता. टर्म्स अँड कंडिशन्समध्ये जे बसतील त्यानुसार फी आकारणे वगैरे वेगवेगळे प्रश्न असतील त्यासंबंधीचा निर्णय विचारपूर्वक घेण्यात आलेला होता. या प्रकल्पाच्या बाबतीत माननीय राज्यमंत्र्यांनी मघाशीच स्पष्ट केलेले आहे की, दोन तीन विषय यात आहेत. यासंबंधीच्या बीडस मागविण्यात आल्या परंतु अद्याप अंतिम बीड्स प्राप्त करुन घेतल्या नाहीत आणि त्याची तारीखही वाढविण्यात आली आहे, त्यासंबंधीचा निर्णय अद्याप झालेला नाही. तसेच राज्यमंत्र्यांनी कलम 33 (9)(अ) आणि कलम 33 (10)(अ) अंतर्गत ज्या कार्यवाही अपेक्षित आहे म्हणजे एफएसआय जो आहे तो चार करण्यासंबंधीचा निर्णय होता. तसेच जे क्षेत्रफळ ठरविले होते ते 320 चौरस फूट करण्याच्या बाबतीतील निर्णय होता. त्याचबरोबर धारावीच्या बाबतीत एक नवीन प्रश्न समोर आलेला आहे तो म्हणजे तेथील रहिवास करतात त्यांची पात्रता. त्यामुळे अशा सर्व गोष्टींचा विचार करुन आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. एकदा आपण निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आणि हा प्रश्न पूर्ण निकाली निघाल्यानंतर मात्र अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून ही खबरदारी घेण्यात येत आहे. म्हणून याबाबतीत प्रथम आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे त्यानंतर पुढील कार्यवाही करावी लागेल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय कार्यकारी अध्यक्ष श्री. उध्दवजी ठाकरे यांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेतली होती. उत्तरामध्ये जी माहिती दिली त्यापेक्षा माननीय मुख्यमंत्र्यांनी माहिती सविस्तर पणे दिली आहे. माझा प्रश्न असा आहे की सन 2007 मध्ये यासंबंधीची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दोन वर्षांनी म्हणजेच 2009 मध्ये त्यासंबंधीचे अभिप्राय आले. जेवढा काळ यामध्ये गेला त्याची आपल्याला कल्पना आहेच. आपल्याला कल्पना आहे की जागांचे दर विशेषत: मुंबईत वाढतच चालले आहेत. धारावीसारख्या परिसराचा विचार केला तर जसजसा या प्रकल्पाला उशिर होईल तसतसे तेथील नागरिकांचे प्रश्नही प्रलंबित राहतात. आर्किटेक्टची फी मात्र दुसऱ्या बाजूला चालूच आहे. म्हणून या प्रकल्पाला सुरुवात होण्याअगोदरची जी कार्यवाही आवश्यक आहे ती शासन कधी पूर्ण करणार आहे ?

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, या संपूर्ण प्रोजेक्टचा स्पेशलाईज्ड रिव्ह्यू घेण्याचे काम सातत्याने चालूच होते. सन 2007 मध्ये स्पेशल प्रोजेक्ट म्हणून जाहीर करण्याचे काम केले, त्यानंतर सन 2000 पर्यंतच्या पात्रतेबाबत सुप्रिम कोर्टापर्यंत जावे लागले. तसेच हे संपूर्ण काम दिल्यानंतर त्याचा सर्व्हे आणि ॲनेक्श्चर पाहिले त्यापेक्षा सर्वात महत्वाचे म्हणजे या भागात जवळपास 59 हजार झोपड्या आहेत. त्याचप्रमाणे यामध्ये वेगवेगळे भाग आणि त्यांचे वेगवेगळे सोशल ॲंगल्स अशा सर्व गोष्टींमुळे विलंब लागत आहे. तरी देखील शासन यासंबंधीची भूमिका लवकरात लवकर घेईल.

श्री. दिवाकर रावते : गाजर दाखविण्याचे काम किती सफाईदारपणे हे सरकार करु शकते याचे हे उत्तम उदाहरण आहे. धारावी प्रकल्पाच्या विकासाला गेल्या पाच सहा वर्षांपासून मंजुरी मिळाली आहे. तसेच आताच सांगितल्यानुसार आता शासन फक्त कन्सल्टन्सीचीच फी दरमहा देत आहे, आर्किटेक्चरला देत नाही. निविदा मागविण्याचे काम चालू आहे आणि सर्वात महत्वाचा भाग म्हणजे दि 31 जानेवारी, 2007 रोजी यासंबंधीची नोटीस प्रसिध्द केल्यानंतर त्याचा अहवाल मात्र अडीच वर्षांनी प्राप्त झाला. यात शासनाला डी.सी. रुल 33 (9)(अ) आणि 33 (10)(अ) मध्ये बदल करण्याचाही विचार करावा लागणार आहे. त्यासाठी सभागृहात तशी सुधारणा आणावी लागेल. अशी सुधारणा शासन कधी आणणार आहे ? सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे सरकार फक्त कन्सल्टन्सीची फी देत आहे. निविदा मागविण्याचे बाकी आहे, एफएसआय वाढविण्यासंबंधीचा प्रश्नही आहेच. यासंबधीच्या निविदा प्राप्त झाल्यानंतर प्रोजेक्ट फिजीबल होत नसल्याने चटई क्षेत्र वाढविण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो अशा सगळ्या सूचना आहेत. त्याबाबत शासन काय करणार आहे ? तसेच क्षेत्रफळ अगोदर 225 चौरस फूट ठरले होते त्यात वाढ करुन 300 चौरस फूटपर्यंत आपण आला. निविदाकारांना फलदायी व्हावे असाही कदाचित त्यात हेतू असावा म्हणून या अनुषंगाने कायद्यात बदल करण्यासाठी शासन हे विधेयक सभागृहात मान्यतेसाठी कधी आणणार आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र. :1280......

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, निविदा प्रक्रियेच्या संदर्भात या ठिकाणी जो संदर्भ दिलेला आहे त्या सर्व गोष्टी निविदेमध्येच अंतर्भूत आहेत. कदाचित काही बिल्डर त्यांना मदत करत असतील म्हणून सन्माननीय सदस्यांचा असा रोख असावा. या कायदेशीर बाबीमध्ये ज्या काही सुधारणा करावयास पाहिजे होत्या त्या न झाल्यामुळे सदर निविदा प्रक्रिया थांबविण्यात आलेली आहे. या ठिकाणी आता पात्र आणि अपात्रतेचा नवीन प्रश्न निर्माण झालेला असून त्यासंदर्भातही नव्याने धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे व त्यानंतरच यामध्ये आपल्याला काम करता येईल. नाही तर आपण निर्णय घेऊन बसायचो आणि पुन्हा त्याच्या पात्रतेच्या संदर्भात प्रश्न निर्माण झाला आणि पुन्हा निविदेचे काम रखडले तर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु धारावीची व्याप्ती मोठी असल्यामुळे हा विषय अत्यंत क्लिष्ट बनला आहे. त्यामुळे हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, धारावीचा प्रकल्प मार्गी लावावयाचा असेल तर त्यामध्ये पात्र आणि अपात्रतेचा जो प्रश्न आहे तो प्रश्न आपल्याला प्रथम सोडवावा लागेल. हा प्रोजेक्ट फिजीबल होणार नाही म्हणून जवळ जवळ सर्वच विथ्ड्रा झालेले आहेत. बेसिकली 37 टक्के झाले तर तेवढेच त्यांना मिळणार आहे व त्यामुळे हा प्रोजेक्ट फिजिबल होत नसल्यामुळे हा प्रोजेक्ट घाटयात जात आहे त्यामुळे कोणीच विकासक यासाठी पुढे येत नाही. अशा परिस्थितीत पात्र व अपात्रतेच्या संदर्भातील निर्णय आपण किती दिवसात करणार आहात?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये पात्र व अपात्रतेच्या कारवाईच्या संदर्भात वेगळा सेल आहे. हे काम लवकर व्हावे यासाठी मुंबई महानगरपालिकेला जे काही अधिकारी किंवा मदत पाहिजे असेल ती शासनाकडून महानगरपालिकेला निश्चित प्रकारे केली जाईल. याकरिता आपण एक वेगळा कक्ष निर्माण करु. या प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्यामुळे याबाबत मी स्वत: मुंबई येथे बैठक घेईन व यासंदर्भातील निर्णयाची अंमलबजावणी लवकर होण्याकरिता पूर्ण प्रयत्न केले जातील.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी जिल्ह्यात पुरातन ऐतिहासिक वास्तुची झालेली दुरावस्था**

**(६) * २७४ श्री. सुभाष चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात पुरातन ऐतिहासिक वास्तु कोकणाची खरी ओळख असतानांही या ऐतिहासिक वास्तुची डागडुजी करण्यासाठी निधी नसल्यामुळे या ऐतिहासिक वास्तुची दुरावस्था झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २००९ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुरातन ऐतिहासिक वास्तुचे जतन व्हावे यासाठी त्यांची डागडुजी करण्यासाठी निधीची त्वरीत तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

.....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तरात म्हटले आहे. रत्नागिरी जिल्हयामध्ये ज्या पुरातन वास्तू आहेत त्या साधारणत: सातव्या शतकापासून ते शिवभक्त चालुक्य राजवटीपर्यंतच्या आहेत. कसबा व संगमेश्वर या परिसरात त्या काळात शेकडो मंदिरे उभारली गेली होती व त्यातील 3-4 मंदिरे उभेही आहेत तर काही मंदिरे ढासळलेल्या परिस्थितीत आहेत. या ठिकाणच्या पुरातन वास्तूंकडे, मुर्तीकडे तसेच स्तंभांकडे तर काही मंदिरे गाडलेही गेलेले आहेत परंतु याकडे शासनाचे आणि पुरातत्व विभगाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे यासंदर्भात पुरातत्व विभागाने काही पाहणी केली आहे काय ? पाहणी केली असल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील रसाळगड ता. खेड, तसेच लोकमान्य टिळकांचे जन्मस्थान, थिबा पॅलेस व थिबा राजा व राणीच्या समाध्या यांचा संरक्षित स्मारकामध्ये समावेश केलेला आहे. तसेच घाडगावमधील उध्दव मंदिर, पूर्णगड, गोपालगड, रत्नदुर्ग, मैनतागड या ज्या वास्तु आहेत त्यांना संरक्षित स्मारकामध्ये घेतलेले नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग-रत्नागिरी तसेच पूर्ण कोकणपट्टयात अशा प्रकारच्या ब-याच ऐतिहासिक वास्तू आहेत परंतु या वास्तुंकडे शासनाचे तसेच पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष होत आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ला आहे या किल्ल्याची एक भिंत सहा वर्षापूर्वी ढासळलेली असून अद्यापपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झ ालेली नाही. विजयदुर्ग किल्ल्याचा एक तटबंद दोन वर्षापूर्वी कोसळलेला आहे. कोकणामध्ये अशा प्रकारच्या 105 वास्तू आहेत त्यामुळे या वास्तूच्या संदर्भात शासन पुरातत्व विभागाबरोबर संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरुपी तोडगा काढणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सध्यातरी महाराष्ट्रातील 250 स्मारके राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत. यामध्ये एकूण 40 किल्ले, 101 मंदिरे, 14 लेण्या आणि 96 स्मारकांचा समावेश करण्यात आलेला आहे. राज्य संरक्षित स्मारकांमध्ये ज्यांचा समावेश झालेला नाही त्याबाबत सर्व माहिती तपासून घेऊन त्यावर योग्य तो विचार करण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 274..

.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यामध्ये मंत्रिमंडळाची बैठक सिंधुदूर्ग येथे झाली होती. सिंधुदूर्ग किल्ल्यातील शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला असल्याची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. तेव्हा हे दीड कोटी रुपये देण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय आणि ही कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

प्रा. फौजिया खान : लवकरात लवकर .

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर येथील मिहान प्रकल्प उभारण्याबाबतची कार्यवाही**

**(७) * ११५२ डॉ. नीलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री. अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ५२२६६ ला दिनांक १० जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या व संपादित करावयाच्या उर्वरित १७३८ हेक्टर जमिनीचे आता संपादन केल्यानंतर प्रगतीपथावर असलेल्या २५% कामांची सद्य:स्थिती काय आहे,

(२) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी मिहान इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या संयुक्त उपक्रमाचा संपूर्ण ताबा अद्याप महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पांतर्गत सर्व उद्योगांना आवश्यक त्या सुविधा माहे एप्रिल, २०१० पर्यंत पुरविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनासाठी पुनर्वसन अधिनियमांतर्गत सर्व देय सुविधा देण्याबाबत घेतलेल्या निर्णयानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता**: (१) नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी एकंदरीत ४३५४ हे. एवढे क्षेत्र आवश्यक आहे. त्यापैकी आतापर्यंत एकूण ३२८०.०१ हेक्टर जमीन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या ताब्यात आली असून, त्यावर रस्ते, भूमिगत गटारे, दूरध्वनी सेवा व इतर कामे प्रगतीपथावर सुरु आहेत. आतापर्यंत ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

(२) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्या संयुक्त सहभागाने मिहान इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी स्थापन झालेली आहे. सदर कंपनीस दि.७ ऑगस्ट, २००९ रोजी नागपूर विमानतळाचा ताबा मिळालेला आहे.

(३) मिहान प्रकल्पांतर्गत सध्या अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रात सर्व उद्योगांना आवश्यक त्या सुविधा डिसेंबर, २०१० पर्यंत पुरविण्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून नियोजन करण्यात आले आहे.

(४) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम १७ मध्ये, सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९, दिनांक २८ ऑगस्ट, २००९ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेस अनुसरुन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचेकडून मिहान प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधी सविस्तर प्रस्ताव दिनांक १ डिसेंबर, २००९ रोजी शासनास सादर केला असून, तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1152.....

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, नागपूरच्या मिहान प्रकल्पाकडे केवळ महाराष्ट्राचेच लक्ष लागलेले आहे असे नाही तर सपूर्ण देशाचे लक्ष लागलेले आहे. सध्या विदर्भामध्ये अधिवेशन सुरु आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की , मिहान प्रकल्पासाठी 4354 हेक्टर एवढे क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी 3280.01 हेक्टर जमीन ताब्यात आलेली आहे. उर्वरित 1 हजार 74 हेक्टर जमीन अजुनही ताब्यात आलेली नाही तेव्हा. ही जमीन ताब्यात घेण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत ? त्या नंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्या सबंधीचा प्रस्ताव 1 डिसेंबर 2009 रोजी शासनाकडे प्राप्त झालेला आहे. या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे स्वरुप काय आहे ? त्यानंतर मला तिसरा प्रश्न विचारावयाचा आहे. तिस-या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, " मिहान प्रकल्पांतर्गत सध्या अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रात सर्व उद्योगांना आवश्यक त्या सुविधा डिसेंबर 2010 पर्यत पुरविण्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून नियोजन करण्यात आलेले आहे. तेव्हा या सुविधांचे स्वरुप काय आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तासाठी विशेष पॅकेज दिले जाते त्यानुसार शहरी भागातील प्रकल्पग्रस्तंच्या बाबतीत त्यांची जमीन जर 25 चौरस मिटर्स पेक्षा कमी असेल तर त्यांना 35 चौरस मिटर्सचा भूखंड देण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना स्थलांतर करण्यासाठी दहा हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. ज्या शेतक-याकडे नॉन ॲग्रिकल्चरल जमीन असेल त्याला 300 चौरर्स मिटर्सचा भूखंड देण्यात येणार आहे आणि नागरी भागामध्ये ज्याच्याकडे एन.ए. केलेली जमीन असेल तर त्यांना 150 चौरस मिटर्सचा भूखंड देण्यात येणार आहे त्याचबरोबर प्रत्येक वसाहतीमध्ये एक आय.टी.आय. उभारण्यात येणार आहे आणि त्यासाठी पाच कोटी रुपययांचे अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी एक कोटी रुपये या प्रमाणे पाच कोटी रुपये देण्यत येणार आहेतृ. अशा प्रकारचे पॅकेज तयार करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर या वसाहतीमध्ये आधुनिक पध्दतीच्या सुविधा देण्यात येणार आहेत. त्या ठिकाणी मॉल, शॉपिग कॉम्पलेक्स,कम्युनिटी हॉल, अंडरग्राऊड ड्रेनेज सिस्टीम इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत आधुनिक टाऊनशिप प्रमाणे त्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

4..





ता.प्र.क्र.1152.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी एकंदरीत 4354 हेक्टर एवढे क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी आतापर्यत एकूण 3280.01 हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. ज्याप्रमाणे सिडकोने शेतक-यांच्या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर साडेबारा टक्के विकसित जमीन प्रकल्पग्रस्तांना दिली होती . माझ्या माहिती प्रमाणे त्यांना 15 टक्के विकसित जमीन दिली होती.त्या प्रमाणे याही प्रकल्पग्रस्ताना पंधरा टक्के विकसित जमीन देण्याच्या बाबतीत शासानाने काय निर्णय घेतला आहे आणि ही जमीन या प्रकल्पग्रस्तांना केव्हा देण्यात येईल ? त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना वा त्यांच्या वारसांना नोक-या देण्याचा एक प्रश्न आहे. या प्रकल्पग्रस्तांकडून इतरही मागण्या करण्यात आलेल्या आहेत तेव्हा या मागण्या मान्य करण्याच्या बाबतीत शासनाची सर्वसाधारण भूमिका कोणती आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, महाराष्ट्र पुनर्वसन कायद्यातील सेक्शन 17 मध्ये सुधारणा करण्यासंबंधीचे विधेयक आता मंजूर करण्यात आलेले आहेत. बदललेल्या नियमानुसार साडेबारा टक्के विकसित जमीन या प्रकल्पग्रस्तांना देण्यात येईल. त्याशिवाय ज्यांना ही जमीन नको असेल त्या व्यक्तीला या जमिनीच्या किंमती एवढे सानुग्रह अनुदान देण्यात येईल . त्याचबरोबर त्यांना टी.डी.आर. चा तिसरा पर्याय देखील देण्यात आला आहे.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, नागपुर स्थित मिहान प्रकल्प कार्यान्वित होने में बहुत विलंब हो रहा है. इस वजह से जिन उद्योगपतियों ने इस प्रकल्प के लिए पूंजी निवेश की है, उनका इस प्रकल्प पर का विश्वास कम हो रहा है. पिछले वर्ष माननीय मुख्यमंत्री जी ने पुनर्वास पॅकेज घोषित किया था, जिसके संबंध में अगस्त में जी.आर. जारी हुआ है. इस पॅकेज के तहत प्रकल्पग्रस्तों को साढ़े बारह टक्के जमीन देने, सानुग्रह अनुदान देने इत्यादि का प्रावधान है. लेकिन साढ़े बारह टक्के जमीन देने की प्रक्रिया शुरु न होने के कारण प्रकल्प ग्रस्त किसानों को अभी तक जमीन मिलने का काम शुरु नहीं हुआ है, इस संबंध में सरकार ने क्या निर्णय लिया और क्या कदम उठाया है ? दूसरा प्रश्न यह है कि प्रकल्प ग्रस्तों में बहुत सारे फ्लॅट धारक भी है जिनकी संख्या करीब एक हजार है. सवाल यह है कि जिनके फ्लॅट अधिग्रहित किए गए हैं, उन

5..



ता.प्र.क्र.1152.....

श्री सय्यद ज़मा ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फ्लॅटों की वेल्यू कैसे निकाली जा रही है ? तीसरा प्रश्न यह है कि, मिहान प्रकल्प के स्थान पर नेशनल हाईवे है, बहुत सारे बिजनैस सेंटर है, स्माल स्केल इंडस्ट्रीज है, जिन्हें अधिग्रहित करने की आवश्यकता नहीं है, ऐसा उस क्षेत्र के लोगों का मत है. इसलिए इस संबंध में शासन की क्या नीति है ? नागपुर में अधिवेशन हो रहा है और यह प्रोजेक्ट भी नागपुर से संबंधित है इसलिए माननीय मुख्यमंत्री जी इस प्रोजेक्ट के संबंध में यहां एक मीटिंग लेकर यहां के किसानों को राहत दे सकते हैं. क्या माननीय मुख्यमंत्री जी ऐसी एक बैठक यहां लेंगे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1152 ...

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मिहान प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे या ठिकाणी जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांच्यासाठी आपण तीन पर्याय घोषित केले आहेत. एक म्हणजे त्यांना सानुग्रह अनुदान देण्याचा पर्याय दिला आहे, दुसरा पर्याय टीडीआरचा दिलेला आहे म्हणजे तेथे सध्या दीड एफएसआय आहे त्या ऐवजी तो वाढवून 2 पर्यंतचा एफएसआय दिलेला आहे आणि ज्यांना हे दोन्ही पर्याय मान्य नसतील त्यांना जमिनीला जमीन देण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. साधारणत: त्यांना 12 टक्के जमीन देण्याचे धोरण आपण स्वीकारले असून आपल्या ताब्यात असलेल्या 387 हेक्टर जमिनीपैकी जमीन त्यांना दिली जाईल असा निर्णय आपण घेतलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण हे तीन पर्याय दिले आहेत, जमिनीला जमीन देताना 12 टक्के जमीन देणार आहात वगैरे ठीक आहे. त्यावर खरे तर अधिक बोलायचे होते. पण या प्रकल्पाद्वारा त्या ठिकाणी जो रोजगार निर्माण होणार आहे त्यात 80 टक्के विदर्भातील लोकांना प्रकल्पग्रस्तांच्या व्यतिरिक्त सामिल आपण करून घेणार आहात का ? जेणे करून वेगळ्या विदर्भाची मागणी करणाऱ्यांना देखील त्यातून काही समाधान मिळू शकेल.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, याबाबतीत शासनाच्या धोरणाप्रमाणे कारवाई होईल.

***

.... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाबळेश्वर (जि.सातारा) परिसरात बेकायदा मायनिंगद्वारे सुरु असलेले उत्खनन**

**(8) * 255 श्री. जयप्रकाश छाजेड, श्री. उल्हास पवार, श्री.मोहन जोशी, श्री.सय्यद जमा, श्री. सुभाष चव्हाण, श्री. चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाबळेश्वर (जि.सातारा) परिसरात बॉक्साईटच्या खाणी सापडत असल्यामुळे काही बड्या कंपन्यांनी बेकायदा विनापरवाना मायनिंगद्वारे उत्खनन करुन महाबळेश्वर शहर भकास करीत असल्याचे माहे जुलै, 2009 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (1) नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, महाबळेश्वर हे राज्यातील एक थंड हवेचे ठिकाण आहे आणि मध्यमवर्गीयांना थंड हवेच्या ठिकाणी जाण्यासाठी म्हणून ते एक उत्तम ठिकाण आहे. परंतु दुर्दैवाने सध्या तेथील सगळे हवामान बदलले आहे व तेथील थंडपणा निघून गेलेला आहे इतका की, नाशिकपेक्षा महाबळेश्वरचे हवामान गरम आहे अशी परिस्थिती आहे. तेव्हा या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण म्हटले आहे की, तेथे कोठल्याही खाणींचे उत्खनन झालेले नाहीय. परंतु तेथील तहसिलदार मीनल कळसकर यांनी केशवसिंग नावाच्या व्यक्तीच्या नावावर त्या व्यक्तीने बेकायदा खाणकाम केले म्हणून नोटीस पाठविली आहे हे खरे आहे काय ? असल्यास त्याच्यावर काय कारवाई आपण केली आहे ? आणि हे उत्खनन केले असेल तर किती एरियामध्ये ते केले आहे आणि या परिसरामध्ये रस्त्याच्या नावाखाली अनेक ठिकाणी उत्खनन झालेले आहे व त्याच्या चौकशीचे आदेश यापूर्वीच दिलेले आहेत तर त्याचे अहवाल आलेले आहेत काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळात महाबळेश्वर हे ठिकाण पर्यटन केंद्र म्हणून आहे तसेच केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने 17 जानेवारी 2001 च्या अधिसूचनेन्वये महाबळेश्वर-पाचगणी परिसर इको सेन्सेटिव झोन म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे त्या भागात खाणपट्टा जाहीर केला जात नाही वा त्यासाठी परवानगी देखील दिली जात नाही. तेव्हा त्या

.... के 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 255 ....

भागात बेकायदा खाणकाम होत असल्याची माहिती आमच्याकडे आलेली नाही. परंतु हा प्रश्न आल्यानंतर त्या संबंधात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता तेथील तहसिलदारांनी सिंग नावाच्या व्यक्तीला जागेचे बांधकाम करण्यासाठी म्हणून प्लिंथपर्यंतच्या कामास परवानगी दिली होती. पण त्या परवानगीचा गैरवापर करून त्याने डोंगर फोडून 3492 ब्रास मुरूम व 1211 ब्रास मातीचे अवैध उत्खनन करण्याचे काम केलेले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 255..

श्री. सचिन अहिर..

आणि म्हणून तहसिलदारांनी संबंधित व्यक्तीवर कारवाई केली. आणि त्याच्यावर 4 कोटी रुपयांचा दंड बजाविण्यात आला आहे. त्याबाबत संबंधित व्यक्तींनी माझ्यावर केलेली कारवाई चुकीची असून त्याबाबत त्यांनी अपिल केले आहे. सदरचे अपिल हे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये प्रलंबित आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बांद्रा (पूर्व) मुंबई येथील शासकीय वसाहतीतील खोल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या नावे करुन देण्याबाबतची कार्यवाही**

**(९) * १८८३ श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (पूर्व) मुंबई - ५१ येथील शासकीय वसाहतीतील हजारो शासकीय कर्मचारी तेथे ३०-३५ वर्षे रहात असून त्यांना सेवानिवृत्तीनंतर सदर जागा सोडाव्या लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीतील हजारो कर्मचाऱ्यांनी आपल्या नावावर जागा कराव्यात व मालकी हक्काने देण्याबाबत शासनाकडे वारंवार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सदनिका मालकी हक्कापोटी शासन ठरविल ती किंमत देण्यास कर्मचाऱ्यांनी सहमती दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. फौजिया खान, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

(२) होय.

(३) रहिवासी संघटनेने त्यांच्या निवेदनाद्वारे माफक दराने मालकी हक्काने घरे मिळण्याची विनंती केली आहे.

(४) व (५) सदर निवासस्थाने ही शासकीय कर्मचाऱ्यांसाठी बांधलेली सेवा निवासस्थाने आहेत. वांद्रे येथील शासकीय वसाहत रहिवासी संघाने त्यांच्या मागणी संदर्भात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, गेली कित्येक वर्षे वांद्रे येथील शासकीय वसाहतीमध्ये राहणारे शासकीय कर्मचारी त्यांना कायम स्वरुपी घर मिळावे म्हणून विनंती करीत आहेत. सभापती महोदय, वांद्रे येथील सर्व्हे क्रमांक 341, भूमापन क्रमांक 629 मध्ये शासनाची 128 एकर जमीन आहे. या 128 एकर जमिनीपैकी 30 एकर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. त्या अतिक्रमित जमिनीवर झोपडया उभ्या राहिल्या. त्या झोपडयांना सरकारने संरक्षण दिले. त्या झोपडयांना सरकारने एस.आर.ए. योजना लागू केली. त्यामुळे त्या झोपडीधारकांना त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1883..

श्री. अरविंद सावंत..

वसाहतीतच मोफत घरे आता मिळणार आहेत. एका बाजूला अनधिकृत बांधकामे करणाऱ्यांना नियमित घरे मिळणार. आणि दुसऱ्या बाजूला शासनामध्ये 25 ते 30 वर्षे सेवा केल्यानंतर त्यांना मात्र आपल्या मालकीचे घर मिळत नाही. म्हणून माझा प्रश्न आहे की, या शासकीय वसाहतीमधील 30 एकर जमिनीवर अतिक्रमण आहे.त्या अतिक्रमित जमिनीमध्ये आपण एस.आर.ए. योजना लागू केली आहे. आणि त्यांना मोफत घरे देत आहात हे खरे आहे काय? दुसरे असे की, या शासकीय वसाहतीत राहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्याकडे मोफत घरे मागितली नाहीत तर माफक किंमतीमध्ये घरे मागितली आहेत. त्यांनी शासनाला विनंती केली आहे की, या जमिनीचा पुनर्विकास करुन त्याठिक्‍ाणी आम्हाला माफक दरामध्ये घरे उपलब्ध करुन द्यावीत. आपण ही बाब न्यायप्रविष्ट आहे असे उत्तर देऊ नका. याबाबत जर आपण पॉझिटीव्ह उत्तर दिले तर न्यायालयातील केस हे शासकीय कर्मचारी मागे घेतील असा मला ठाम विश्वास आहे. ते आपण करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, वांद्रे येथील शासकीय वसाहतीमध्ये 4394 सर्व्हंट्स क्वॉर्टर आहेत. शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांना ते क्वॉर्टर सोडावे लागतात हे खरे आहे. हे शासकीय क्वॉर्टर असल्यामुळे जेव्हा हे कर्मचारी निवृत्त होऊन क्वॉर्टर सोडून गेल्यानंतर रिकामे झालेले क्वॉर्टर दुसऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येतात. आजच्या स्थितीत 816 कर्मचारी या क्वॉर्टरसाठी वेटींग लिस्टवर आहेत. हे तीन-तीन वषार्पासून थांबलेले कर्मचारी आहेत. त्याशिवाय मुंबईमध्ये अन्य ठिकाणी सुध्दा शासकीय वसाहती आहेत. त्याठिकाणी 1403 पेक्षा जास्त म्हणजे 99 टक्के ऑक्युपाईड क्वॉर्टर आहेत. सभापती महोदय, मागील वेळी या सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी त्याठिकाणी कर्मचाऱ्यांना घरे देणे शक्य होणार नाही असे सांगितले होते. तरीसुध्दा या कर्मचाऱ्यांनी काही प्रस्ताव आणला किंवा त्यांनी हाऊसिंग सोसायटी केली, त्यासंबंधीचा प्रस्ताव शासनासमोर आला तर त्याबाबत सकारात्मक निर्णय घेता येईल असे सांगितले होते. परंतु आज तरी या शासकीय वसाहतीतील घरे मालकी हक्काने देता येणार नाही.

श्री. अरविंद सावंत :सभापती महोदय, मुंबईची धर्मशाळा झालेली आहे, रेल्वेच्या बाजूला..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ ST/ SBT/ KGS/

ता.प्र.क्र. 1883..

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय श्री. शरद पवार साहेब मुख्यमंत्री असतांना काळाचौकी अभ्युदय नगरच्या वसाहतीतील शासकीय कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे दिली, त्या पध्दतीने आपल्याला ही घरे देता येतील काय हा माझा पहिला प्रश्न आहे? हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मी याबाबत अधिक माहिती मागणार नाही. परंतु त्याठिकाणी एफ.एस.आय. वाढवून किंवा दुप्पट एफ.एस.आय. देऊन त्याठिकाणी रहावयास येणाऱ्या नवीन कर्मचाऱ्यांना शासनाच्या सेवाशर्तीप्रमाणे निवासस्थान द्यावे, आणि जुन्या कर्मचाऱ्यांना मालकी हक्क पध्दतीने घरे देऊन हा प्रश्न शासन सोडवू शकेल काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, शासकीय सेवेमध्ये असेपर्यंत हे क्वॉर्टर रहाण्यासाठी दिले आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रतिक्षा यादीवरील कर्मचाऱ्यांची संख्या देखील फार मोठी आहे. नियमित शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना आपण आतापर्यंत निवासस्थान रहाण्यासाठी देऊ शकलेलो नाही. त्यामुळे याबाबत आपण धोरण स्वीकारावयाचे काय? आज वांद्रे येथील शासकीय वसाहतीतील घरे मालकी हक्काने दिली तर संपूर्ण राज्यामधून अशीच मागणी करण्यात येईल. त्यामुळे सर्व ठिकाणी आपल्याला देता येणे शक्य आहे काय? अशाप्रकारचे गुंतागुंतीचे प्रश्न यामध्ये आहेत. आणि म्हणून हा विषय न्यायप्रविष्ठ असल्यामुळे तूर्त याबाबत अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही. याबाबतची शासनाची भूमिका शासन न्यायालयामध्ये स्पष्ट करील.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:00

(**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**)

ता.प्र.क्र.1883 . . . .

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय,आता माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे.परंतु मी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या 128 एकरामध्ये शासनाच्या या जमिनीवर 30 एकरामध्ये अतिक्रमण झालेले आहे. या 30 एकर जागेमध्ये ती माणसे 5 वर्षेही राहिलेली नाहीत. दुसरीकडे आपण 2000 पर्यंतच्या झोपडपट्टीवासियांना रेग्युलराईज करीत आहोत. आपण त्यांना मोफत गाळे देणार आहोत. पण ज्यांनी गेली 25 ते 30 वर्षे शासनाची सेवा केलेली आहे, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून, विविध जिल्ह्यातून आलेल्या कर्मचाऱ्यांनी घाम गाळून सेवा केलेली आहे, तो शासकीय क्वॉटर्स् फुकट मागत नाही हा विचार आपण पहिल्यांदा डोक्यातून काढून टाकावा. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, ज्याप्रमाणे धारावी येथे पुनर्विकास करीत आहात, तसा याठिकाणी आमच्यासाठी देखील पुनर्विकास करावा. त्यामध्ये तुमच्या ज्या काही क्वॉटर्स् ठेवावयाच्या असतील, त्या ठेवाव्यात. इत:पर जी जागा राहील, त्यामध्ये आम्हाला जागा द्याल काय ? असा प्रश्न मांडलेला आहे, त्याला आपण उत्तर द्यावे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य बोलतात.)

**उपसभापती** : 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य बोलतात.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर सदनासमोर येऊ द्यावे. प्लीज.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारावा. परंतु ते लांबलचक भाषण करीत आहेत.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, त्याठिकाणी अतिक्रमण आहे. परंतु एस.आर.ए. अंतर्गत असे करणे शक्य आहे काय ? तसेच याबाबतीत सकारात्मक दृष्टीकोनातून काय मार्ग काढता येईल हे तपासून पहाण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना एवढीच विनंती करावयाची आहे की,बांद्रा येथील वसाहतीची रि-डेव्हल्पमेंट होणार आहे.ज्याप्रमाणे आपण बाकीच्या ठिकाणी विविध कारणासाठी एफ.एस.आय.वाढवून दिलेला आहे.आता ही बाब नगरविकास

. . . .एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1883 . . . .

श्री.विनोद तावडे . . . .

विभागाकडे जाणार आहे की सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जाणार आहे ? तसेच या दोघांमधील भांडण मिटलेले आहे की नाही हे मला माहिती नाही. पण यांच्यातील भांडण मिटेल. आता फक्त प्रतिक्षा यादीवर 800 जणांची नावे आहेत. त्यामुळे आपण .5 इतका जरी एफ.एस.आय.वाढविला तरी सुध्दा या 800 जणांचा प्रश्न सुटू शकतो. त्यामध्ये काही अडचण येणार नाही आणि वर ॲडिशनल जो रहातो, त्यामध्ये जे कोणी बांधकाम करणारे लोक आहेत, त्यांनाही याचा फायदा होणार आहे. त्यामुळे ज्यांनी आपल्या सरकारसाठी आयुष्यभर खस्ता खाऊन काम केलेले आहे, त्यांच्यासाठी यापूर्वी माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी जसा निर्णय घेतला होता, त्याप्रमाणे आपणही तसा निर्णय घेऊन शासकीय कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्याल या अपेक्षेने ते वाट पहात आहेत. तसेच ते कोर्टामध्ये स्वेच्छेने गेलेले नाहीत. त्यावेळीही शासनाकडून "नाही" असे उत्तर आले म्हणून ते कोर्टामध्ये गेले. मग ते लगेच केस विड्रॉ करतील. मग आपण याबाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करुन निर्णय घेऊ असे जर म्हटले तर त्या लोकांना बरे वाटेल.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. मी पहिल्यांदा सांगू इच्छितो की, नगरविकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद नाही. याबाबतीत शासन म्हणून निर्णय होईल. यामध्ये कोणत्याही विभागांमध्ये वाद असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांना जे अभिप्रेत आहे, त्याबाबतीत ती स्पष्टता आणलेली आहे, त्यामुळे यामध्ये काही दुसरा विषय नाही. सभापती महोदय, दुसरी जी गोष्ट आहे, त्याबाबतीत मी सुरवातीलाच स्पष्ट केलेले आहे की, याबाबतीत विचारपूर्वक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. सन्माननीय सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन याबाबतीत काय करणे शक्य आहे ते आम्ही तपासून पाहू.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचा सन 2008-2009 चा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा सन 2007-2008 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा(कृष्णा खोरे) मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन 2006-2007 चा महालेखापाल, महाराष्ट्र-1 यांचा लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** :अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळचा सन 2006-2007 व 2007-2008 चा अनुक्रमे अकरावा व बरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.सय्यद मुझफ्फर हुसेन ( समिती प्रमुख ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीची बैठक मंगळवार दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजी दुपारी 2.00 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. या बैठकीमध्ये श्री. महादेवराव महाडिक, वि.प.स. यांच्या रजेचा अर्ज विचारत घेण्यात आला.

श्री. महादेवराव महाडिक, वि.प.स. हे स्वत:च्या आजारपणामुळे दिनांक 10 मार्च ते 24 मार्च, 2008 एकूण 15 दिवस तसेच दिनांक 27 मार्च, 2008 ते 24 एप्रिल,2008 एकूण 29 दिवस विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याने त्यांनी केलेल्या अर्जावर समितीने विचार केला. तसेच विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्यासंबंधी त्यांनी रजेच्या अर्जात दिलेली कारणे ग्राहय धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थितीत राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीची शिफारस सभागृहाने संमत करावी असा प्रस्ताव मी मांडतो.

**उपसभापती** : सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर झाला. समितीने सादर केलेल्या अहवालात श्री. महादेवराव महाडिक, वि.प.स. यांना अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीसाठी विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी शिफारस केलेली आहे.तरी अनुमती द्यावी काय? (थोडे थांबून) अनूमती देण्यात येत आहे. संबंधित सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला ओचित्यचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी या सभागृहात खालील विषयावर औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

महाराष्ट्र राज्य 1 मे, 1960 रोजी स्थापन झाले व महाराष्ट्र राज्य स्थापनेचे हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष असून नागपूर या उपराजधानीत सुवर्ण महोत्सवी वर्षातील तसेच 12 व्या विधानसभेचे पहिलेच अधिवेशन आहे हे औचित्य साधून मी खालील प्रमाणे सरकारकडे मागणी व सूचना करीत आहे.

105 जणांच्या बलिदानानंतर महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त 105 हुतात्म्यांना नम्र अभिवादन व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने या 105 हुतात्म्यांना स्वातंत्र सैनिकाचा दर्जा द्यावा तसेच या हुतात्म्यांच्या वारसांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त किमान पाच लाख रुपयांचे विशेष अनुदान द्यावे अशी मी सूचना व मागणी करीत आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

**उपसभापती** :सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला ओचित्यचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मी या सभागृहात खालील विषयावर औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

" सभापती महोदय, जी.आर.क्रमांक-1808/प्र.क्र.11/9. सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई-32. या जी.आर. अन्वये तेलबिया, सर्की, ऊस, तुती याच्यापासून प्रक्रया उद्योग करण्यावर बंधन घातले आहे. या उद्योगांना नकारार्थी उद्योग संबोधले आहे. मराठवाडयात बीड जिल्हयामध्ये कापूस, ऊस, तुतीच्या बाबतीत हा जिल्हा अग्रक्रमात असताना या जी.आर.मुळे शेतकऱ्यांना उद्योग करण्यापासून वंचित रहावे लागत आहे. हा जी.आर. स्थगित करावा ही विनंती.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील निगुडे येथील काही पूर्वीची घरे असताना बेघर म्हणवून घेणारे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी हे घरकुल योजनेचा लाभ घेऊन आलिशान आर.सी.सी. घरे बांधतात व घरकुल योजनेच्या शासनाच्या नियमांचे उल्लंघन करतात. या प्रकरणी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी, ओरोस, सिंधुदुर्ग यांना निवेदने देऊनही कोणतीही चौकशी न होणे, वारंवार पाठपुरावा करुनही कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे दिनांक 21.12.2009 पासून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या कार्यालयासमोर ग्रामपंचायत सदस्यांनी ग्रामस्थांसह आमरण उपोषणास बसण्याचा दिलेला इशारा, याबाबत चौकशी करुन संबंधित लाभार्थी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

---

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई शहरात आज 3250 लक्ष लीटर पाणी लागते आणि मुंबई शहरात आज पाण्याचा तुटवडा दिसून येत आहे. हे पाणी खंडित तत्वावर पुरविले जाते. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, आम्ही टॉवरचे पाणी बंद करणार. मात्र मुंबईतील पाणी गळती आणि पाणी चोरी विषयी काय करणार याबाबत कोणत्याही प्रकारचे निवेदन केले नाही. मला माहीत आहे की, मुंबई महानगरपालिकेने याबाबतीत कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र सुजल मुंबई अभियान राबविण्यात येणार आहे. दुरेक्षा दर संच रचना या योजनेची अंमलबजावणी झालेली आहे. या सर्व सर्वेक्षणात असे दिसून आले की, मुंबईतील 50 टक्के जलमापके नादुरुस्त अवस्थेत आहेत त्यामुळे मुंबईकर किती पाणी वापरतात याचा मागमूस लागत नाही. त्यामुळे महसुलामध्ये मोठ्या प्रमाणावर घट येते. माझी या औचित्याच्या मुद्याव्दारे अशी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्याप्रमाणे टॉवरचे पाणी तोडण्याचे आदेश

...2...

RDB/ KGS/ ST/

डॉ. दीपक सावंत .....

दिले त्याप्रमाणे मुंबईतील जी 50 टक्के जलमापके आहेत ती ताबडतोब काढून नवीन जलमापक यंत्रे बसविण्याचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला द्यावेत.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये पाणी देणे, त्या पाण्याचा सर्व हिशेब ठेवणे, नवीन पाईपलाईन टाकणे तसेच इतर जे काही करावयाचे असेल ते मुंबई महानगरपालिकेने करावयाचे आहे. ही गोष्ट खरी आहे की, सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आता या पाण्यावर काही तरी निर्बंध आणावे लागतील. त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन हे सांगितले. आता सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, मुंबई महानगरपालिकेला अशा प्रकारचे आदेश द्यावेत. मुंबई महानगरपालिका ही एक सार्वभौम, स्वतंत्र अशा प्रकारची संस्था आहे आणि त्या संस्थेला शासनाने अशा प्रकारचे आदेश परत परत देणे उचित आहे असे वाटत नाही. तेही ज्यावेळेला मुंबई महानगरपालिका वर्षानुवर्षे शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, शासनाने मुंबई महानगरपालिकेला परत परत आदेश द्यावेत हे सन्माननीय सदस्यांना आवडत असेल तर माझे काही म्हणणे नाही.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

मुंबई महानगरपालिका एक स्वतंत्ररित्या काम करणारी संस्था आहे, त्यांचा वेगळा कायदा आहे, स्वतंत्र कायद्यानुसार ते काम करीत आहेत. त्यांच्या रोजच्या कामात हस्तक्षेप करुन शासनाने त्यांना आदेश द्यावेत की नाही याबद्दल माझ्या मनामध्ये शंका आहे. सन्माननीय सदस्यांनी त्या महानगरपालिकेतील त्यांच्या महापौरांना किंवा स्थायी समितीला सांगितले तर हे काम सहज होण्यासारखे आहे. शासनाने स्वत:हून महानगरपालिकेला पुन्हा पुन्हा आदेश द्यावेत असे मला वाटत नाही.

**उपसभापती** : मुंबई महानगरपालिकेचा पाण्याचा हा गंभीर प्रश्न आहे. मुंबई महानगरपालिकेला ठाणे जिल्हयातून पाणी जात असते. परंतु ठाणे जिल्हयाला पाण्यापासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने याबाबत विचार करणे आवश्यक आहे. पाणी धोरण ठरविण्याबाबत शासनाने हस्तक्षेप करावा असे मला वाटते.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्यामुळे शासनाने वेळोवेळी पॅकेजेस जाहीर केली आहेत. तथापि, अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. केंद्र व राज्य शासनाची कर्जमाफी व कर्जाचे पुनर्वसन करुनही शेतमालाला योग्य भाव न मिळाल्याने राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा कर्जाच्या विळख्यात अडकणे, खते-बियाण्यांचा तुटवडा शेतकऱ्यांच्या आर्थिक जखमा चिघळण्यास कारणीभूत होणे, त्यातच अवर्षण व दुष्काळामुळे शेतकरी हवालदिल होणे, पॅकेज, कर्जमाफी, पुन्हा कर्जबाजारीपणा या चक्रव्यूहात बळीराजा पुरता अडकतो. 9 डिसेंबर, 2005 रोजी 1,075 कोटी रुपयांचे मुख्यमंत्री पॅकेज विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयांसाठी असणे, 1 जून, 2006 ला 3,750 कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज, विदर्भातील सर्वाधिक आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी 29 फेब्रुवारी, 2008 रोजी केंद्र शासनाने 60 हजार कोटी रुपयांची कर्ज व सवलतीची घोषणा, परंतु कर्जमाफीचा लाभ

2...

श्री.अरविंद सावंत...

मिळालेला शेतकरी पुन्हा कर्जबाजारी झालेला असून दोन वर्षांच्या दुष्काळामुळे नव्याने घेतलेल्या कर्जाची रक्कम परत करण्याची त्याची ऐपत राहिली नाही. परिणामी कर्जमाफीची नंतरची शेतकऱ्यांची विवंचना वाढली असून आजही शेतकरी आत्महत्या करीत असून राज्यातील विशेषत: विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना त्यांना पाणीपुरवठा, कृषी अवजारे, शेती मालाला रास्त भाव आदि देऊन त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शासनाने काही उपाययोजना केली आहे काय याबाबत शासनाने तातडीने निवेदन करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कल्याण मोहने येथील नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापनाने कंपनीत टाळेबंदी जाहीर केल्याने सदर कंपनीच्या कॉलनीमध्ये सुमारे 988 कामगारांची कुटुंबे वर्षानुवर्षे रहात असून, सदर कॉलनी तोडण्याचा कंपनीच्या व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयामुळे सदर कंपनीच्या वसाहतीत राहणाऱ्या शेकडो कामगार रस्त्यावर येणे, एनआरसी कंपनीने आपले एक एक प्लॅन्ट बंद करुन कामगारांची केलेली उपासमार व आर्थिक कोंडी, सदर कॉलनीतील पाणी पुरवठयाचे सात कोटी कल्याण पालिकेची थकबाकी असणे, कामगारांच्या सोसायटीचेही 15 कोटी थकविले असणे, तसेच कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचेही कोट्यवधी रुपयांची व्यवस्थापनाकडे असलेली थकबाकी, कंपनीच्या सर्व गैरव्यवहारामुळे कामगारांची रास्त व न्याय कोट्यवधी रुपयांची देणी थकल्याने तेथील हजारो कामगारात पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट याबाबत शासनाने सदर कंपनीतील कामगारांच्या रास्त देण्याबाबत व कोट्यवधी रुपयांची जमिनीची किंमत असताना ती कमी दाखवून शासनाचा महसूल बुडविल्याने या प्रकाराची चौकशी करुन तात्काळ निवेदन करावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

3...



NTK/ ST/ KGS/

**उपसभापती** : नॅशनल रेयॉन कंपनीसंबंधी एक गंभीर गोष्ट आहे. या कंपनीच्या जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सांवत यांनी या कंपनीतील 988 कामगारांचा उल्लेख केला आहे. शासनाच्यावतीने या कंपनीला लागेल ती मदत देण्यात आलेली आहे. परंतु ही कंपनी शासनाच्या डोळयात धूळफेक करुन जमीन विक्रीचे व्यवहार करीत आहे. या व्यवहाराला शासनाने परवानगी दिली असेल तर ती स्थगित करण्यात यावी किंवा परवानगी मागितली असेल तर ती देऊ नये अशाप्रकारची स्पष्ट सूचना मी शासनाला करीत आहे.

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, शासनाच्यावतीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

-----

यानंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपल्या औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना आपण अनेक कायदे बनवित असतो. परंतु अधिवेशन चालू असताना आणि नसताना देखील घराघरामध्ये कोणाचे राज्य चालू असते तर ते जाहिरातीचे चालू असते. या सदनामध्ये यापूर्वी या जाहिरातींच्या संदर्भात शासनाचे लक्ष वेधलेले आहे. "अमूल मॅचो" ही एक आंतर्वस्त्राची जाहिरात वाहिन्यांवरुन वर्षभर सातत्याने दाखविली जात आहे. या जाहिरातीच्या आधीच्या भागामध्ये एक चित्र आहे, त्या चित्रामध्ये एका मुलीचा स्कर्ट ओढताना दाखविलेले आहे की, मर्दा ऊठ, अशा प्रकारची जाहिरात दाखविलेली आहे. अनेक वाहिन्यांवरुन ही जाहिरात सातत्याने दाखविली जाते. माझा मुद्दा असा आहे की, नाटक, चित्रपट याबाबतीत सेन्सॉर बोर्ड आहे. परंतु सद्भिरुचीला सोडून ज्या जाहिराती दाखविल्या जातात त्याबाबतीतही महाराष्ट्र शासनाने मार्गदर्शक बोर्ड निर्माण करावे. वर्तमानपत्रामध्ये देखील औषधांच्या पानभर जाहिराती देऊन रोग कसे बरे होतात हे लोकांवर ठसविण्याचा प्रयत्न केला जातो. या वर्तमानपत्रातून येणा-या जाहिराती तसेच "अमूल मॅचो" सारख्या जाहिराती सद्भिरुचीला धरुन नाहीत. या जाहिरातीबद्दल शेकडो महिलांनी अनेक मंचावर तक्रारी केलेल्या आहेत. तेव्हा या अनिष्ट जाहिरातींच्या संदर्भात आपण योग्य तो निर्णय घ्यावा अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

---

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग तालुक्यातील दोडामार्ग तालुक्याचे तहसीलदार रविंद्र बावीस्कर यांना कुंब्रल येथील खडी वाहतूक प्रकरणात 30 हजार रुपयाची लाच स्वीकारताना दिनांक 15.12.2009 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी रंगेहात पकडलेले आहे. महिन्याभरापूर्वी साटेली-भेडशी तलाठी श्री.आर.वाय. राणे यांना लाच स्वीकारताना अटक करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये महसूल विभागाच्या कर्मचा-यांना लाच स्वीकारताना पकडण्याचे प्रकार वारंवार घडत आहे. तेव्हा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...)

माननीय महसूल मंत्र्यांच्या जिल्ह्यात महसूल विभागातील ज्या कर्मचा-यांना लाच स्वीकारताना पकडण्यात आलेले आहे त्यांच्यावर कडक कारवाई होण्याच्या दृष्टीने मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी आजच सकाळी आय.जी.जी.एम.सी. आणि मेयो हॉस्पिटलला भेट दिली. या मेयो हॉस्पिटलची अवस्था अशी आहे की, त्यापेक्षा एखादे प्राथमिक आरोग्य केंद्र बरे. आय.जी.जी.एम.सी.चा व्हर्टिकल एक्स्पान्शनचा प्रोजेक्ट अडून पडलेला आहे. या व्हर्टिकल एक्स्पान्शन संबंधी सातत्याने याठिकाणी प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. दुर्दैवाने व्हर्टिकल एक्स्पान्शनसाठी कोणीही विकासक पुढे यावयस तयार नाही. हे व्हर्टिकल एक्स्पान्शन होणार होणार असे म्हणून आता लोकांचे, डॉक्टरांचे, नर्सेसचे, स्टाफचे मोराल डाऊन झालेले आहे. प्रत्येक जण काम न करण्याच्या भूमिकेमध्ये आहे. कॅझ्युअलटीत मेडिकल ऑफिसर नव्हते. ऑर्थोपेडिक, रेडिओलॉज़ी याठिकाणी डॉ. राठीसारखे स्पेशालिस्ट नव्हते.या औचित्याचया मुद्याद्वारे माझी अशी विनंती आहे की, नागपूरला इंदिरा गांधी यांच्या नावाने दिलेले हे प्रमुख हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलच्या एक्स्पान्शनचा प्रोजेक्ट मागील तीन वर्षापासून रखडलेला आहे. फक्त 10 कोटी रुपये या हॉस्पिटलला मिळालेले आहेत. बाकीची आर्थिक मदत ही इक्विपमेंटसाठी मिळालेली आहे. सभापती महोदय, या महत्वाच्या प्रश्नासंबंधी माझी आपणास अशी विनंती आहे की, आपण वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. विजयकुमार गावित आणि अन्य संबंधित अधिकारी यांची आपल्या दालनात एक बैठक बोलवावी आणि या हॉस्पिटलची दूरवस्था लवकरात लवकर कशी दूर होईल आणि एक्स्पान्शन प्रोजेक्ट कसा लवकरात लवकर कार्यान्वित होईल यादृष्टीने चर्चा करुन ताबडतोबीने धोरणात्मक निर्णय घ्यावा.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विदर्भातील जनतेच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा आणि ज्वलंत प्रश्न आहे. विधिमंडळाचे अधिवेशन नागपूरला होत आहे. या विषयाच्या संदर्भात सोमवार, दिनांक 21.12.2009 रोजी सकाळी 11.00 वाजता माझ्या दालनात मी बैठक आयोजित करतो. या बैठकीस संबंधित मंत्री महोदय आणि संबंधित अधिका-यांनी हजर रहावे अशी मी त्यांना सूचना देत आहे.

डॉ. दीपक सावंत : उपसभापती महोदय, धन्यवाद.

---

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, राज्यात शेतीच्या व्यवसायात अनेकदा नैसर्गिक आपत्ती येऊन शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होते. त्यासाठी शासन स्तरावरुन नेहमीच नुकसान भरपाई देण्यात येते. परंतु शेती व्यवसाय करताना होणारे अपघात हे मुख्यत: वीज पडून, पाण्यात बुडून मृत्यू होणे, सर्प दंश, विंचू दंशाने मृत्यू होणे, जंतूनाशकामुळे शेतकरी व शेतमजुरांचे बळी जातात. यासाठी शासनाने शेतकरी विमा योजना सुरु करणे ही काळाची गरज आहे. शेतातील अपघातात सर्वात जास्त बळी शेतकऱ्यांचे होतात. त्यांच्या कुटुंबियांना कोणताही चरितार्थाचा आधार नसतो. म्हणून शेतमजुरांसाठी स्वतंत्र विमा योजना त्वरेने शासन स्तरावर लागू होण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी अशी मी या औचित्याचा मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असून हुंडयासाठी खून होणे, हुंडाबळी, हुंडयासाठी आत्महत्येस प्रवृत्त करणे, बलात्कार, अपहरण, कौटुंबिक अत्याचार, विनयभंग, लैंगिक छळ, एकतर्फी प्रेमातून हत्या, मंगळसूत्र खेचून नेणे, कौटुंबिक हिंसाचारामध्ये छळ होणे अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. या घटनांपासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तयार केलेल्या 2005 च्या अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्यामुळे महिला वर्गामध्ये प्रचंड असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे राज्यभरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करणे गरजेचे आहे. या संदर्भात तातडीने उपायोजना व कारवाई करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ KGS/ 12:25

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 च्या सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "मुंबईतील सायन कोळीवाडा, वडाळा येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेंतर्गत प्रकल्प विकासक मे.आकृती सिटी यांना विकसित करण्यासाठी देण्यात येणे, सदर जमिनीवर एकत्रितपणे विकास करण्यासाठी गृहनिर्माण विभागाने निविदा मागविणे आवश्यक असूनही त्या न मागविताच प्रस्ताव मंजूर करुन तो विकासकास विकसित करण्यास मंजुरी देणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "शासनाने आश्रम शाळातील विद्यार्थ्यांना प्रति महिना 15 किलो धान्य बीपीएल दराने देण्याचा निर्णय घेऊनही मागील दोन वर्षापासून नागपूर जिल्हयातील आश्रमशाळांना धान्य पुरवठा न होणे, तसेच पदे न भरणे, वाढत्या महागाईमुळे भोजन खर्च न भागणे इत्यादी मागण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "स्वयंभू कोकण गृहनिर्माण संस्था नियोजित, मुंबई यांनी प्रामुख्याने मागासलेल्यांचा भरणा असलेल्या लोकांकरिता उच्च, मध्यम व अल्प उत्पन्न गटाच्या सदनिका म्हाडाकडून मिळण्याची मागणी करुनही त्या मागणीचा शासनाकडून विचार न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना सन 2009 या वर्षापासून केंद्र शासनाने सहावी ते आठवीतील सर्व गटातील विद्यार्थ्यांसाठी लागू करणे, या योजनेचे काम पाहणाऱ्यचा शिक्षक कर्मचाऱ्याला प्रतिवर्ष मानधन देय असूनही तो त्यांना वेळेवर न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**............

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "राज्यातील 80 टक्केपेक्षा जास्त खनिज संपत्ती विदर्भात असून त्या आधारावर अनेक उद्योग उभे असून या भागातील मागासलेपणा व अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने तसेच बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अशोक मानकर, नितीन गडकरी, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "राज्यात विशेषत: भंडारा, गोंदिया जिल्हयात मालगुजारी तलावांची संख्या जास्त असून गोडया पाण्यातील मत्स्य व्यवसायाला पोषक वातावरण असून मासेमारीस प्रोत्साहन देऊन या व्यवसायासंबंधी सुस्पष्ट धोरण आखणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी "नागपूर शहरात गॅस्ट्रो, स्वाईन फ्लू, डेंगू मलेरिया इत्यादी साथींचा मोठया प्रमाणावर फैलाव असणे, तसेच दूषित पाण्यामुळे मोठया प्रमाणात साथीचे रोग सुरु असून त्यावर शासनाची कोणतीही उपाययोजना नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील वितरण व्यवस्थेला शासनाकडून मिळत असलेला अपुरा धान्य पुरवठा व अत्यल्प कमिशन यामुळे वितरण व्यवस्थेला लागलेले भ्रष्टाचाराचे ग्रहण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील यांनी "मालाड, मुंबई येथील नवजीवन एसआरए को.ऑ.हौ. या नियोजित सोसायटीच्या पुनर्वसन योजनेंतर्गत सर्वे केला असता त्यात पदाधिकाऱ्यांनी एकापेक्षा जास्त खोल्यांचे वाटप करणे, तसेच मृत व्यक्तिंच्या नावे खोल्यांचे वाटप करुन विकासकाने गैरप्रकार केल्याबाबत" या विषयावर

..5..



SGB/ ST/ KGS/ 12:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**............

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत यांनी "सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये 40 मागासवींय कर्मचाऱ्यांना डावलून खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांना नियमबाह्य पदोन्नती देणे तसेच 148 कंत्राटी कामगारांची नियमबाह्य भरती करणे, कोट्यवधी रुपयांचे कर्ज वाटप करताना त्याचे ऑडिट न होणे इ.बँकेच्या गैरकारभाराबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील आरोंदा किरणपाणी या गोव्याच्या सीमेवर समुद्रालगत असलेल्या सुमारे 800 एकरचे तयार झालेले बेट, या बेटाच्या तिन्ही बाजूंनी खळी असून कांदळ वन असणे, न्यायालयाने सदर कांदळ वनाचे संरक्षण करण्याचे आदेश देऊनही त्या आदेशाचे पालन न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "दिनांक 14 नोव्हेंबर, 2009 रोजी आकोट येथील अंबिका ज्वेलर्सचे मालक श्री. निलेश भोरे यांच्यावर 3 अज्ञात लुटारुंनी सशस्त्र हल्ला करुन 45 लाख रुपयांचे दागिने लुटून पोबारा करणे, सदर आरोपींना पकडण्यास पोलिसांना आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

----------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: येरवडा (पुणे) तुरुंगातील बाल सुधारगृहातून 12 मुले पळून जाणे

**मु.शी.**: येरवडा (पुणे) तुरुंगातील बाल सुधारगृहातून 12 मुले पळून जाणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुभाष झनक (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "येरवडा (पुणे) तुरुंगातील बाल सुधारगृहातून 12 मुले पळून जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर मी स्वत: या येरवडा कारागृहाला भेट दिली तो दिवस 14 नोव्हेंबर, बालदिनच होता. निवेदनात मात्र असे सांगण्यात आले की, पुस्तके आणि वर्तमानपत्रे तसेच थोर नेत्यांची आत्मचरित्रे वाचण्यासाठी या मुलांना पुरविली जातात. परंतु असे मला काहीच दिसून आले नाही, म्हणून निवेदनात दिलेली माहिती असत्य आहे. मला तेथील मुलांनी तसेच अधीक्षकांनी सुध्दा सांगितले की, येथे कोणत्याही प्रकारची पुस्तके दिली जात नाहीत. ही मुले भिंत फोडून पळून गेली व त्यानंतर सेवकांवर कारवाई करण्यात आली आहे. महिला व बालविकास विभागाकडून असा प्रस्ताव देण्यात आला आहे की, या तुरुगात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था केली तर बालगृहातील अधीक्षकाला सर्वच दिसेल. कारण बऱ्याच वेळा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली मोठी मुले लहान मुलांना त्रास देत असतात. तसेच या ठिकाणी अतिशय दुर्गंधीयुक्त वातावरण आढळून आले असून जी मुले पळून गेली त्यामध्ये सेवक वर्गही सामील होता. म्हणून सेवक वर्गाची केवळ बदली करुन चालणार नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्याचीही गरज आहे. कारण अशा प्रकारे रेकॉर्ड असलेला सेवक वर्ग दुसऱ्या ठिकाणी बदलून गेल्यानंतर देखील तेच काम करणार. म्हणून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार काय ?

श्री. सुभाष झनक : महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या चांगल्या सूचना केल्या त्यांच्या संदर्भात स्वत: त्यांच्यासोबत या तुरुंगाला भेट देण्यात येईल व तेथे जे जे करण्यासारखे आहे ते सर्व करण्याचा प्रयत्न केला जाईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा व राज्य समितीने शिफारस करुनही
मराठी माध्यमाच्या शाळांना अनुमती नाकारणे

**मु.शी.**: जिल्हा व राज्य समितीने शिफारस करुनही
मराठी माध्यमाच्या शाळांना अनुमती नाकारणे यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बाळासाहेब थोरात (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे यांनी जिल्हा व राज्य समितीने शिफारस करुनही मराठी माध्यमांच्या शाळांना अनुमती नाकारणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने दि 29 एप्रिल, 2008 च्या शासन परिपत्रकान्वये राज्यातील संस्थांकडून विविध माध्यमाच्या शाळा सुरु करण्यासाठी प्रस्ताव मागविले होते, हे सर्व प्रस्ताव जिल्हा स्तरावरील समितीमार्फत शिफारस होऊन राज्याकडील समितीकडे पाठविण्यात आले. तसेच राज्याच्या स्तरावरील समितीनेही शिफारस करुन शासनाकडे आलेले आहेत. या प्रस्तावांपैकी शासनाने फक्त इंग्रजी, ऊर्दू, कन्नड माध्यमाच्या शाळांनाच मान्यता दिलेली आहे. तसेच जे प्रसताव शिफारशीसह शासनाकडे आलेले आहेत ते संपूर्ण प्रस्ताव शासनाने निर्णय घेऊन रद्द करण्यात आले. ज्या मराठी भाषिक संस्थांनी शाळांची मागणी केली होती त्या ठिकाणी आवश्यकता असतानाही त्यांना मान्यता न देणे हे अन्यायकारकच आहे. या निमित्ताने माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 29 एप्रिल, 2008 च्या परिपत्रकान्वये जे प्रस्ताव प्राप्त झाले त्यांच्यापैकी ज्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांना दोन दोन शिफारशी असूनही मान्यता नाकारण्यात आली त्यांना शासन मान्यता देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते..

तसेच यावर्षी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक आणि माध्यमिकच्या किती शाळांना मान्यता देण्यात आलेली आहे याची माहिती देण्यात यावी तसेच बृहत आराखडा आपण केव्हा पूर्ण करणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, बृहत आराखडा कच्चा तयार झालेला आहे. बृहत आराखडया प्रमाणे जागा भरण्याची कार्यवाही सुरु करीत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, मराठी माध्यमाच्या शाळांना शासन मान्यता देत नाही. परंतु मला यासंदर्भात असे सांगावयाचे आहे की, मराठी माध्यमाच्या माध्यमिकच्या शाळांना पूर्वी मान्यता देण्यात आली होती त्यावेळी "कायम विनाअनुदान" असा शब्द वापरण्यात आला होता परंतु आता "कायम विनाअनुदानचा" "कायम" हा शब्द काढून टाकून मराठी शाळांना मान्यता द्यावी अशी मागणी करण्यात आलेली आहे परंतु तशी मान्यता मराठी शाळांना देण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. बृहत आराखडयाच्या संदर्भात मंत्रीमंडळाने सूचना दिलेल्या असल्यामुळे आम्ही बृहत आराखडा करीत आहोत.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पनवेल-महाड-पणजी या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करणे

मु.शी.: : पनवेल-महाड-पणजी या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण,रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. छगन भुजबळ ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी पनवेल-महाड-पणजी या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणातील पत्रकारांनी आज कशेळी घाटामध्ये उपोषण सुरु केले आहे. हा एनएचएआयचा प्रोजेक्ट आहे याची मला माहिती आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांची ताकद आम्हाला बिहारच्या मेळाव्यात आणि दिल्लीच्या मेळाव्यात पाहायला मिळालेली आहे. माननीय उपमुख्यमंत्री साहेब जेव्हा कोकणात आले होते त्यावेळी पनवेल-महाड-पणजी रस्त्याच्या चौपदरीकरणाची घोषणा केली होती. या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या संदर्भात दिल्लीतील एनएचएआयने मान्यता दिली तर या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर होऊ शकते. लोकशाही आघाडी शासनाने निवडणुकीच्या वेळी कोकणातील हा रस्ता चौपदरी करण्याच्या बाबतीत घोषणा केली होती. सभापती महोदय, या रस्त्यावर जी दुरुस्ती होते ती दुरुस्ती सुध्दा अपघाताचे एक प्रमुख कारण आहे. हा रस्ता दुरुस्त करतांना केवळ डांबराचा थरावर थर दिला जातो व वळणावर हा रस्ता डांबराच्या थरामुळे विचित्र तयार होतो. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीमध्ये दोन पॅच असे आहेत की, त्या ठिकाणचा ठेकेदार वर्षानुवर्षापासून या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम करतो आहे. या रस्त्याच्या वळणावरच अपघात होतात व हे अपघात फॅटल अपघात असतात. जर या रस्त्याच्या चौपदारीकरणासाठी आपण एनएचएआयकडे आग्रह धरला तर या रस्त्याच्या चौपदरी करणाचे काम लवकर सुरु होईल. त्यामुळे या रस्त्याच्या चौपदरी करणाच्या कामाला केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे तसेच या रस्त्याची दुरुस्ती चुकीच्या पध्दतीने करणा-या ठेकेदारावर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. छगन भुजबळ : उपसभापती महोदय, पनवेल-महाड-पणजी हा राष्ट्रीय महामार्ग 475.200कि.मी.लांबीचा आहे. यामध्ये गोव्याच्या बाजूचा जो भाग आहे, म्हणजे 450 /200 ते 471/708 या 21.50 कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम सुरु आहे. या कामावर 183.43 कोटी रुपये खर्च करुन झाराप ते पत्रादेवीच्या रस्त्याचे काम सुरु केलेले आहे. तसेच मुंबईपासून पळस्पे ते इंदापूरचा रस्ता 0/0 ते 84/00 कि.मी. पर्यंत आहे. या रस्त्याचा प्रकल्प सल्लागाराने एनएचएआयला सुपुर्द केलेला आहे. या कामासाठी कंत्राटदाराची पूर्वअर्हता निश्चित करण्याची कार्यवाही एनएचएआयने सुरु केलेली आहे. मला स्वत:ला असे वाटते की, या कामाच्या संदर्भात ते एक महिन्यात निर्णय घेतील वर्कऑर्डर दिल्यानंतर पैशाची जुळवाजुळव करण्यासाठी ठेकेदाराला 4-5 महिने लागत असतात. त्यामुळे येत्या सहा महिन्यात हे काम निश्चितपणे सुरु होईल असे मला स्वत:ला वाटते. याकामाच्या संदर्भात आम्ही सातत्याने केंद्रीय मंत्र्यांबरोबर चर्चा करीत असून त्यांच्या बरोबर बैठकाही झालेल्या आहेत. यानंतर श्री. गायकवाड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ..

सभापती महोदय, केन्द्रीय मंत्री श्री. कमलनाथ यांना दिनांक 23.11.2009 रोजी शेवटचे पत्र पाठविण्यात आले होते .84 ते 450 किलोमिटर्समधील काही महत्वाचा भाग राहिलेला आहे त्यासाठी अहवाल तयार करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या असून या निविदा आता प्राप्त झालेल्या आहेत. त्या निविदा नुसार लवकरच प्रोजेक्ट रिपोर्ट करण्याचे काम त्यांना देण्यात येईल अशा प्रकारे राज्य सरकार सातत्याने केन्द्र सरकारकडे आग्रह धरत आहे. या रस्त्यावर काही अपघात झालेले आहेत ही गोष्ट खरी आहे. या अपघातांची वेगवेगळी कारणे पोलिसांनी दिलेली आहेत. वाहन चालवितांना वेग मर्यादेचे पालन न करणे, वाहन सुस्थितीत नसणे, वाहतूक नियमांचे पालन न करणे , मर्यादेपेक्षा जास्त वजन वाहून नेणे, उंच व सखल भागातील वळणा वळणाचे रस्ते इत्यादी कारणे पोलिसांनी सांगितलेली आहेत. या रस्त्यावरुन वाहतूक मोठया प्रमाणावर होत असल्यामुळे हा रस्ता रुंद करणे अधिक गरजेचे आहे . सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याचे गांभीर्य शासनाला आहे आणि त्या संदर्भात राज्य सरकारकडून केन्द्र सरकारकडे अधिक प्रयत्न करण्यात येतील.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. वान्द्रे वरळी सी लिंकवर वांरवार होणारे अपघात

मु.शी. वान्द्रे वरळी सी लिंकवर वारंवार होणारे अपघात यासबंधी

सर्वश्री अनिल परब,परशुराम उपरकर,डॉ.दीपक सावंत,श्री.किरण पावसकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.जयदत्त क्षीरसागर (सार्वजनिक बांधकाम मंत्री): सभापती महोदय, सर्वश्री अनिल परब, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत,श्री.किरण पावसकर यांनी " वान्द्रे वरळी सी लींकवर वारंवार होणारे अपघात " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यत आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, वान्द्रे सी लिंकवर आतापर्यत दोन अपघात झाले असून आज सकाळी एक अपघात झालेला आहे. हे अपघात होऊ नयेत यासाठी कोण्ंती उपाययोजना करण्यात येणार आहे यासंबंधी या निवेदनामध्ये काहीही संगण्यात आलेले नाही. तेथे अपघात कसा झाला आहे यासबंधीची माहिती फक्त या निवेदनात देण्यात आलेली आहे. निवेदनामध्ये असेही म्हटलेले आहे त्यानुसार अजून भीषण अपघाताला आपण सामोरे गेलेलो नाही. तीन अपघात घडल्यानंतरसुध्दा आणखी एखादी गाडी समुद्रात पडण्याची शासन वाट पहाणार आहे काय ?

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की,हे अपघात टाळावयाचे असतील तर स्पीड किती आहे हे मोजणारी स्पीड गन तेथे बसविण्यात येणार आहे काय ? चौपदरीकरणा नंतर सर्व प्रश्न सुटतील हे मलाही मान्य आहे परंतु तोपर्यत कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे ? त्या ठिकाणी अनेक वाहने यु टर्न घेतात तेव्हा तेथे दुभाजक टाकून हा यु टर्न तातडीने बंद करण्यात येणार आहे काय ?

श्री.जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, राजीव गांधी सी लींकवरील अपघातासंबंधी सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्या संदर्भात मी निवेदन केलेले आहे. मी सन्माननीय सदस्याना सागू इच्छितो की,त्या ठिकाणी पूर्वी अपघात घडले असून आज सकाळीसुध्दा अपघात घडलेला आहे. या पूर्वी दिनांक 8 आणि 13 डिसेंबर रोजी दोन अपघात
झाले होते. भरधाव वेगाने वाहने चालविणे, निष्काळजीपणाने वाहने चालविणे. यु टर्न घेणे ,ओव्हर टेक करणे वाहतूकीच्या नियमांचें उल्लंघन करणे ही या अपघाताची कारणे आहेत.

श्री.दिवाकर रावते : या रस्त्यावर सतत अपघात होत असल्यामुळे राजीव गांधी यांची बदनामी होते.

श्री.जयदत्त क्षीरसागर : त्या ठिकाणी कोणाची बदनामी होते हे आपण नंतर शोधून काढू सभापती महोदय, मी आताच सांगितलेल्या तीन चार कारणांमुळे तेथे तीन अपघात घडलेले आहेत. पुन्हा असे अपघात घडू नयेत यासाठी वाहतूक पोलीस शाखे बरोबर संपर्क साधून काही उपाययोजना करण्याचे एम.एस.आर.डी.सीृ.च्या अधिका-यांनी ठरविले आहे. त्यातील पहिली उपयोजना रमलर्स स्ट्रीप्स बसविणे ही आहे,त्या ठिकाणचे तीनही अपघात साधारणपणे सकाळच्या वेळी झालेले आहेत. त्या ठिकाणी रमलर्स स्ट्रीप्स बसविण्यात आलेल्या असून त्याला स्पेशल पेन्टचा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कोट दिलेला असून रात्रीच्या वेळी ते चमकतील. त्याचबरोबर स्पीड ब्रेकरवरुन जातांना थोडासा आवाज होईल जेणेकरुन तेथे स्पीड ब्रेकर असल्याची वाहन चालकाला जाणीव होईल. सन्माननीय सदस्यांनी आजच अपघात झाल्याचे सांगितले आहे. तेव्हा वाहतूक पोलीस शाखेचे जाईन्ट कमिशनर श्री.बर्वे यांच्या बरोबर मी चर्चा केली आहे. त्या ठिकाणी पाच सी. सी. कॅमेरे बसविण्यात आलेले असून त्या संदर्भात. त्यांचे असे म्हणणे आहे की, वरळी येथील कन्ट्रोल रुमशी हे कॅमेरे लींक अप करुन देण्यात यावेत. त्याबाबतीत निर्णय घेण्यात येत असून हे कॅमरे कॅन्ट्रोल रुमशी लींक अप केले जातील. त्या ठिकाणी दोन स्पीड गन असून ....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.क्षीरसागर ....

त्या वाढविण्याविषयी सूचना दिलेल्या आहेत. सभापती महोदय, सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे अपघात होणे टाळावयाचे असेल, अपघात होऊच नये म्हणून काही करावयाचे असेल तर त्या ठिकाणी अजून चार मार्गिका व्हायच्या आहेत त्यांचे काम सुरू आहे ते काम पूर्ण होऊन त्या चार मार्गिका खुल्या करणे आवश्यक आहे. या चार मार्गिकांचे काम मार्च अगोदर किंवा शक्य झाल्यास जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे प्रयत्न आपण करीत आहोत, तसे त्या कंपनीलाही सांगत आहोत. तेव्हा उरलेल्या या चार मार्गिकांचे काम पूर्ण करून त्या लवकरच खुल्या करण्यासाठी एमएसआरडीसी प्रयत्नशील आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या सी-लिंकवर गेल्यानंतर लिलावती हॉस्पिटलकडे गेल्यानंतर लक्षात येते की तेथे यू टर्न घेण्यासाठी जागा नाही. त्यामुळे तेथपर्यंत गेलेले लोक गोंधळतात. त्यामुळे त्या ठिकाणी अगोदर दुभाजकाच्या ठिकाणी लिलावती हॉस्पिटलकडे जाण्यासाठीचा मार्ग असा सूचना फलक लावला तर बरे होईल.

श्री. जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, ही सूचना लक्षात घेण्यात येईल.

***

..... व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ.शी.** : शहरी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतागृहांची सोय पुरेशी नसणे.

**मु.शी.** : शहरी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतागृहांची सोय पुरेशी नसणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. ..

सभापती महोदय, महाराष्ट्रव्यापी आरोग्य संवर्धन मोहीम शालेय विद्यार्थ्यांसाठी म्हणून सुरू करण्यात आली आहे आणि त्यामार्फत विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी आणि शाळांमधील त्यांच्यासाठी असलेली स्वच्छतागृहे यांची सद्यस्थिती कशी आहे याचे पुणे शहरात प्रत्येक विभागवार 50 शाळांमधून सर्वेक्षण करण्यात आले. त्यात असे दिसून आले आहे की, शाळांमध्ये आज मितीस उपलब्ध असलेली स्वच्छतागृहे व स्वच्छ पाणी पिण्याची टाकी या भोवतालची स्वच्छता 39 टक्के इतकी आहे आणि 61 टक्के शाळांमध्ये या गोष्टींचा प्रामुख्याने अभाव आढळला आहे तर 71 शाळांमध्ये या सोयीच नाहीत. सभापती महोदय, पुण्यासारख्या मोठ्या शहरातील जिल्हा परिषदा तसेच महापालिकांच्या शाळा आहत त्याच बरोबर ग्रामीण भागामध्ये असलेल्या शाळांमध्ये विशेषत: मुलांच्या शाळांमध्ये ही परिस्थिती आहे. आता माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत त्यांनी याकडे विशेष लक्ष द्यावे यासाठी मी त्यांना आपल्यामार्फत सांगू इच्छिते की, विशेष करून इयत्ता सातवीनंतरच्या मुली शाळांमध्ये जाण्यासाठी नाराज असतात आणि त्यामागील मुख्य कारण म्हणजे शाळांमध्ये अस्वच्छ स्वच्छतागृह असणे, स्वच्छतागृह बंद असणे हे आहे. त्यामुळे या विशेष उल्लेखाद्वारे मी आपल्याला विनंती करते की, शाळांतील स्वच्छतागृहांच्या बाबतीत चांगले काम व्हावे, त्यासाठी निधीची तरतूद व्हावी आणि जेथे आवश्यक आहे तेथे या स्वच्छतागृहांची दुरूस्ती केली जावी. तरी माझ्या या विशेष उल्लेखाची आपण दखल घेऊन कार्यवाही करावी ही विनंती.

***

..... व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्य वनरक्षक वन कर्मचारी रोजंदारी व वन कामगारांना गेल्या 6 महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची आलेली पाळी.

**मु.शी.** : राज्य वनरक्षक वन कर्मचारी रोजंदारी व वन कामगारांना गेल्या 6 महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची आलेली पाळी याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" सभापती महोदय, राज्य वनरक्षक वन कर्मचारी, रोजंदारी व वन कामगार यांच्या संदर्भात मी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा विशेष उल्लेख करीत आहे. सभापती महोदय, मी दिनांक 13 रोजी नाशिक येथे गेलो असता तेथील वन कर्मचारी कार्यालयाच्या पटांगणात उपोषणाला बसले असल्याचे आणि त्यांनी तेथील गेट पूर्णपणे बंद केले असल्याचे मला दिसून आले. त्याचे कारण विचारले असता तेथील रोजंदारी करणारे वनकामगार आहेत त्यांना 6-6 महिने पगार दिलेला नव्हता त्यामुळे ते लोक एक दिवसाचे काम बंद आंदोलन करीत होते असे समजले. सभापती महोदय, त्या लोकांना नियमितपणे वेतन मिळावे यासाठी शासनाने त्वरित काही उपाय योजना करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधत आहे. शासनाचे याची त्वरित दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी ही विनंती.

***

...... व्ही 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी राज्य व केंद्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांसाठी राखून ठेवण्यात आलेला हजारो कोटी रूपयांचा निधी खर्च न करताच परत जाणे.

**मु.शी.** : आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी राज्य व केंद्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांसाठी राखून ठेवण्यात आलेला हजारो कोटी रूपयांचा निधी खर्च न करताच परत जाणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. ..

" आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या आदिवासींना मुख्य प्रवाहात आणून त्यांना आत्म-निर्भर करण्यासाठी राज्य केंद्र शासनाकडे विविध योजना राबविल्या जाणे, मात्र यासाठी राखून ठेवण्यात आलेला हजारो कोटी रूपयांचा निधी खर्च न करताच शासनाच्या तिजोरीत साभार परत गेल्याची धक्कादायक माहिती फेब्रुवारी 2008 या महिन्यात उघड होणे, सन 2000-01 पासून सन 2005-06 या आर्थिक वर्षात अशा प्रकारे खर्च न करताच शासनाकडे परत गेलेला निधी चक्क एक हजार आठशे तीन कोटी रूपये एवढा प्रचंड असणे, या शिवाय 1993-94 पासूनच्या पुढच्या 14 वर्षात आदिवासींच्या विकासाचा सुमारे सात हजार कोटी रूपये अनुशेष शिल्लक असणे, या प्रकारामुळे कोट्यवधींचा निधी उपलब्ध असतानादेखील आदिवासींची स्थिती मरणासन्न असणे, आदिवासींच्या विकासासाठी सुकथनकर समितीने 1993-94 मध्ये सर्वेक्षण करूनकाही गोष्टींसाठी शिफारस करणे, या शिफारशीत लोकसंख्येनुसार राज्याच्या अर्थसंकल्पातून 9 टक्के निधी आदिवासींसाठी राखून ठेवण्यात यावा, असे स्पष्ट करणे, पत्यक्षात मात्र आदिवासींच्या विकासासाठी 9 टक्के निधी कधीही खर्च न होणे, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी

...... व्ही 5 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

आदिवासी विकासाचा पूर्णपणे बोजवारा उडणे, त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक प्रगतीमध्ये निर्माण झालेला अडसर, ह्या बाबी तातडीने दूर व्हाव्यात यासाठी सदर बाब विशेष उल्लेखाद्वारे मी सभागृहात मांडत आहे. तरी याबाबत सत्वर कार्यवाही व्हावी. "

( यानंतर श्री.सरफरे .... डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अपंग शाळांतील नोकर भरतीबाबत माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करणे

**मु.शी.**: अपंग शाळांतील नोकर भरतीबाबत माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करणे याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अपंग शाळांतील नोकरभरती संदर्भात पाच वर्षापूर्वी केलेल्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत माननीय उच्च न्यायालयाने आदेश देऊनही, त्यांची अंमलबजावणी शासनाने न करणे, सदर कायद्यांची अंमलबजावणी जुन्या शाळांना लागू न करणे, शासनाने विविध खात्यातील नोकर भरतीत केलेली मोठया प्रमाणात कपात, त्यातून अपंग शाळांही न सुटणे, त्यानंतर शासनाने अपंग शाळांसाठी 18 ऑगस्ट, 2004 रोजी नवीन आदेश काढून राज्यभरातील 650 शाळांतील साडे तीन हजार कर्मचारी कपात करण्यात आले. अपंगांच्या बहुतेक शाळा निवासी असून त्यांच्यासाठी काळजीवाहक वैद्यकीय सहाय्यकांचे पद न भरणे, निवृत्त झालेली किंवा नव्याने निर्माण झालेली पदे समाजकल्याण अधिकारी, आयुक्तांच्या ना हरकती शिवाय भरत नाहीत, नवीन आकृतिबंध जुन्या शाळांना लावण्याबाबत माननीय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शासनाला आदेश देऊनही त्यांची अंमलबजावणी झाली नाही. केंद्र सरकारच्या 1995 च्या कायद्यानुसार तीन टक्के रक्कम अपंगांच्या शिक्षण व पुनर्वसनावर खर्च करण्याचे बंधनही शासनाकडून पाळले जात नाही, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

**पृ.शी.**: पाचव्या वेतन आयोगाच्या श्रेणीत कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांवर होत असलेला अन्याय

**मु.शी.**: पाचव्या वेतन आयोगाच्या श्रेणीत कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांवर होत असलेला अन्याय याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी एका बाजूला सुरु असतांना कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना अजून पाचवा वेतन आयोग सुध्दा लागू झालेला नाही" अशा अत्यंत चिंताजनक विषयाकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाचे लक्ष वेधतो.

"राज्यातील पाचवा वेतन आयोगाच्या श्रेणीत कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांवर अन्याय होत राहणे, ही बाब कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणून देणे, तेव्हा शासनाने 3 जून 2000 च्या शासन निर्णय क्र. एच.एस.सी. 1300/(2803/2000)उमासि-1 नुसार 7225-225-11050 प्रथम श्रेणी 8000-275/13500 व्दितीय श्रेणी व 9325-275-14075 निवड श्रेणी-1 मार्च 2009 पासून लागू करणे, महाराष्ट्रातील सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग 1.1.1996 पासून सुधारीत स्वरुपात लागू करणे व कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना तो सुधारीत स्वरुपात 3 जून 2000 पासून लागू करणे, यामुळे कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांचे चार वर्षाचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी त्यांना 1.1.1996 पासून सुधारीत वेतनश्रेणी देण्यात यावी, हा विषय अत्यंत महत्वाचा असल्याने मी विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वरळीच्या पोलीस वसाहतीमधील अनेक इमारती मोडकळीस येणे

**मु.शी.**: वरळीच्या पोलीस वसाहतीमधील अनेक इमारती मोडकळीस येणे याबाबत श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वरळीच्या पोलीस वसाहतीत एकूण 70 इमारती आहेत. प्रत्येक इमारतीत एकूण चौदाशे खोल्या असून वसाहतींना वाळवी, भिंतीला भेगा, छतातून गळणारे पाणी, सोयी-सुविधांची बोंब, अनेक इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. गेली कित्येक वर्षे दुरुस्तीत चालढकल करुन सरकारकडे पैसे नाहीत अशी कारणे सतत पुढे करणे, निकृष्ट राहणीमानामुळे सुमारे 363 पोलिसांचा विविध आजारांनी मृत्यू झाल्याची याचिका उच्च न्यायालयात दाखल होणे, एकंदरीत वरळी वसाहतीत राहणाऱ्या पोलिसांचे हाल "आई जेवू देईना आणि बाप भीक मागू देईना" असेच झाले आहेत. शासन या विषयावर गंभीरतेने पाहून कार्यवाही करण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे".

सभापती महोदय, राज्याचे पोलीस दल हे फक्त कायदा व सुव्यवस्था संभाळण्याचे काम करीत आहे असे नाही तर त्यांनी 26/11 रोजी झालेल्या हल्ल्याच्या वेळी योध्याचे काम केले. त्यादिवशी अक्षरश: युध्दावर लढावे असे ते लढले. त्यांची मानसिकता आणि मनोधैर्य वाढविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. त्यादृष्टीने पोलीस दलाचे नूतनीकरण करण्यात येत आहे. ज्याप्रमाणे शस्त्रे आणि दारुगोळा याकरिता जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याप्रमाणे त्यांचे राहणीमान सुधारणे आवश्यक आहे. वरळी येथील पोलीस वसाहतीमधील 70 इमारतींमध्ये 1400 पोलीस रहातात. त्या निवासस्थानांच्या भिंतीला भेगा पडल्या आहेत, छतामधून पाणी गळत आहे, टॉयलेटची व्यवस्था बिकट झाली आहे. अशाप्रकारच्या निकृष्ट राहणीमानामुळे 363 पोलीस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री. किरण पावस्कर..

आतापर्यंत मृत्यू पावले आहेत. आज ज्या पध्दतीने हे पोलीस काम करीत आहेत आपण त्यांच्याकडे जास्त जबाबदारीने पहातो. अशावेळी त्यांच्या वसाहतीच्या नूतनीकरणासाठी शासनाने जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती करतो.

----

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ST/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . .. 12:55

**पृ.शी.**: सिंदुदूर्ग तिलारी प्रकल्पातील पाणी अचानक तिलारी नदीत सोडल्यामुळे मायलेकींचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: सिंदुदूर्ग तिलारी प्रकल्पातील पाणी अचानक तिलारी नदीत सोडल्यामुळे मायलेकींचा झालेला मृत्यू याबाबत श्री.राजन तेली वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदूर्ग तिलारी प्रकल्पातील पाणी अचानक तिलारी नदीत सोडल्यामुळे घोटगे येथील सौ.अर्चना दळवी व अमिता दळवी या मायलेकींना जीव गमवावा लागला. धरणातील पाणी अचानक कुठलीही पूर्व कल्पना न देता सोडल्यामुळे दळवी मायलेकीचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू होणे, या संदर्भात दोषींवर कारवाई आणि दळवी कुटुंबियांना आर्थिक मदत करावी अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे. यापूर्वीही प्रकाश दळवी यांनाही याच ठिकाणी प्राण गमवावा लागला असणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये पसरलेला असंतोष व संतापाची भावना, ग्रामस्थांना जाण्या-येण्याचा सर्वात महत्वाचा मार्ग असल्याने या ठिकाणी कॉजवे उभारावा अशी होत असलेली मागणी".

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तिलारी नदीत अचानक पाणी सोडल्यामुळे दळवी माय-लेकी वाहून गेलेल्या आहेत. म्हणून आपल्याव्दारे शासनाला अशी विनंती आहे की, त्यांच्या कुटुंबियांना याबाबत नुकसान भरपाई मिळावी. कारण तेथे या संदर्भात जन आंदोलन देखील झाले आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे आणि लोकांना न सांगता अचानक पाणी सोडण्यात आले, त्यांच्यावर देखील कारवाई होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मधाशी सांगितल्याप्रमाणे शासनाकडून दळवी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

----

. . . .एक्स-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागांमध्ये नेमण्यात आलेल्या शिक्षणसेवकांना सहावा वेतन आयोग लागू करणे

**मु.शी.**: राज्यातील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागांमध्ये नेमण्यात आलेल्या शिक्षण सेवकांना सहावा वेतन आयोग लागू करणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे(पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागामध्ये नेमलेल्या शिक्षण सेवकांना सहावा वेतन आयोगांतर्गत त्यांच्या वेतनश्रेणीतील मूळ वेतनाएवढा मेहनताना मिळावा या मागणीची शासनाने अद्याप दखलच घेतलेली नाही. त्यामुळे या शिक्षणसेवकांना आर्थिक संकटातून जावे लागत आहे."

सभापती महोदय, शासनाने तिजोरीमध्ये खडखडाट आहे असे सांगत महाराष्ट्रामध्ये 2000 सालापासून प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधून व सुरुवातीला अल्पावधी कालावधी साठी असे सांगत शिक्षण सेवक योजना सुरु केली. या शिक्षण सेवक योजनमध्ये डी.एड.वेतनश्रेणीला 3000, बी.एड.साठी 4000 आणि उच्च माध्यमिकसाठी 5000 एवढे लमसम वेतन दिले जाते. मात्र त्यांना अद्यापपर्यंत सहावा वेतन आयोग देण्यात आलेला नाही. तरी त्यांना सहावा वेतन आयोग सत्वर दिला जावा आणि तो देत असतानाही देखील या सर्व संवर्गांना त्यांच्या मूळ वेतनाएवढा मेहनताना देण्याची आवश्यकता आहे. कारण ते आर्थिक ताणाखाली काम करीत आहेत. त्याचबरोबर शिक्षणसेवकांचा तीन वर्षाचा जो कालावधी आहे, तो दोन वर्षाचा करण्यात यावा आणि दोन वर्षाच्या कालावधीमध्ये सुध्दा त्यांना वेतनवाढ दिली जावी. तसेच हा कालावधी वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी, सेवानिवृत्ती वेतन आणि सेवा ज्येष्ठता यादी या सर्व लाभांसाठी ग्राह्य धरण्यात यावा. धन्यवाद.





**(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला बंदरात परप्रांतीय मच्छिमार नौकांची होणारी घुसखोरी.

**मु.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला बंदरात परप्रांतीय मच्छिमार नौकांची होणारी घुसखोरी याबाबत श्री.परशुराम उपरकर वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कृष्णाई ही गस्तीनौका वेंगुर्ला बंदरात तपासणीसाठी गेली असता कर्नाटक राज्यातील 50 परप्रांतीय मच्छिमार नौकांनी घेरले असता पलायन करावे लागले आणि या पलायनातून कस्टमच्या गस्तीनौकेने या बोटीतील कर्मचाऱ्यांना वाचविले. त्यामुळे वेंगुला किनारपट्टी वरील असलेल्या मच्छिमारांमध्ये निर्माण झालेली घबराट व भीतीचे वातावरण, या घटनेचा कोणताही गुन्हा स्थानिक पोलीस स्थानकात नोंदविण्यात न येणे, तसेच परप्रांतीयांच्या या घुसखोरी मुळे मासळीचा दुष्काळ निर्माण होणे, परप्रांतीयांची वाढती घुसखोरी रोखण्यासाठी शासनाने उपाय-योजना करण्याबाबत निवेदन करावे."

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील कृष्णाई गस्तीनौका वेंगुर्ला बंदरामध्ये गस्ती करीत असताना कर्नाटक राज्यातील सुमारे 50 ट्रॉलरधारकांनी घेरले असता, त्याठिकाणी असलेल्या गस्ती नौकेवरील कर्मचाऱ्यांना वाचविण्याचे काम तेथे असणाऱ्या कस्टम नौकेने केलेले असल्यामुळेच ते कर्मचारी वाचले आहेत. या कर्मचाऱ्यांमध्ये आणि या बोटीवरील कर्मचाऱ्यांमध्ये झालेला सी-वॉर पाहता मच्छिमारांमध्ये पूर्णपणे असंतोष व भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. याठिकाणी या बोटी घेरलेल्या असताना कर्नाटक राज्यातील एकाही मच्छिमार बोटींबाबत गुन्हा दाखन न होणे याकडे मी लक्ष वेधत आहे आणि याबाबत संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी शासनाचे लक्ष केंद्रीत करीत आहे.

----



**पृ.शी.**: प्रत्येक प्राथमिक व माध्यमिक शाळेत कला व क्रीडा विषय सक्तीचा करणे

**मु.शी.**: प्रत्येक प्राथमिक व माध्यमिक शाळेत कला व क्रीडा विषय सक्तीचा करणे याबाबत श्री.विक्रम काळे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील सर्व शाळांमधून मराठी पासून ते इतिहास भूगोल विषयांपर्यंत सर्व विषय शिकविले जातात.परंतु शालेय जीवनात जे शिक्षण व संस्कार विद्यार्थ्यांना दिले जातात, ते चिरकाल टिकणारे असतात. शालेय जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा ही अपेक्षा व उद्दिष्ट आहे. असे असतानाही इतर विषयाबरोबर विद्यार्थ्यांना कला व क्रीडेचे ज्ञान देण्यासाठी मात्र कुठल्याही प्रकारची व्यवस्था शाळेमधून दिसून येत नाही. कारण यासाठी विषय शिक्षकाची नेमणूक करण्यात येत नाही. दुसरीकडे मात्र मोठया प्रमाणात बी.पी.एड व ए.टी.डी./ए.एम.या क्रीडा व कला क्षेत्रातल्या शिक्षकीय पदासाठी आवश्यक असणाऱ्या पदवी-पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांची संख्या मोठी आहे व ते सर्व बेकार आहेत, तेव्हा या बेकारांना काम देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी प्रत्येक प्राथमिक व माध्यमिक शाळेत कला व क्रीडा हा विषय सक्तीचा करुन त्यासाठी बी.पी.एड./ए.टी.डी./ए.एम.अशा प्रशिक्षित शिक्षकांचीच नेमणूक करण्या- साठी धोरणात्मक निर्णय शालेय शिक्षण विभागाने घ्यावा अशी विनंती मी विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : एड्ससारख्या संसर्गजन्य वातावरणात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आदिवासी व नक्षलग्रस्त भते लागू करणे.

**मु. शी.**: एड्ससारख्या संसर्गजन्य वातावरणात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आदिवासी व नक्षलग्रस्त भते लागू करणे याबाबत श्री.केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी) : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" राज्यात अत्यंत गंभीर आजार म्हणून परिचित असलेल्या एचआयव्ही/एड्स या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी 604 एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र अस्तित्वात असून त्यामध्ये एड्स नियंत्रण कार्यक्रम राबविण्यासाठी कंत्राटी पध्दती व मानधनावर कर्मचारी कार्यरत असणे, आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना, आरोग्य सेवा संचालनालय (केंद्रीय क्षयरोग विभाग), नवी दिल्ली यांच्या दिनांक 06 जानेवारी,2006 च्या पत्र क्र.टी/19018/802005 अन्वये आदिवासी भत्ता रु. 1000/- व नक्षलग्रस्त भत्ता म्हणून 1500/- असा जास्तीचा भत्ता दि.6 ऑगस्ट, 2002 पासून देय असणे, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.24 फेब्रुवारी,2009 रोजी एड्स नियंत्रण कार्यक्रमात कंत्राटी पध्दतीने व मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समिती गठीत करणे, परंतु सदर समितीने अद्याप एकही सभा आयोजित न करणे, त्यामुळे एड्ससारख्या संसर्गजन्य वातावरणात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आदिवासी व नक्षल भत्ते तात्काळ लागू करण्याची आवश्यकता,शासनाने यावर तातडीने करावयाची उपाययोजना, शासनाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ KTG/ SBT/

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी अर्धा-तास मी तहकूब करीत आहे.

( 1.01 ते 1.30 मध्यंतर )

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : मुंबई प्रांतिक महानगरपालिका व मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO.XXII OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, AND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 22 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. स. वि. क्रमांक 22 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या पृथ्वीतलावर दोन तोंडाचा एकच जीवजंतू किंवा किडा आहे तशा प्रकारच्या सरकारी प्रवृत्ती या विधेयकामधून व्यक्त होत आहेत ते मी या ठिकाणी सांगत आहे. ज्यावेळी जकात रद्द करण्याचा विषय आला त्यावेळी आम्ही ती मागणी करीत होतो. आम्ही युतीच्या शासनाच्या काळात जकात रद्द केली होती आणि केवळ जकातच रद्द केली नाही तर ...

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्या त्या नगरपालिकांना 3 वर्षे अनुदान देण्याचा निर्णय झाला. त्याप्रमाणे ते दिले जात होते. त्यानंतर एक वर्षांनी कॉंग्रेस पक्षाचे सरकार आल्यामुळे तुम्हाला ते अनुदान द्यावे लागेल. परंतु नगरपालिकांना केवळ शासनाच्या तिजोरीतून पैसा जात आहे हे सहन न झाल्यामुळे शासनाने पुन्हा जकात आणण्याचा निर्णय घेतला आणि शिवशाही शासनाने रद्द केलेली जकात या शासनाने पुन्हा सुरु केली. परंतु केवळ शासनाच्या तिजोरीतून पैसा जाऊ नये म्हणून पुन्हा जकात सुरु केली. त्यानंतर कोठे तरी आपल्या मनामध्ये आले की, आता जकात बंद करु या आणि त्याऐवजी उपकर सुरु करु या. त्यामुळे या सदनामध्ये बरीच चर्चा झाली. उपकर केल्यानंतर थेट हिशोबाच्या चोपडीमध्ये शासनाचा हस्तक्षेप होईल, आमचा दैनंदिन हिशोब लिहिण्यामध्ये अडचण होईल अशा अनेक गोष्टींबाबत शंका व्यक्त करण्यात आल्या. तसेच शासनाकडे अनेक व्यापाऱ्यांची निवेदने आली, त्यांनी सांगितले की, आम्हाला जकात नको, त्याऐवजी उपकर सुरु करावा. हा उपकर 2 टक्के असावा का, तो किती असावा, त्यामध्ये चोऱ्या होतील असे सांगितले गेले. त्या विधेयकाला मी विरोध केल्यावर तत्कालीन सन्माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांनी शासन यामध्ये कोणतीही पळवाट ठेवणार नाही. या उपकराच्या माध्यमातून 100 टक्के वसुली केली जाईल. जकातीला शासन पर्याय देत आहे. सभापती महोदय, मी एक गोष्ट सरकारच्या निदर्शनास आणून देत आहे. हे सरकार व्यापाऱ्यांच्या तालावर नाचणारे सरकार आहे काय ? व्यापारी बोलतात त्याप्रमाणे सरकार कृती करीत आहे काय ? ज्या व्यापाऱ्यांनी या महाराष्ट्रात दोन वर्षे सतत व सातत्याने बंद पुकारला, अनेक आंदोलने केली, जकातीच्या गाडया अडविल्या, सरकारपुढे गेले, मंत्रालयावर मोर्चा काढला, जकात बंद करावी अशा घोषणा दिल्या होत्या. त्यांना शिवशाही सरकारने न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुन्हा एकदा सरकारला सुचले आणि व्यापा-यांनी उपकराची केलेली मागणी मान्य करुन उपकर सुरु करुन त्यांना न्याय दिला. या निर्णयाचे परिणाम काय झाले हे बघावयाचे असेल तर मंत्रिमहोदयांनी वर्तमानपत्रे काढून वाचावीत. अमरावती, संभाजीनगर अशा अनेक महानगरपालिकच्या क्षेत्रातील व्यापाऱ्यांनी सरकारने ज्यादिवशी हा निर्णय जाहीर केला त्यादिवशी संध्याकाळी फटाके वाजवून पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

श्री.दिवाकर रावते....

अनेक व्यापाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले. संभाजीनगर येथे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी जाहीर सत्कार स्वीकारला. आता सरकारला एकाएकी काय उपरती झाली ? अमरावतीमध्ये जकात ठेवावी की रद्द करावी यावरुन हाणामाऱ्या झाल्या, जकात नाक्यावर हाणामाऱ्या झाल्या, नगरसेवकांमध्ये हाणामाऱ्या झाल्या. जकात व्यापाऱ्यांनी भरावयाची, उपकर सरकारला मिळणार, त्याच्यातील हिस्सा त्या नगरपालिकांना जाणार. परंतु हाणामाऱ्या मात्र नगरसेवकांमध्ये होणार. जकात कोणाची असावी, जकातीच्या खाजगीकरणावरुन मारामाऱ्या झाल्या. हे सर्व भयानक प्रकार झाले आहेत. जकात वसुली नगरसेवकांची, जकात ठेकेदारांची की आणखी कोणाची अशी स्थिती राज्यात निर्माण झाली आहे. हे सर्व झाल्यानंतर हे व्यापारी पुन्हा सरकारकडे आले आणि आम्हाला उपकर नको, जकात लावा असे सांगू लागले. सभापती महोदय, सरकारच्या माध्यमातून निश्चित धोरण ठरविताना कोणत्या पध्दतीचे धोरण ठरविले जाते त्याचे सरकारला भान आहे की नाही, जाणीव आहे की नाही ? या विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये असे नमूद केले आहे की, " 'ड' वर्ग नगरपालिकेत जकात कराऐवजी उपकर सुरु केला होता. तथापि, उपकर बसविण्यात व तो गोळा करण्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते." हे वाक्य आणि तत्कालीन अर्थमंत्र्यांचे भाषण पाहिले तर मी हक्कभंग प्रस्ताव देऊ शकतो. ही जी कागदपत्रे आहेत ती शासनाने सभागृहासमोर ठेवलेली आहेत. म्हणून दोन तोंडाने बोलणाऱ्या किटकाचा मी उल्लेख केला आहे. कोणत्याही पध्दतीने, कसेही बोलावे. अशाप्रकारची परिस्थिती सदनात आहे. या सदनाची काही जबाबदारी आहे की नाही ? या सदनाने नक्की काय करावयाचे ? शासन बहुमताच्या जोरावर आणेल तो कायदा करावयाचा, बहुमताच्या जोरावर आपल्याला पाहिजे तो कायदा करावयाचा, बहुमताच्या जोरावर ठरविणार तो कायदा करणार, अशाप्रकारे सरकार चालते काय ? मागील सरकारने केले ते पुढील सरकारने रद्द करणे ही सरकारची भूमिका असता कामा नये. मागील सरकारने जी काही कमिटमेंट दिलेली असते ती पुढील सरकारची जबाबदारी असते. आपल्याला परिस्थितीप्रमाणे व घटकाप्रमाणे बदल करावा लागतो एवढया मर्यादित स्वरुपात तो असावा लागतो. धारावीच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

एफएसआय वाढविल्यामुळे आम्हाला 33(10)(सी) कायदा करावा लागला.कलम 36 (1) (2) (3) (6) (7) आहे. परंतु धारावीसाठी कायद्यात बदल करावा लागेल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. जकात नष्ट करुन पर्यायी पध्दती सुरु करण्याबाबत व्यापा-यांकडून होणा-या सततच्या मागणीचा विचार करता राज्य शासनाने, "ड" वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये जकात कराऐवजी स्थानिक संस्था कराची एक नवीन पध्दत सुरु करण्याचे ठरविले. विधेयकाच्या उद्देश व कारणे यांच्या निवेदनामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "महानगरपालिकांच्या हद्दीलगत वाढत्या नागरीकरणामुळे अशा ग्रामीण क्षेत्रांमध्ये विद्यमान पायाभूत सोयीसुविधावंर अधिक बोजा पडत आहे. या पायाभूत सोयीसुविधा विकसित करण्यासाठी पंचायती आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करणे आवश्यक होते. म्हणून, राज्य शासनाने, अशा लगतच्या क्षेत्रांकरिता देखील स्थानिक संस्था कर सुरु करण्याचे ठरविले होते." आता जकात पुन्हा सुरु करण्यासंबंधी विधेयक आणलेले आहे. एका सरकारने कायदा करायचा आणि दुस-या सरकारने तो रद्द करायचा अशी पध्दत नसते.तरी देखील युतीच्या सरकारने केलेला कायदा आघाडीच्या सरकारने रद्द केला. आता सरकारला स्थिरता आलेली आहे. त्यामुळे आम्ही काहीही केले, वाटेल ते केले तरी लोक आम्हाला निवडून देतात अशी सरकारची धारणा झालेली आहे. समोरच्या बाजूच्या काही सन्माननीय सदस्यांची आम्हाला हिणवण्याची सोय देखील त्यामुळे होते. सभापती महोदय, या ठिकाणी कायदा करीत असताना सदनाच्या अधिकाराचा आणि पावित्र्याचा प्रश्न असतो. परंतु व्यापारी त्यांच्या मनाप्रमाणे सरकारला नाचवू पहात आहेत आणि त्याप्रमाणे सरकार वागत आहे. जकात पुन्हा सुरु करण्यासंबंधीचा हा कायदा या ठिकाणी आणलेला आहे हे मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे, धन्यवाद.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009चे वि.स.वि.क्रमांक 22 मुंबई प्रांतिक महानगरपालिका व मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मी थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, हा सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. मुळात 1 जानेवारीपासून जकात रद्द करुन स्थानिक कर लावण्यात येणार आहेत. याबाबतीत सरकारच्या मनामध्ये कोणतीही स्पष्टता नाही. या सरकारने जेव्हा उपकर सुरु केला तेव्हा नागरिकांना वाटले की जकात गेली. परंतु नंतर त्यांच्या असे लक्षात आले की जकात परवडली पण उपकर नको. उपकर जकातीपेक्षा भयानक ठरला. यामागचे नेमके कारण काय आहे ? या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तू यांना जकात असणार नाही. मग बाकीच्या वस्तूंना जकार लागणार आहे काय ? याबाबतीत स्पष्टता असणे गरजेचे आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी वारंवार हा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, औषधावरील जकात रद्द करण्यासंबंधी दिनांक 1 जुलै 2008ला सरकारने परिपत्रक काढले. महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागविले. कोल्हापूर महानगरपालिकेने या संदर्भात औषधावरील जकात रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविला. शासनाने औषधावरील जकात रद्द करण्यासंबंधी परिपत्रक काढले परंतु त्यांची अंमलबजावणी झालेली नाही. तेव्हा सरकारला नेमके काय करावयाचे आहे याबाबतीत सरकारने स्पष्टता करावी, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2009चे वि.स.वि.क्रमांक 22 - मुंबई प्रांतिक महानगरपालिका व मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विधेयक क्रमांक 22 हे महानगरपालिका आणि ग्रामपंचयती या दोन्हीच्या संदर्भातील विधेयक आहे. जकात नसावी, जकात काढून टाकण्यात यावी आणि त्याऐवजी आपण पर्यायी कर लावावा अशा प्रकारची मागणी गेल्या 10 वर्षापासून व्यापारी आणि आयातकार करीत आहेत. यासंदर्भात मागे आपण जकात काढून टाकण्यासंबंधीचा निर्णय घेतला आणि पुन्हा जकात सुरु झाली. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे अभिनंदन करतो. या विधेयकाच्याबाबतीत माझ्या संमिश्र भावना आहेत. जकात काढून टाकली याबद्दल आनंद आहे. पण त्याऐवजी दुसरी पध्दत आणली गेली आणि ती पध्दत महानगरपालिकांना मान्य नव्हती.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...........

कारण महानगरपालिकांचे मुख्य उत्पन्न हे जकातीचे आहे. जकातीशिवाय महानगरपालिका चालू शकत नाहीत. आता शासनाने हा नवीन कायदा जो आणला आहे तो ड वर्ग महानगरपालिकांसाठी लागू होणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायद्यामध्ये येणाऱ्या ज्या ड वर्ग महानगरपालिका आहेत त्यांना हा कायदा लागू होणार आहे. आपल्या राज्यात नागपूरसाठी वेगळा कायदा आहे. नागपूर सिटी म्युनिसिपल ॲक्ट आहे. मुंबईचा कायदा वेगळा आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून विनंती करणार आहे की, संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका क्षेत्रातील जकात रद्द करण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये बूक बेस अकौंटिंग सुरु केली आणि बूक बेसचा पर्यायी कर वसूल केला जात आहे. करदात्यांची मागणी होती की, तुम्ही वॅटवर सेस लावावा. एकाच वेळी इन्स्पेक्शन होईल. पुन्हा इन्स्पेक्शन करण्याची गरज राहणार नाही. ज्या ज्या महानगरपालिकांमध्ये जितके उत्पन्न असेल त्यावर वॅटवरील सरचार्जच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन महानगरपालिकांना रक्कम देईल. वॅटवरचा सरचार्ज गोळा करणे ही सर्वात सोपी पध्दत होती. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये बूक बेस अकौंटिंगवर कर दिला जातो ती एक पध्दत आहे. आता शासनाने स्थानिक कर वसूल करण्याची पध्दत आणली आहे. कलम 31 क मध्ये म्हटले आहे की, 'स्थानिक संस्था कर, याचा अर्थ उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर प्रकरण अकरा-ख च्या तरतुदीनुसार बसविण्यात आलेला कर'. यामध्ये जकातीचा समावेश होत नाही. मी अर्थ असा समजतो की, बुक बेस कलेक्शन केले जाणार आहे. माझा समज वेगळा असेल तर मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. यानंतर आपण आणखी एक कर लावला आहे. तो कर मुद्रांक शुल्कावर आहे. एक कर कमी करीत असताना दुसरा कर वाढवित आहात. याठिकाणी कलम 149 क मुद्रांक शुल्कावर एक टक्का अधिभार आकारण्यात येईल. जकात कमी होत आहे म्हणून मुद्रांक शुल्कावर अधिभार लावण्यात येत आहे. एकूण परिस्थिती पाहून त्या त्या महानगरपालिकांना किती अनुदान द्यावे लागेल याचा विचार केला जाईल. परंतु माझी मागणी आहे की, हा मुद्रांक शुल्कावरील अधिभार कायम असता कामा नये. ज्या ज्यावेळी स्थानिक कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न हे योग्य असेल तर हा कर मालमत्ताधारकांकडून घेऊ नये अशा प्रकारची विनंती मी आजच्या प्रसंगी करतो आणि पुन्हा एकदा ज्या महानगरपालिका आहेत

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 13:45

श्री.अरुण गुजराथी...........

त्यांचा जकात कर रद्द करण्याचा प्रयत्न व्हावा अशी विनंती करतो. मुंबई महानगरपालिकेच्या जकातीची रक्कम ही उर्वरित सर्व महानगरपालिकांच्या जकातीची रक्कम एकत्रित केली तर त्याहून कितीतरी अधिक आहे. तत्कालीन माननीय वित्त मंत्री व नगरविकास मंत्री यांना मी विनंती केली होती. मुंबईचा दुसऱ्या टप्प्यात विचार व्हावा. परंतु लहान महानगरपालिकांची जकात रद्द करावी. ज्या पध्दतीने हा कर आणला आहे त्याला व्यापाऱ्यांची हरकत किंवा अडचण येईल, विरोध राहील असे वाटत नाही. असल्यास त्या संदर्भात जरुर शासनाने विचार करावा एवढे बोलून या विधेयकाचे स्वागत करुन माझे भाषण संपवितो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानसभा विधेयक क्रमांक 22 वर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये म्हटले आहे की, जकात नाक्यावर वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे वाहतुकीची समस्या निर्माण होते. हे खरे आहे. गोंदियाहून नागपूरला येत असताना महानगरपालिकेचा जकात नाका लागतो. त्याठिकाणी अनेकदा वाहतुकीची कोंडी निर्माण झालेली दिसून येते. त्या कोंडीतून वाहनांना मार्ग काढणे कठीण होऊन जाते. यामुळे प्रवाशांना खूप त्रास होतो. या विधेयकाच्या माध्यमातून जकात नाक्यावर तपासणीसाठी जी वाहने उभी असतात त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहतुकीची व्यवस्था असावी. खाजगी वाहने, बसेस, जीप्स यांना जकात नाक्यावर न थांबता पुढे निघून जाता येईल अशा प्रकारची व्यवस्था केली पाहिजे.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ......

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 असा उल्लेख या विधेयकामध्ये केलेला आहे. या अनुषंगाने माझ ा असा प्रश्न आहे की, मुंबईत अशा किती ग्रामपंचायती आहेत ? मला तरी आठवत नाही की, पूर्व विदर्भातील एकाही ग्रामपंचायतीने कर वसुली केली असावी. स्थानिक कराच्या व्यतिरिक्त ग्रामपंचायतींना कोणताही कर मिळत नाही. या अनुषंगाने मला विचारावयाचे आहे की, असा कर वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतींना आहे काय ? असेल तर त्या ग्रामपंचायतींना त्याची जाणीव आहे काय ? हा प्रश्न देखील निर्माण होतो. म्हणून या कायद्यात दुरुस्ती करीत असताना जर खरोखरच ग्रामपंचायतींचा आर्थिक विकास करावयाचा असेल, त्यांना सुखसोयी उपलब्ध करुन द्यावयाच्या असतील, पायाभूत सुविधा निर्माण करुन द्यावयाच्या असतील तर त्या ग्रामपंचायती खऱ्या अर्थाने सक्षम होणार आहेत काय ? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. मला तर असे वाटते की, या दुरुस्तीमुळे केवळ नगरपालिका आणि महापालिकाच सक्षम होणार आहेत. ग्रामपंचायती कशा प्रकारे सक्षम होतील याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी मी त्यांना विनंती करतो. त्याचप्रमाणे हे विधेयक एकंदर जकातीच्या संदभात आणले असून त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, शासनाने जकातीबाबत वारंवार पध्दतींमध्ये बदल केला तरी त्याचा उपयोग झ ाला नाही. हा बदल करताना असलेली निराळीच समस्या निर्माण होत होती व अशा समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना मात्र शासनाने कोणत्या केल्या याचा उल्लेख उद्देश व कारणे यामध्ये दिलेला नाही. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-----------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : साधारणपणे विधेयकावर पीठासीन अधिकारी कधी बोलत नसतात. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांमधून मी निवडून आलेलो असल्याने आणि त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनुषंगानेच सभागृहात विधेयक आलेले असल्याने त्या विधेयकाचे कोणते दूरगामी परिणाम होणार यासंबंधीचे विवेचन करताना मी एवढेच सांगणार आहे की, मी ठाणे महापालिकेचा महापौर तसेच 12 वर्षे नगरसेवक म्हणून काम केलेले आहे. सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि श्री. अरुणभाई गुजराथी यांनी शासनाने यापूर्वी जकात कर राज्यात लागू केला आणि नंतर तो कशा कशा प्रकारे रद्द केला याबाबत आपले विचार मांडले. शासनाने नगरपालिकांचा जकात कर रद्द केला तर ज्या सोईसुविधा पुरवावयाच्या असतात त्या पुरवित असताना महापालिका व नगरपालिकांसमोर अडचणी निर्माण होतात. कारण शासनाने दिलेल्या निधीवर त्यांना अवलंबून रहावे लागत होते आणि त्यामुळे मधल्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शासनाकडून जी देयके महापालिका व नगरपालिकांना वेळेवर मिळत नव्हती. पर्यायाने बऱ्याच वेळा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार थकत होते. त्यामुळे नगरपालिका आणि महापालिकांवर गंभीर परिस्थिती उद्‌भवली होती म्हणून पुन्हा जकात कर सुरु करण्यात आला होता. हा शिवाशिवीचा खेळ शासनाने मधल्या काळात केला होता. शेवटी असे आहे की, आपण शासन म्हणून राज्याच्या पातळीवर काम करीत असला तरी स्थानिक पातळीवर आपलेच कार्यकर्ते लोकप्रतिनिधी म्हणून काम करतात व त्यांना सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. माझा देखील एक लोकप्रतिनिधी म्हणून अनुभव असल्यामुळे माझी अशी भूमिका राहील की, अशा प्रकारे जकात कर शासनाने लागू केल्यानंतर महापालिका आणि नगरपालिकांची जी पंचाईत होणार आहे त्यामुळे पुन्हा राज्यशासनाला विचार करावा लागणार की, पुन्हा यावर निर्बंध लावावेत की कसे, अशी परिस्थिती राज्यात उद्‌भवू शकते. त्याचे कारण म्हणजे याच्या प्रतीकात्मक जे होईल त्याचे स्थानिक स्वराज्य पातळीवर पडसाद उमटणार आहेत. म्हणून शासनाला हा कर लाग करावयाचा असेल तर जकातीला उत्तम पर्याय असेल तरच लागू करावा. शेवटी जो कर आपण लावणार तो व्यापाऱ्यांकडून घेत होतो परंतु जो उपकर आता शासन लादणार आहे तो सर्वसामानय नागरिकांकडून वसूल होणार आहे. ज्यांचा या धंद्याशी संबंध नाही अशा नागरिकांकडून नाहक ही वसुली होणार आहे अशी माझी भावना आहे. म्हणून शासनाची ही योजना तितकीशी स्वागतार्ह नाही असे मला वाटते.

---------

....3....

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय जकातीच्या एकूण विषयाकडे पाहिले तर काही वेळा जकात लावणे आणि ती पुन्हा बंद करणे आणि पुन्हा सुरु करणे हे सर्व प्रकार घडत आहेत. त्यामुळे या कामासाठी गुंतलेल्या स्थानिक पातळीवरील सेवक वर्गामध्ये एक प्रकारे असुरक्षिततेची भावना निर्माण होते. अशा प्रकारे कोणतीही योजना अमलात आणावयाची असेल तर या कर्मचाऱ्यांना सुरक्षितता कशी वाटेल, त्यांची व्यवस्था कशी होईल याचाही शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ SBT/ KTG/ ST/ प्रथम श्री. खर्चे... 13:55

श्री.हेमंत टकले.. ..

सभापती महोदय, नगरपालिकेमधील जे कर्मचारी जकात नाक्यावर काम करतात त्यांची नोकरी यामुळे जाता काम नये. या कर्मचा-यांची नोकरी गेली तर त्यांचे संसार उघडयावर पडतील त्यामुळे जकात नाक्यावरील कर्मचा-यांना सामावून घेण्याची सोय या बिलामध्ये असावी अशी माझी सूचना आहे, एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

धन्यवाद

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रातील इकडच्या, तिकडच्या आणि पलिकडच्या लोकप्रतिनिधींची अशी मागणी आहे की, या देशातील महाराष्ट्र वगळता इतर अन्य कोणत्याही राज्यात जकात कर लागू नाही त्यामुळे आपल्या राज्यात सुध्दा जकात कर नसावा,अशी सर्वांची इच्छा होती त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने जकात कर माफ करण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. या आश्वासनांची ख-या अर्थाने पूर्ती आज या बिलाच्या माध्यमातून होत आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, 1 मे, 1999 मध्ये महाराष्ट्रातील ज्या नगरपालिका होत्या त्या सर्व नगरपालिकेतील जकात कर रद्द करुन त्यांना अनुदान देण्याचे मान्य करण्यात आले होते. आज तागायत शासनाने या नगरपालिकांना अनुदान दिलेले आहे. त्यामुळे जकात कर रद्द केल्यामुळे विकासात्मक दृष्टया आणि नगरपालिकेच्या कर्मचा-यांना पगार देण्याच्या दृष्टीने काही अडचण निर्माण झाली, असे कधीही घडलेले नाही.

सभापती महोदय, 21.10.2008 मध्ये शासनाने असे जाहीर केले होते की, आम्ही 1 जानेवारी 2010 पासून या महाराष्ट्रातील "ड" वर्ग नगरपालिका आहेत त्यांचा जकात कर माफ करण्यात येईल आणि जकात नाक्यावर जकात वसुलीचे काम पूर्णपणे बंद केले जाईल, असे शासनाने आश्वासन दिले होते. आपल्याला माहिती आहेच की, जकात नाक्यामुळे जकात नाक्यावर गांडयांचा खोळंबा होतो व त्यामुळे मालाची नासाडी होते तसेच पेट्रोल-डिझेलसारख्या राष्ट्रीय संपत्तीचेही नुकसान होते याबाबत सर्वांना जाणीव आहे. म्हणून "ड"वर्ग नगरपालिकेमध्ये जकात कर रद्द करावा, अशा प्रकारचा विचार ज्या वेळेला शासनासमोर आला व तेव्हा शासनाने हे बिल मांडले. या बिलावर विधानसभेत विस्तृत चर्चा झाली होती. परंतु या ठिकाणी या बिलावर मोजकीच चर्चा झाली असली तरी या ठिकाणी फार मौलिक सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुरुवातीला या बिलावर आपले विचार मांडलेले आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विचार मांडलेले आहेत. त्यातल्यात्यात या ठिकाणचे बरेच सन्माननीय सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मार्फत या ठिकाणी निवडून येतात त्यामुळे त्यांना या विषयाच्या संदर्भातील अधिक जाणीव आहे. या ठिकाणी

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ......

माननीय उपसभापती यांनी शेवटी ज्या वाक्याचा उल्लेख केला त्यासंदर्भात मला येथे विस्ताराने विचार मांडावे. जकात कर चालू करणे, बंद करणे पुन्हा चालू करणे अशा प्रकारचा शिवाशिवीचा प्रकार या जकात कराबाबत झालेला आहे, असेही या ठिकाणी सांगण्यात आले आहे. आपण सांगितले की, हे बिल स्वागतार्ह वाटत नाही. परंतु हे बिल व्यापारी आणि नागरिकांच्या हिताचे कसे आहे, याबाबत मी जेव्हा येथे सांगेन तेव्हा मला वाटते आपण सुध्दा या बिलाचे स्वागत कराल, अशी मला खात्री आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, एका बाजूने जकात बंद केली तरी त्या जकातीचा बोजा आपण नागरिकांवरच लादणार आहात.

यानंतर श्री. गायकवाड.. .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KTG/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 14.00

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्या सर्व मुद्यांचा मी एकाच वेळी येथे उल्लेख करणार आहे आणि त्याचे एकत्रितपणे उत्तर देणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अशा प्रकारची शंका व्यक्त केली होती की, हे सरकार व्यापा-यांपुढे झुकत आहे काय ,सरकार जकातीच्या बाबतीत नेमके काय करणार आहे.? सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी असा प्रश्न विचारला की, जकात नाक्यावर हा कर वसूल होणार आहे आणि बाजारपेठेत माल गेल्यानंतर तेथेही हा कर वसूल होणार आहे अशा प्रकारे दोन ठिकाणाहून कर वसूल होणार आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी असे विचारले की, अगोदर जकात वसुली रद्द करण्यात आली होती ती पुन्हा सुरु का करण्यात आली ? संपूर्ण राज्यामध्ये ही जकात कर रद्द करण्यात येणार आहे काय, वॅटवर सरचार्ज का लावण्यात येत नाही. ? वॅटवर सरचार्ज लावणे हा सर्वात महत्वाचा आणि सोयीस्कर असा उपाय असल्याचेसुध्दा त्यांनी सांगितले होते .त्याचबरोबर मुंबई बुक बेस ही पध्दत का अंमलात आणली गेली नाही याबाबतीतसुध्दा त्यांनी विचारणा केली होती. मुद्राक शुल्कावर कायम एक टक्का कर घेण्यात येत असेल तर पुढच्या काळात हा एक टक्का कर घेण्यात येऊ नये अशी सुध्दा त्यांनी सूचना केली होती. सभापती महोदय , सन्माननीय सदस्य श्री हेमंत टकले यांनी असे विचारले होते की, जकात वसूल करण्याचे काम नक्की कोण करणार आहे आणि नगरपालिकेतील कर्मचारी देशोधडीला लागतील काय, त्यांच्या नोकरीच्या संदर्भात शासन कोणते आश्वासन देणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी या विधेयकावर बोलत असतांना दोन अतिशय मुलभूत प्रश्न उपस्थित केले होते. ग्रामपंचायतीचा आणि या जकात कराचा काय संबंध आहे अशा प्रकारे त्यांनी पहिला प्रश्न उपस्थित केला होता.1958 चा मुंबई महानगरपालिका कायदा आणि ग्रामपंचायत कायदा याचा काय संबंध आहे. तसेच यातून ग्रामपंचायत सक्षम होणार आहे काय अशी विचारणा त्यांनी केलेली आहे. अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्या सर्व प्रश्नांना एकत्रितपणे उत्तर देण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

2..

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय,शासनाने ज्यावेळी जकात कर रद्द करण्याचा निर्णय घेतला होता त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सर्व शंकाचे आणि सगळया शक्याशक्यतेची पडताळणी करुन यातील सर्वात चांगला उपाय कोणता निघू शकतो यासंबंधी शासनाने काळजी घेतली आहे. त्या संदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे याची पार्श्वभूमी मी या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना सांगतो.

सभापती महोदय, शासनाने सर्व प्रथम कसबेकर समितीची स्थापना केली होती या समितीने असे सांगितले की, लेख्यांवर आधारित कर वसूली करता येईल. ज्यावेळी अशा प्रकारे कर वसुली करण्याचा विचार समोर आला होता त्यावेळी अडचण अशी आली की लेखे पाहणे म्हणजे नगरपालिकेच्या कर्मचा-यांनी व्यापा-यांकडे जाऊन त्यांचे लेखे तपासून पहाणे. एकूण किती माल आणला गेला आणि किती माल विकला यासंबंधीची माहिती त्या कर्मचा-याना घ्यावी लागेल यासाठी प्रत्येक व्यापा-याकडे कर्मचारी जाऊन बसेल आणि सकाळ पासून संध्याकाळ पर्यतचे खरेदी विक्रीचे रेकॉर्ड तसेच बाकीचे सगळे रेकॉर्ड तपासून पाहील. असे केल्यामुळे व्यापा-यांची हरॅसमेट होऊ शकते , व्यापा-यांना त्रास होऊ शकतो म्हणून सरकाराने हा उपाय स्वीकारला नाही.

सभापती महोदय, या नंतर सुबोधकुमार समिती नेमण्यात आली होती. त्या समितीनेसुध्दा विविध उपाय सुचविले होते विक्रीकर विभागातून वाढीव वॅटची वसुली करण्याचा, मालमत्ता करामध्ये वाढ करण्याचा पर्याय त्यांनी सागितला होता.महानगरपालिकेने व्यवसाय कर लावण्यासाठी मुभा मागितली होती.प्रवेश कर लावण्यात यावा आणि त्यासाठी कायद्यात बदल करण्यात यावा असेही सागितले होते त्याचप्रमाणे मुद्रांक शुल्कामध्ये दोन टक्क्यांनी वाढ करावी,नागरी संस्थांच्या वतीने घोषित वस्तूवर चार टक्के अतिरिक्त वॅट लावावा असेही त्यांनी सगितले होते. अशा प्रकारे त्यांनी अनेक पर्यार्य सुचवले होते आणि या पर्यायाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यानी दिनांक 5.11.2008 रोजी व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी, महापौर यांना चर्चेसाठी बोलावले होते परंतु त्यावेळी त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद शासनाला मिळाला नाही. फक्त मीरा भाईंदर महानगरपालिकेनेच हा विचार मान्य केला आणि चार महिन्यासाठी या पध्दतीने जकात वसूल करण्याचा प्रयोग त्यांनी केला होता परंतु बाकीच्या महानगरपालिकांनी मात्र काहीही प्रतिसाद

3..

श्री.भास्कर जाधव...

दिलेला नाही. त्यानंतर नगरविकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 10.11.2008 रोजी एक कमिटी नेमण्यात आली होाती आणि सर्व महानगरपालिकेचे महापौर,आयुक्त, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी, महाराष्ट्र व्यापारी संघाचे प्रतिनिधी, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इन्डस्ट्रीज,महाराष्ट्र व्यापारी महासंघाचे प्रतिनिधी इत्यादींना बैठकीसाठी बोलाविण्यात आले..........

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

त्याचे विचार जाणून घेतले, त्यांची मते जाणून घेतली त्यानंतर या सगळ्या गोष्टींच्या बाबत वारंवार बैठका होत होत्या आणि त्या होत असतानाच शासनाने निश्चित असे धोरण जाहीर केले. त्यानुसार कोणत्याही परिस्थितीत 21 ऑगस्ट 2009 रोजी शासनाने हा जकात कर रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला आणि त्याची अमलबजावणी 1 जानेवारी 2010 पासून करण्याचे जाहीर केले. सभापती महोदय, आज आपण दोन तीन प्रश्न येथे उपस्थित केले. पहिली गोष्ट ही आहे की, ही जकात रद्द केल्यानंतर जकात वसूल करणार कोण ? या संदर्भात आपण दोन गोष्टी ठेवलेल्या आहेत. एक म्हणजे ही जकात वसूल करण्यासाठी म्हणून 5 लाखाच्या वर ज्याची वार्षिक उलाढाल असते ते निश्चितपणे वॅट अंतर्गत रजिस्टर्ड झालेले व्यापारी आहेत. म्हणून अशा व्यापाऱ्यांना डीम-रजिस्टर्ड व्यापारी मानून, त्यांनीही खरे तर संबंधित महानगरपालिकेकडे रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता आहे पण ते त्यांनी केले नाही तरी त्यांना डीम-रजिस्टर्ड मानून त्यांच्या वार्षिक उलाढालीवर त्यांच्याकडून जकात वसुली करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दुसरे म्हणजे ज्यांची वार्षिक उलाढाल 5 लाखाच्या आत आहे अशा व्यापाऱ्यांना 1 लाख रूपयांवर वर्षातून त्यांनी एकदा 1 हजार रूपये भरायचे, दोन लाख रूपये ज्यांची वार्षिक उलाढाल असेल अशा व्यापाऱ्यांनी वर्षातून एकदा 2 हजार रूपये भरायचे अशा पद्धतीने त्यांना यामध्ये पूर्णपणे मुभा देण्यात आली आहे. म्हणजे त्यांनी रजिस्ट्रेशन करण्याची आवश्यकता नाही, त्यांनी इमाने इतबारे ... आपण नेहमी म्हणतो की, व्यापाऱ्यांवर नेहमीच आपण अविश्वास दाखवितो, तसा अविश्वास न दाखविता त्यांनी त्यांचा सन्मान राखून त्यांनी हे पैसे भरण्याचे काम केले पाहिजे. यामध्ये जर एखाद्या व्यापाऱ्याने आपले नाव रजिस्टर केले नाही तर त्याला 10 हजार रूपये दंड आहे, एखाद्याने जाणीवपूर्वक कर भरला नाही तर निश्चितपणे त्याला त्या ठिकाणी त्याने चुकविलेल्या कराच्या दहापट दंड करण्याची तरतूद आहे. तसेच प्रत्येकाने चलनाच्या आधारे हा कर स्वत:च त्या त्या महानगरपालिकांकडे भरायचा आहे. अशा प्रकारची मुभा या व्यापाऱ्यांना देण्यात आली आहे आणि बाकीच्यांना वर्षभरामध्ये कर भरावा अशा प्रकारे त्यांच्यासाठी या कायद्यात तरतूद करण्यात आली आहे.

सभापती महोदय, आता प्रश्न एवढाच राहिला की, ग्रामपंचायतीचा आणि याचा संबंध काय? ही वस्तुस्थिती खरी आहे, आपण महानगरपालिकेमध्ये मालावर कर आकारणी करतो हे

.... जीजी 2 ..

व्यापाऱ्यांच्या लक्षात आले तर उद्या व्यापारी असे करतील की, बाजारपेठेमध्ये आपले एखादे बुकींग सेंटर टाईप दुकान ठेवतील, तेथे ऑर्डर नोंद करतील, पावती देतील आणि महापालिकेच्या एरियाच्या, हद्दीच्या बाहेर आपली गोडाऊन्स ठेवतील व तेथून माल लोड व अनलोड करतील. म्हणजे महापालिकेच्या हद्दीत बुकींग करायचे आणि तो माल हद्दीबाहेरील गोडाऊन्समधून परस्पर लोड-अनलोड करायचा असा प्रकार केल्याने पंचाईत अशी होईल की, त्याचा कर येथील महानगरपालिकेला मिळणार नाही. मग महानगरपालिकेला आपल्या कर्मचाऱ्यांचा पगार देण्यात देखील अडचण येईल. म्हणून यामध्ये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या परिसरामध्ये 10 कि.मी. एरियामध्ये जर अशा प्रकारचा व्यवहार कोणी केला तर त्याच्यावर देखील याच पद्धतीने कर वसुलीचे बंधन राहील. म्हणजे मी माझे बुकींग सेंटर महापालिकेच्या हद्दीत, महापालिकेच्या आवारात ठेवीन आणि गोडावून मात्र बाहेर ठेवीन तर असे होता कामा नये. म्हणून त्याचे गोडावून बाहेर राहिले तरी महानगरपालिकेच्या परिसरातील 10 कि.मी. अंतरामध्ये ही कर आकारणी त्याच्यावर होईल. पण आपण असा प्रश्न उपस्थित कराल की, यातून ग्रामपंचायती सक्षम होणार आहेत का ? तर त्यावर माझे उत्तर आहे की, होय, यातून ग्रामपंचायती सक्षम होणार आहेत. ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये आपण कर वसूल केला तर तो कर त्यांनी महानगरपालिकेला द्यायचा नाही तर तो कर त्यांनी ग्रामपंचायतीलाच द्यायचा आहे. याचा अर्थ असा आहे आणि याचा फायदा असा होईल की, शेवटी मी माझे दुकान बाजारपेठेमध्ये ठेवीन आणि महापालिका हद्दीबाहेर माझे गोदाम ठेवीन व तेथून मालाचे लोड-अनलोडींग करीन. पण अशा प्रकारे बाहेर गोदाम ठेवले तर त्यासाठीची जागा घ्यायची, त्यासाठी वेगळे भाडे द्यायचे शिवाय तेवढाच कर्मचारी लागणार आहे त्यापेक्षा व्यापार येथे होईल, बुकींगदेखील येथे होईल आणि येथील कार्पोरेशनला जकातीचे उत्पन्न मिळेल या उद्देशानेच आपण महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील 10 कि.मी. परिसर त्यात घेण्यात आलेला आहे. म्हणून यामध्ये ग्रामपंचायतीचा आणि महानगरपालिकेचा संबंध येतो आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरूण गुजराथी यांनी 2-4 प्रश्न उपस्थित केले. एक म्हणजे या ठिकाणी आपण जकात पुन्हा सुरू का केली ? आपण नेमक्या कोणत्या विषयाबद्दल बोललात हे माझ्या अजून लक्षात आले नाही. जकात कोणती बंद झाली, कोणती सुरू झाली हा विषय माझ्या लक्षात आला नाही. परंतु आपण नगरपालिकांबाबत बोलत असाल तर तो भाग वेगळा

.... जीजी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

आहे. महानगरपालिकेने मी म्हटल्याप्रमाणे मीरा-भाईंदर महानगरपालिकेने सुरूवातीस ही नवीन पद्धत सुरू केली होती पण नंतरच्या काळात ती बंद केली. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एचएच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव..

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 100 टक्के नगरपालिकांचा कर कां माफ करीत नाही? असे विचारुन आपण अत्यंत मूलभूत प्रश्नाला हात घातला आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये एकूण 23 महानगरपालिका आहेत. त्यापैकी मुंबई आणि नागपूर या महानगरपालिकांना वेगळा कायदा लागू आहे. पुणे व नागपूर या "ब" वर्ग महानगरपालिका आहेत. यामध्ये नागपूर महानगरपालिकेसाठी वेगळा कायदा आहे. त्यामुळे राहिलेल्या ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड आणि नवी मुंबई या चार महानगरपालिका आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने उपकर पध्दती मान्य केली आहे. राहिलेल्या चार महानगरपालिकांपैकी मुंबई व नागपूर महानगरपालिका सोडली तर फक्त दोन महानगरपालिका रहातात. त्यामुळे हे शासन निश्चितपणे या राज्याला जकात कर मुक्त करु इच्छिते. त्याची पहिली पायरी म्हणजे 1 मे 1999 साली नगरपालिकांचा जकात कर रद्द केला. आणि आज आपण या विधेयकाला मान्यता देणार आहात. आपल्याकडे 16 "ड" वर्ग महानगरपालिका आहेत, त्या जकात कर मुक्त होतील . आणि भविष्यात उरलेल्या महानगरपालिका सुध्दा जकात कर मुक्त होण्यासाठी शासन आपल्या भावनेचा आदर करुन उचित अशी कारवाई करील एवढेच याठिकाणी सांगतो.

सभापती महोदय, त्यानंतर याठिकाणी व्हॅट कां आकारला नाही? असे विचारण्यात आले. त्याबाबत देखील सर्व शक्याशक्यतेचा विचार आपण पडताळून पाहिलेला आहे. आज राज्याच्या ग्रामीण भागात आलेल्या मालावर सुध्दा व्हॅट घेतला जातो. म्हणजे राज्याच्या कोणत्याही भागामध्ये कोणतीही वस्तू नेण्यात आली तर त्यावरील ठरलेल्या दरानुसार कराची आकारणी केली जाते. आपल्याला केवळ "ड" वर्ग महानगरपालिका जकात मुक्त करावयाच्या आहेत. त्या आपल्याला जकात मुक्त करावयाच्या असतील तर उर्वरित ग्रामीण भागाला त्याचा भुर्दंड कां बसावा? यादृष्टीने विचार केल्यानंतर शासनाला या निर्णयापर्यंत यावे लागले की, व्हॅटपेक्षा हीच गोष्ट सर्वात महत्वाची आहे. त्यादृष्टीने याठिकाणी विचार करण्यात आला नाही. सभापती महोदय, दुसरा विचार याठिकाणी असा मांडण्यात आला की, जकात घेणे किंवा त्याच्या वसूलीचे काम कुणी करावयाचे आहे? ही वसुली नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी करावयाची असल्यामुळे आपले कर्मचारी बेकार होण्याचे कारण नाही. त्यांच्याकडून याचा भरणा होणार असल्यामुळे त्यांना काढण्यात येणार नाही. या जकात कराच्या संदर्भातील विधेयकामध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की, या राज्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. भास्कर जाधव..

जवळ जवळ सर्व वस्तूंवर हा जकात कर सारखा रहावा यादृष्टीने विचार करण्यात आला. तो असा की, ज्याठिकाणी 20 फेब्रुवारी अगोदर जे आयुक्त आहेत त्याठिकाणी राज्याप्रमाणे सर्व वस्तूंवर व्हॅट राहील. ज्याप्रमाणे आज सर्व ठिकाणी सारखा व्हॅट आहे. त्याप्रमाणे एकच वस्तू विविध ठिकाणी विकत असतांना त्या वस्तूवर सर्व ठिकाणी समान कर रहावा. अशाप्रकारची कर प्रणाली दरवर्षी ठरवून ती मान्यतेसाठी शासनाकडे पाठवावयाची आणि शासनाने तिला मान्यता द्यावयाची. याचा परिणाम असा होईल की, एकच समान कर पध्दती सर्व ठिकाणी राहील. आणि तिच्या वसूलीमध्येही सुटसुटीतपणा राहील. त्याबाबत कुणालाही हरकत घेण्याची संधी मिळणार नाही..

सभापाती महोदय, याठिकाणी 1 टक्का मुद्रांक शुल्क घ्यावयाचे आहे त्याबाबत अशी भीती व्यक्त करण्यात आली की, या जकातीचे उत्पन्न कमी झाले तर काय करावयाचे? संपूर्ण राज्यामध्ये सन 2008-09 चे जकातीचे उत्पन्न 8500 कोटी रुपये इतके आहे. त्यापैकी "ड" वर्ग महानगरपालिकेचे गेल्या वर्षीचे उत्पन्न 963 कोटींचे होते. भविष्यात हे उत्पन्न 1100 कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा महानगरपालिकांचा मनोदय आहे.आणि म्हणून त्याबाबत विचार करता उद्या त्यांच्या अपेक्षित उत्पन्नामध्ये घट येऊ नये याकरिता आपण आता मुद्रांक शुल्कावर 1 टक्का सरचार्ज घेत आहोत. या महानगरपालिकांच्या स्वायत्ततेत अडचणी येऊ नयेत याकरिता ही उपाय योजना केली आहे. आणि म्हणून सर्वांगाने या विधेयकामध्ये खूप चांगल्या प्रकारे विचार करण्यात आलेला आहे. या कर वसुलीमुळे किंवा जकात वसुलीमुळे मोठा गोंधळ निर्माण होईल,

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

पाठशिवणीचा खेळ होईल, तर असे काहीही होणार नाही. किंबहुना ही सर्वमान्य कर पध्दती आहे. याबाबतीत जवळजवळ सर्वांचे मत विचारात घेऊन,याठिकाणी सर्वात उत्तम पध्दतीची उपाययोजना आणलेली आहे.या संबंधातील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.शेवटी मी सभागृहाला एकच विनंती करतो की, मला माझ्या भावना मांडण्याची परवानगी देण्यात यावी.

सभापती महोदय, जकातनाक्यावर जकात वसूल केली जाते. पण त्यावेळी गाडी मालकांना काय-काय त्रास सहन करावा लागतो हे मला माहिती आहे. कारण हा त्रास सोसलेला मी एक कार्यकर्ता आहे.1974 साली दुर्दैवाने मला माझी शाळा सोडावी लागली आणि त्यानंतर मला पहिल्यांदा कोणते काम करावे लागले असेल तर ट्रकवर क्लिनरचे काम करावे लागले. त्यावेळी आतासारख्या ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी असलेल्या गाड्या नव्हत्या. रस्ते चांगले नव्हते, गाड्यांना स्पीड नव्हता आणि त्यामुळे रस्त्या-रस्त्यावर गाडया बिघडत होत्या. अशा वेळेला जकात नाक्यावर पहिल्यांदा जाऊन, तेथे रात्रभर जागरण करुन, पहिल्यांदा जकात भरल्याची पावती घ्यावयाची. जेणेकरुन आपला ट्रक मार्केटमध्ये प्रथम जावयास पाहिजे आणि आपण लवकर मोकळे व्हावयास पाहिजे याकरता काय-काय करावे लागत होते ते मला माहिती आहे आणि त्या सर्व गोष्टी सहन केलेला मी एक कार्यकर्ता आहे. सुदैवाने यापूर्वीच नगरपालिकांचा कर माफ झालेला आहे. माननीय श्री.दिवाकर रावतेसाहेब, मी 37-38 वर्षापासून ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करतो, आजही हा व्यवसाय सोडलेला नाही. मात्र सुदैवाने माझे आदरणीय नेते श्री.शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्यामुळे जकातनाक्यावर लोकांची जी छळवणूक होते, ती कमी व्हावी यादृष्टीने ऑक्ट्रॉय कर माफ करणे किंवा कर वसूल करण्याच्या पध्दतीमध्ये बदल करण्याचे काम सुदैवाने मला करण्याची येथे संधी मिळाली आहे हे मी माझे भाग्य समजतो. म्हणून या विधेयकावरील चर्चेमध्ये आपण सर्वांनी सहभाग घेतला त्याबद्दल आपणा सर्वांना धन्यवाद देतो. या विधेयकाला सर्व सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .2 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आदरणीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये एक संदर्भ दिला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, त्यांना शाळा सोडावयास लागल्यानंतर ते ट्रकवर क्लिनर म्हणून काम करीत होते.मी नगरपालिककेमध्ये काम केलेला एक कर्मचारी आहे. त्यामुळे ऑक्ट्रॉय असावा आणि तो का असावयास पाहिजे याची जाणीव माझ्यासारख्याला जास्त आहे. कारण मी नगरपालिकेमध्ये साडे सत्याण्णव रुपये पगारावर कारकून म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, यावरील डिबेट सुरु ठेवावयाचे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, त्यावेळेला आम्हाला 2 रुपये भत्ता आणि 3 रुपये पगार मिळत होता.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, स्थानिक कर लावण्यात येणार आहे, तर तो किती परसेंट असावा हे ठरविले आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, 20 फेब्रुवारीच्या अगोदर कमिशनर हे महापौर आणि इतरांशी चर्चा करुन त्यासंदर्भातील दर नक्की करतील आणि मग ते शासनाकडे मान्यतेसाठी पाठविले जातील. त्यानंतर ते दर कायम रहातील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 10 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि. क्रमांक्र-22 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 22 संमत झाले आहे.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक

**L. A. BILL NO. LIV OF 2009**

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2010.)

श्री. विजय वडेट्टीवार ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 54. दिनांक 31 मार्च, 2010 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अनाथालये व अन्य धर्मदाय गृहे (देशरेख व नियंत्रण), विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. XII OF 2009**

( A BILL FURTHER TO AMEND THE ORPHANAGES AND OTHER CHARITABLE HOMES ( SUPERVISION AND CONTROL) ACT, 1960, THE PERSONS WITH DISABILITIES (EQUAL OPPORTUNITIES, PROTECTION OF RIGHTS AND FULL PARTICIPATION) ACT, 1995 AND THE BUILDING AND OTHER CONSTRUCTION WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 1996, IN THEIR APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे विधानपरिषद विधेयक क्रमांक 12- अनाथालये व अन्य धर्मदाय गृहे (देखरेख व नियंत्रण ) अधिनियम,1960, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम,1995 आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,1996, हे महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, विविध वैधानिक संस्थांच्या प्राधिकरणावर राज्य विधिमंडळाचे सदस्य निवडून देण्यासाठी घ्यावयाच्या सदस्यांच्या निवडणूकीस काही विविध कारणामुळे विलंब होतो आणि त्याचा परिणाम असा होतो की, विधिमंडळाचे सदस्य उक्त प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये सहभागी होऊ शकत नाहीत. म्हणून विधिमंडळाच्या सदस्यांना प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये सहभाग घेता यावा या अनुषंगाने हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2009 चे विधानपरिषद विधेकय क्रमांक 12- अनाथालये व अन्य धर्मादायी गृहे (देखरेख व नियंत्रण) अधिनियम,1960, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, 1995 आणि इमारत व इतर बांधकाम मजूर (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,1996 हे महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक चर्चेसाठी मांडण्यात आले आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय, श्री. भास्कर जाधवसाहेबांनी या विधेयकाची कारणे व उद्देश अतिशय त्रोटक पध्दतीने याठिकाणी सांगितलेली आहेत. वास्तविकपहाता ते मंत्री नसताना या विषयावर फार चांगले बोलू शकले असते, जरी ते सत्ताधारी पक्षात असले तरी.(अडथळा) तुमचे चांगले दिवस आल्याबद्दल आम्हाला आनंद आहे. पण माणसाने इतके बायस होऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, विविध वैधानिक संस्थांच्या प्राधिकरणांवर राज्य विधिनमंडळाचे सदस्य निवडून देण्यासाठी घ्यावयाच्या सदस्यांच्या निवडणुकी. सभापती महोदय, यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय, श्री. भास्कर जाधवसाहेबांना माझा पहिला प्रश्न असा आहे की, या निवडणुका कोण ठरवतात? या निवडणुका सचिव महोदय ठरवितात, हे बरोबर आहे?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

डॉ. दीपक सावंत ....

त्या निवडणुकीसाठी पूर्वी आपण फॉर्म भरत होतो. आपल्यामध्ये आपसात निवडणूक व्हावयाची. आता यामध्ये आघाडी सरकारचे भांडण आहे. त्या समितीवर काँग्रेसचा सदस्य जाणार की राष्ट्रवादी काँग्रेसचा सदस्य जाणार ? मला एकच निवडणूक माहीत आहे. सभापती महोदय, त्यावेळी आपण या सभागृहात होता की नाही हे माहीत नाही. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. अरुण मेहता हे मुंबई विद्यापीठाच्या निवडणुकीला उभे होते. त्यावेळी आपण सामंजस्याने सांगत होतो की, आपण फॉर्म विड्रॉ करा किंवा निवडणूक होऊ द्या. त्यावेळी या सभागृहामध्ये निवडणूक झाल्याचे मला माहीत आहे. त्यामुळे अशी जी काही निकोप स्पर्धा होती ती आता आपण बंद करुन टाकली. त्यामुळे नवीन पर्याय आला. सचिव महोदयांनी नवीन पर्याय सुचविला. त्यांनी असा पर्याय सुचविला की, ज्या ज्या पक्षाचे बलाबल जसजसे असेल, शिवसेना, भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा इतर जे पक्ष आहेत त्या पक्षाच्या बलाबलावर त्याचे परसेंटेज काढून किती सदस्य नेमावयाचे हे त्यांना सांगावयाचे. त्यामुळे आमच्याकडून मुंबई विद्यापीठ गेले. त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड गेले. आमच्या पक्षाचे बलाबल कमी झाले त्यामुळे ते त्या ठिकाणी गेले त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. परंतु या दोन्ही वैधानिक पध्दती आहेत. लोकशाहीमध्ये वैधानिक पध्दतीने कामकाज चालते. त्यावर देखील वरताण करणारे हे विधेयक आहे असे मला म्हणावयाचे आहे. खरे म्हणजे प्रत्येक आमदाराने अंतर्मुख होऊन या बिलाच्या बाबतीत विचार करावयास पाहिजे की, आपण कोणाला अधिकार देत आहोत. आपण या ठिकाणी निवडून आलेलो आहोत. विधानसभा सदस्यांव्दारे आपण निवडून आलेला असाल किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून आलेला असाल किंवा शिक्षक मतदारसंघातून निवडून आलेला असाल किंवा पदवीधर मतदारसंघातून निवडून आलेला असाल, पण आपण कोणाला अधिकार देत आहोत ? यामध्ये आपण सचिवांना अधिकार देत आहोत. या बिलाच्या माध्यमातून आपण नोकरशाहीला मजबूत करीत आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. या विधेयकाच्या उद्देश व कारणे याच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

तरतूद करण्यासाठी शासनाने संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करण्याच्या प्रश्नावर विचार करावा असे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने शासनाला सुचविले आहे." यामध्ये परिच्छेद क्रमांक 2 मध्ये असे म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या सूचनेचा विचार करुन यामध्ये सुधारणा करावयाच्या आहेत. हे सर्व अधिकार माननीय सभापतींना दिलेले आहेत हे मान्य आहे. माननीय सभापती हे या सभागृहाचे सार्वभौम आहेत हे मान्य करतो. परंतु यामध्ये जी निकोप स्पर्धा होती, जे निरोगी वातावरण होते की, कोणत्याही सदस्याला या निवडणुकीमध्ये सहभागी होता येत होते, ही लोकशाही पध्दत आहे. शेवटी आपण लोकशाहीचे पुरस्कर्ते आहात. आपण सत्ताधारी बाकांवरुन सांगता की, आम्ही लोकशाहीचे पुरस्कर्ते आहोत. मग ही एकाधिकारशाही का ? मी याला एकाधिकारशाहीच म्हणणार. सचिव महोदय सुचविणार की, डॉ. दीपक सावंत, श्री. विनोद तावडे याला लायक नाहीत. मग या ठिकाणी दुजाभाव होण्याचा 100 टक्के प्रयत्न होईल अशी माझ्या मनामध्ये भीती वाटते आणि ते निकोप लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे, असे माझे मत आहे. यामध्ये सर्व महत्वाच्या समित्या आहेत. त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी अंतर्मुख होऊन विचार करावा. आपण कोणत्या पक्षाचे आहोत, सत्ताधारी पक्षाचे आहोत की विरोधी पक्षाचे आहोत याचा विचार करु नका. पण विधानसभा सदस्य म्हणून किंवा विधान परिषद सदस्य म्हणून आपण विचार केला तर आपल्याला हे विधेयक योग्य वाटते काय, हे आपण सांगावे. मंत्रिमहोदय म्हणून विधेयक मांडावयाचे व त्याला मान्यता घ्यावयाची हे आपले काम आहे. परंतु हे विधेयक घाईघाईने मंजूर करु नका. या बिलावर चर्चा होऊ द्या. प्रत्येक सदस्याला या विधेयकावर विचार मांडता यावयास पाहिजे. त्यांच्या मूलभूत हक्कांवर या विधेयकामुळे गदा येत आहे. मला आरोग्य विज्ञान विद्यापीठावर जावयाचे आहे. सचिवांनी सभापतींना सांगितले आणि माझे नाव दिले नाही तर मी त्या ठिकाणी जाऊ शकणार नाही आणि मला काम करण्याची संधी मिळणार नाही. त्या ठिकाणी मी माझे कॉन्ट्रिब्युशन देऊ शकणार नाही. आपण मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर किंवा इतर समित्यांवर का जातो ? आपण महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर का जातो ? आपल्याला प्रशासकीय संस्थांमध्ये जे अनुभव आलेले आहेत तसे त्या

...3...

RDB/ KGS/ ST/

डॉ. दीपक सावंत ....

ठिकाणी होऊ नये, त्यामध्ये सुधारणा व्हावी म्हणून आपण त्या ठिकाणी जातो. माननीय सभापती महोदयांविषयी मला काही म्हणावयाचे नाही किंवा त्यांच्या हक्कांविषयी काही म्हणावयाचे नाही. पण आपण या ठिकाणी मूलभूत लोकशाहीचा खून करीत आहात असे मला म्हणावयाचे आहे. आपण आमच्या हक्कावर गदा आणत आहात. यामध्ये यापूर्वी दोन वेळा सुधारणा झालेल्या आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पूर्वी निवडणुका व्हावयाच्या त्या निवडणुका बंद केल्या गेल्या.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्याऐवजी टक्केवारीनुसार पध्दत सुरु केली, संख्येच्या प्रमाणाची पध्दत सुरु केली. आता हे शासन सभासदांचा दुसरा जो हक्क आहे तो सुध्दा हिरावून घेत आहे. सचिवांच्या हातात हा अधिकार दिला जात आहे, सचिव महोदय सभापतींना सांगतील ती माणसे या समितीवर जातील. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? हा मुलभूत प्रश्न आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय खरोखर संवेदनशील असतील तर त्यांनी हे विधेयक मागे घ्यावे, या विधेयकावर पुन्हा विचार करावा. कारण यामध्ये महत्वाचे विषय समाविष्ट आहेत. अनाथालयासारखा विषय आहे, धर्मादाय गृहांसारखा विषय, विकलांग व्यक्तींचा विषय आहे. त्यामुळे त्या समितीवर जाऊन विचार मांडावयाचे नाहीत काय ? कोणी जायचे ? सचिवांना काय अधिकार आहे ? सचिवांनी निवडून दिले म्हणून आम्ही आलो नाही, आम्हाला लोकांनी निवडून दिले आहे म्हणून येथे आलेलो आहोत. शासनाला सर्व काही नोकरशाहीच्या ताब्यात द्यायचे असेल तर या देशाचे एक दिवस वाटोळे होईल, या राज्याचे वाटोळे होईल. लोकप्रतिनिधी ही संज्ञा पुसून टाकली जाईल. पूर्वी जी पध्दत होती ती बंद केली, ठीक आहे, कारण आपापसात क्लेष नको, वाईटपणा नको. निवडणुकीमुळे या गोष्टी होतात. ते या सभागृहात नको. परंतु त्यानंतर पारंपरिक पध्दत होती, बलाबलनुसार निवडून देण्याची जी पध्दत होती ती बंद करुन हा नवीन प्रयोग का सुरु करीत आहोत ? हा प्रयोग फसेल असे मी ठामपणे सांगतो. मंत्रिमहोदयांनी कृपा करुन हे विधेयक मागे घ्यावे, त्याचा पुनर्विचार करावा. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना मी सांगू इच्छितो की, या विधेयकातील शब्दनशब्द आपण वाचावा. त्याच्यातून या विषयाचे गांभीर्य समजेल. कारण बिले सभागृहात आल्यानंतर त्याचे सविस्तरपणे वाचन होत नाही, ती तशीच पास करुन आपण पुढे जातो. सभापती महोदय, हे विधेयक थांबविण्यात यावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सर्व सभासदांच्या हक्कावर अतिक्रमण करणारे हे विधेयक आहे. या विधेयकावर सोमवारी साधकबाधक चर्चा करु. मंत्रिमहोदयांनी या विधेयकाबाबत सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करावी. हे सरकार लोकशाही पध्दतीने चालणार आहे की नाही ? लोकशाहीत विरोधी पक्ष असावा, नसावा या गोष्टी टाळणार आहात काय ? 3 सदस्यांना निवडून देण्याचे पूर्ण अधिकार आपण ज्यांच्या हातात देत आहोत ते दिल्यानंतर आपल्या हातामध्ये काही राहणार नाही. मंत्रिमहोदयांचा आग्रहच असेल तर या विधेयकावर सविस्तरपणे चर्चा करु. परंतु सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर गदा आणणारे हे विधेयक असल्यामुळे शासनाने ते मागे घ्यावे अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती ( श्री.अरविंद सावंत )** : मी यासंदर्भात एवढेच सांगेन की, या विधेयकात 3 सदस्यांची तरतूद आहे. परंतु दोन सदस्य विधानसभेद्वारा व एक सदस्य विधानपरिषदेद्वारा असे तीन सदस्य निवडून द्यावयाचे आहेत. परिषदेतून एकच सदस्य नामनिर्देशित करावयाचा असल्यामुळे सत्ताधारी पक्षाच्या सदस्याचे नामनिर्देशन होईल हे नैसर्गिक आहे आणि यामध्ये तसेच होणार आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले आहे. आपण यामध्ये जर संख्या वाढविली व प्रपोर्शनेट प्रतिनिधीत्व दिले तर सगळ्यांना प्रतिनिधीत्व मिळू शकेल. हा जो इलाज आहे त्यावर मंत्रिमहोदयांनी बोलावे.

----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रामुख्याने असे म्हटले आहे की, आपण हे अधिकार सचिवांना देणार आहात काय ? परंतु मी त्यांना विधेयकाच्या उद्देश व कारणामधील दुसऱ्या परिछेदातील शेवटच्या दोन ओळी वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले की, "उक्त अधिनियमाखालील प्राधिकरणांवर महाराष्ट्र विधानरिषदेचा सभापती व महाराष्ट्र विधानसभेचा अध्यक्ष यांनी राज्य विधानमंडळाच्या सदस्यांचे नामनिर्देशन करावे अशी तरतूद केली आहे." याचा अर्थ या विधेयकामध्ये सचिवांना कोठेही अधिकार दिलेले नाहीत. पूर्वी सुध्दा नॉमिनेशनचे फॉर्म हे सचिवांच्या नावाने भरत होतो. त्या निवडणुकीचा कार्यक्रम अध्यक्ष व सभापती जाहीर करीत होते, त्याच्या प्रोसिजरमध्ये फार फरक पडलेला नाही. (अडथळा) आपण त्याला मंजुरी दिलेली नाही, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे. यामध्ये निवडणुकीच्या कालावधीशी निगडीत मुद्दा आहे. अधिवेशनाचा कालावधी संपला की ही प्रक्रिया पुढील अधिवेशनामध्ये जात होती, त्यामुळे कालापव्यय टाळावा असा या विधेयकामागील सरकारचा हेतू आहे. परंतु सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी सातत्याने व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता आणि सभागृहाचा एकंदरीत नूर पाहता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे ऑन लेग आहेत असे समजावे, या विषयी नंतर अधिक चर्चा करण्यास मी तयार आहे.

----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सरकारच्या आणि राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आणि गंभीर अशी घटना राज्यामध्ये घडलेली आहे. काल रात्री टीव्ही 9 चॅनेलवरुन एक क्लिप दाखविण्यात आली.या क्लिपमध्ये या राज्याच्या एका कॅबिनेट मंत्र्यांनी या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल आणि या देशाच्या माननीय कृषी मंत्र्यांबद्दल जे अनुदार वक्तव्य केलेले आहे ते अनुदार वक्तव्य या राज्याची आणि या सरकारची बदनामी करणारे आहे. संबंधित मंत्र्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य केले आहे की, या राज्याचे मुख्यमंत्री मूर्ख आहेत, खुळे आहेत. त्यांना काही कळत नाही. या देशाचे कृषीमंत्री श्री. शरद पवारसाहेबांबद्दल त्यांनी असे वक्तव्य केलेले आहे की, त्यांना महाराष्ट्राचे काही समजत नाही. त्यांना महाराष्ट्राची माती समजत नाही. ते पुढे असेही म्हणाले की, आचारसंहिता असली म्हणून काय झाले ? अनेक फाईल्सवर बॅक डेटेड सह्या केलेल्या आहेत. आचारसंहिता काही करु शकत नाही. मी सह्या कलेल्या आहेत, तुम्ही सुध्दा सह्या करा. अशा प्रकारचे बेताल वक्तव्य त्यांनी केलेले आहे. यामुळे राज्याची आणि सरकारची बदनामी झालेली आहे. यावरुन मंत्रिमंडळातील मंत्र्यांमध्ये एकमत नाही हे दिसून येते. दुसरे असे की, आचारसंहितेबाबत जे काही वक्तव्य केलेले आहे त्यामुळे आचारसंहितेचा भंग होतो. आचारसंहितेच्या काळात या राज्याच्या कॅबिनेट मंत्र्यांनी अत्यंत महत्वाच्या फाईल्सवर सह्या केलेल्या असतील तर त्या फाईल्समधील निर्णय थांबविण्याची आवश्यकता आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. तेव्हा या मंत्र्यांसंबंधी चौकशी करुन सरकारला निवेदन करायला सांगावे, तसेच या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलवावे, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन अनुदार वक्तव्य करणा-या मंत्र्यांच्या बाबतीत चौकशी करावी असे सांगितले. मी तर असे म्हणणे की हा चौकशीचा विषयच नाही. हे स्टिंग ऑपरेशन दूरचित्र वाहिन्यांच्या माध्यमातून सर्वांनी पाहिलेले आहे. त्यावर चर्चा झाली. काल त्यावर विविध नेत्यांनी भाष्य केलेले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

आहे. राज्यातील जनतेसमोर हे गेले की, या राज्याचा एक मंत्री आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्याद्दल, केन्द्रीय कृषी मंत्र्याबद्दल तारे तोडतोय आणि सरळ सरळ सांगतोय की, फाईल्सवर आचारसंहितेच्या आधीच्या तारखा टाका, त्यावर इनवर्ड आणि आऊटवर्डच्या एण्ट्रीज करु नका. अशा प्रकारचा झालेला कारभार फार गंभीर आहे. हे मंत्री या मंत्रिमंडळामध्ये कसे काय राहू शकतात, हा आमचा प्रश्न आहे. त्यांची जी काही चौकशी करायची असेल ती नंतर करावी पण त्यांना आधी ताबडतोब बडतर्फ करावे. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना खुळा म्हटल्यानंतर ते मंत्रिमंडळामध्ये कसे काय राहू शकतात, खुळ्याच्या हाताखाली खुळखुळा कसा काय राहाणार ? जो राज्य मंत्रिमंडळाला मूर्ख म्हणतो, केन्द्रीय मंत्र्यांबद्दल अनुदार उद्‌गार काढतो तो मंत्री मंत्रिमंडळामध्ये कसा काय राहातो ? हे सरकार येण्यापूर्वी आणि हे सरकार आल्यानंतर असे काय घडले की त्या मंत्र्यांना आपला मुख्यमंत्री खुळा वाटला ? ज्यांनी या देशातील शेतक-यांकरिता कृषीमंत्री पद मागून घेतले, ज्यांनी या महाराष्ट्रामध्ये चारवेळा मुख्यमंत्री पद भूषविले त्यांना माती माहीत नाही, दगड माहीत नाही, धोंडे माहीत नाही अशा प्रकारचे वक्तव्य एका जबाबदार आणि मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असलेल्या मंत्र्यांनी करणे योग्य नाही. ते आज मंत्रिमंडळामध्ये असून गुण्यागोविंदाने नांदत आहेत. त्यांनी केलेले वक्तव्य माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे असे वाटतेय. त्यांनी ते मान्य केले असेल तर तसे सांगावे अन्यथा त्यांना ताबडतोब मंत्रिमंडळातून बडतर्फ करावे अशी आमची मागणी आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून याबाबतीत खुलासा झाला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांच्या संदर्भात वक्तव्य झालेले आहे.....(अडथळा)... या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी येऊन खुलासा केल्याशिवाय पुढील कामकाज करु नये. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहापुढे खुलासा केला पाहिजे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रीमंडळातील एका मंत्रीमहोदयांनी गंभीर आरोप केले आहेत. सारे मंत्रीमंडळ माझ्या खिशात आहे. कोण काय माझे वाकडे करतो? सगळे खुळे आहेत. कर सही, बॅकडेटेड. इतके गैर उद्‌गार काढले आणि ते दूरदर्शनच्या चॅनेलवरुन सर्व जनतेने पाहिले आहे. त्यांनी तुमच्या अंगावरील वस्त्रे शिल्लक ठेवलेली नाहीत. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला पाहिजे. संबंधित मंत्र्यांचा राजीनामा घेणार का याबद्दल सभागृहाला सांगितले पाहिजे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.42 ते 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगिती नंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवरुन एकाच वेळी बोलत असतात.)

श्रीमती मंदा म्हात्रे : जोपर्यंत माननीय मुख्यमंत्री यासंदर्भात खुलासा करणार नाही........

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हरकत घेत असतात व त्यांना मंत्रिमंडळातून बरखास्त करावे अशी मागणी करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते (जागेवरुन) : त्यांना ताबडतोब मंत्रिमंडळातून बरखास्त करावे.

**उपसभापती** : मला पुढील कामकाज घ्यावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जावे. मला लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घ्यावयाची आहे.....

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर (जागेवरुन) : सभापती महोदय, यासंबंधीचा निर्णय झाला पाहिजे. ताबडतोब डॉ. पतंगराव कदम यांचा राजीनामा मागितला पाहिजे, अशी आमची विनंती आहे........

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 21 डिसेंबर, 2009 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 03 मिनिटांनी सोमवार, दिनांक 21 डिसेंबर, 2009 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही